साप्ताहिक

# माणूस

१४ जुलै ८४/दोन रुपये

## पॅब्लो नेरुदांच्या आठवणी

## ग्रंथाली




# ही काय पुस्तकांच्या जगातली क्रांती आहे?

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : चोविसावे

अंक : सातवा

¤

१४ जुलै १९८४

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

सुरेश नावडकर


# सप्रेम नमस्कार..

¤ माणूस- दि. ३०-६-८४ इसाक शेख- सोलापूर याचे पत्र वाचले. त्यात 'माणूस'ने पाकिस्तान विशेषांक काढावा अशी सूचना आहे. तर जरूर तसे करावे व बांगलादेश विशेष अंकही काढावा व दोन्हीही देशांत हिंदू शिल्लक किती आहेत व त्यांना मतदानाचा, जिवंत राहण्याचा, आपला धर्म पाळण्याचा, आपली मंदिरे शाबूत ठेवण्याचा हक्क आहे का? त्यांच्यासाठी त्यांचा वेगळा Personal Law आहे का? क्रिकेट, सिनेमा, संगीत, राजकारण, नोकरी, सत्तास्थाने ह्यात काही स्थान आहे का ह्याचे स्पष्ट विवेचन असावे. Times of India, Indian Express मध्ये भारतीय मुसलमानांविषयी बरेच लेख व माहिती येते; पण पाकिस्तान व बांगलादेशमधील हिंदूविषयी कधीच माहिती येत नाही. भिवंडीला शिवजयंतीला परवानगी देऊ नये असे Times of India व Pakistan Times च्या संपादकांना सारख्याच तीव्रतेने वाटते. पाकिस्तानातील हिंदूपेक्षा हिंदुस्थानातील मुसलमानांना लाखपटीनी चांगली वागणूक मिळते हे हिंदुस्थानातील मुसलमानांना पटेल तो सुदिन केव्हा उजाडेल तो उजाडो; पण हिंदुस्थानातील इंग्रजी वृत्तपत्रे, उर्दू वृत्तपत्रे व श्री. म. जोशी, ना. ग. गोरे, विजय तेंडुलकर, बाबा आढाव, के. ए. अब्बास, सरदार कुलदीप नायर इत्यादी समाजवादी विचारवंतांना हे मान्य आहे की नाही कोण जाणे? कळावे.

२७ जून, ८४ — श्रीरंग ज. गोडबोले, पुणे

¤ अभिनंदन! अभिनंदन!! त्रिवार अभिनंदन!!! ३० जून ८४ च्या अंकातील 'लष्कर आणि लोकशाही' या परखड व सुस्पष्ट अग्रलेखाबद्दल खरोखरच आपले अभिनंदन करावेसे वाटले म्हणून हा पत्रप्रपंच. पंजाब-प्रश्नावर बरीचशी मराठी दैनिके व काही मराठी साप्ताहिके वाचली असता काय आढळले? छान झाले. लष्कर आणले. बरी जिरवली शिखांची, हाच बहुतेकांचा सूर. (अर्थात काही सन्माननीय अपवाद) आपण म्हटल्याप्रमाणे घाव पंजाबवर पडला आहे; पण जखम देशातील लोकशाही प्रक्रियेला झाली आहे. त्याची कुणी दखल घेणार की नाही? आजच वृत्तपत्रात वाचले की, गव्हर्नरांच्या हाताने काश्मिरातला डोळ्यात सलणारा काटा काढून टाकला. आता हेगडे कधी जातात एवढेच पाह्यचे. श्री. अभय गोखले यांच्या पूर्वीच्या सर्व लेखांपेक्षा १६-६ व ३०-६ च्या दोन्ही अंकातील लेख अधिक समतोल आहेत. त्यांनाही धन्यवाद!

४ जुलै, ८४ — फु. भि. सांकला, पुणे

¤ गोविंद निहलानींचा 'अर्धसत्य' पाहिला. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून झालेल्या तेजोभंगाचे दुःख विसरण्यासाठी पोलीस इन्स्पेक्टर अनंत वेलणकर मद्यप्राशन करतो. या चित्रपटावरून कै. राम गणेश गडकरींच्या 'एकच प्याला'ची आठवण झाली. या नाटकातला सुधाकर हा आपली वकिली सनद रद्द झाल्याचे दुःख विसरण्यासाठी मद्यप्राशन करतो आणि शेवटी त्यातच त्याचा बळी जातो! चित्रपटात मात्र अनंत वेलणकर बराच संयमी दाखवलाय, व्यसनातून लौकर सावरलाय.

या चित्रपटाचा शेवट निर्मात्यांनी प्रेक्षकांवर सोपविला आहे; पण चित्रपटावर इतक्या चिकित्सक वृत्तीने प्रतिक्रिया व्यक्त करणारा प्रेक्षकवर्ग भारतात नाही आणि अशा चिकित्सक प्रेक्षकांची संख्या अगदीच नगण्य आहे. तेव्हा या चित्रपटाचा शेवट अनंत वेलणकरांची सरशी होण्यात केला असता, तर त्यायोगे लोकांचा पोलिसांवरील व शासनयंत्रणेवरील विश्वास दृढमूल होण्यास निश्चितच मदत झाली असती. रामा शेट्टीच्या हत्येनंतर शिक्षा, कारावास या घटनांमुळे अनंत वेलणकर कुजणार आहे, सपणार आहे. ज्योत्स्नावरील त्याच्या नुकत्याच फुटू पहाणाऱ्या प्रेमाच्या अंकुराला कीड लागणार आहे.

६ जुलै, ८४ — नीलकंठ वासुदेव देशपांडे, पुणे

पुणे वार्ता

# पॉश सत्कार—नवे उपक्रम

श्रेयस हॉटेलचे गजबजलेले टेरेस. प्रदर्शनासाठी माडल्यासारख्या रेखीवपणे माडलेल्या खुर्च्या आणि त्याला साजेसेच 'पॉश' व्यासपीठ. दोन–चार छायाचित्रकार आणि सुटा–बुटातील बड्याची सभ्य धावपळ. काहींचे 'ड्युटीवर' असतात तसे चेहरे. एक्झिक्युटिव्ह अधिकाऱ्याची मीटिंग वगैरे वाटावी असे एकंदर वातावरण!

पण हा कार्यक्रम होता १० वीच्या यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्काराचा. एच. एम. टी. या मोठ्या कंपनीने हा कार्यक्रम शनिवारी ७ जुलैला आयोजित केला होता. एस. एस. सी. चा निकाल लागून आता खर म्हणजे जवळजवळ एक महिना होत आला; पण एकदर शैक्षणिक परिस्थितीवर मात्र सध्या बरीच चर्चा सुरू आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा ठराविक शाखाकडे असणारा ओढा, शैक्षणिक सुविधाचा बऱ्याच ठिकाणी असणारा अभाव, शिक्षणाचा दर्जा यावर वर्तमानपत्रांतूनही बरेच काही लिहिले जात आहे. या कार्यक्रमाला आलेले शिक्षणसचालक वि. वि. चिपळूणकर आणि एस. एस. सी. बोर्डाचे अध्यक्ष श्री. महाजन यानीही याच विषयांचा ऊहापोह आपल्या भाषणांमधून केला. अर्थात हे वक्ते शिक्षणअधिकारीच असल्याने त्यांना जाणवलेल्या त्रुटी काही प्रमाणात तरी कमी करणे त्यानी मनावर घेतले असावे असे आपण समजू या.

सुरुवातीला एच. एम. टी. चे व्यवस्थापक श्री. वेंकटेश्वरन यांनी कपनीची आजवरची प्रगती व अशा विद्यार्थ्यांच्या सत्कारामागचा उद्देश स्पष्ट केला. सबंध देशात हा उपक्रम कंपनीतर्फे चालविला जातो, असे त्यांनी सांगितले. या वेळी सलिल कामत, अनुराधा भाटे, राहुल कासराळीकर, वैशाली जोशी इ. यशस्वी विद्यार्थ्यांना कंपनीचे एक घडयाळ बक्षीस देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.

या प्रसगी बोलताना एस. एस. सी. बोर्डाचे अध्यक्ष श्री. महाजन यानी महाराष्ट्रातील शिक्षणाच्या एकंदर परिस्थितीविषयी माहिती दिली. ते म्हणाले, 'महाराष्ट्रात एकूण ७,५०० शाळा आहेत; पण प्रत्येक ठिकाणच्या शिक्षणाचा दर्जा निरनिराळा आहे. विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधा, आर्थिक परिस्थिती, शैक्षणिक वातावरण हेही प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे आहे त्यामुळेच शहरातले विद्यार्थी जास्त प्रमाणात यश मिळवतात. आज परीक्षेचे तंत्र समजावून घेणे आवश्यक बनले आहे.'

शिक्षणसचालक चिपळूणकरांनी सांगितले की, '१० वीला पहिले येणारे विद्यार्थी १२ वीच्या परीक्षेत चमकलेले का दिसत नाहीत, याची कारणे शोधली पाहिजेत. कित्येक घरामध्ये हुशार मुले असूनसुद्धा योग्य वाव न मिळाल्याने ती पुढे येत नाहीत. आता पालकासाठीही एखादी शाळा काढण्याची आवश्यकता आहे.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, 'वक्तशीरपणा, सप्रेषणकौशल्य, व्यक्तिमत्त्व आणि व्यावहारिक शहाणपण या गोष्टी भावी जीवनात यशाचे शिखर गाठण्यासाठी आवश्यक आहेत. श्री. महाजन व चिपळूणकर या दोघानीही पहिले आलेले विद्यार्थी इंजिनिअरिंग, मेडिकलकडेच जाण्याची इच्छा का धरतात असा प्रश्न उपस्थित केला.

वास्तविक या दोन कोर्सेसना जाणे म्हणजे चिपळूणकरानी सांगितलेल्या व्यावहारिक शहाणपणाचाच एक भाग आहे. हे दोन्ही कोर्स अर्थप्राप्तीचे चागले साधन आहेत. पुढचा व्यवसाय कोणता असावा याचाच विचार कोणीही प्रथम करतो. त्यामुळे उगीच दरवर्षी विद्यार्थी तिकडेच का जातात असा प्रश्न भाबडेपणाने विचारण्यात काही अर्थ नाही.

उद्‌गीरच्या राहुल कासराळीकरला हाच प्रश्न विचारला तेव्हा तो म्हणाला, 'हे दोन व्यावसायिक कोर्स फायदेशीर आहेत आणि समाजात आज तरी सर्वच दृष्टीने त्याना महत्त्व आहे.' 'मग तू कुणीकडे जाणार?' असे विचारल्यावर तो म्हणाला, 'मी मात्र आय. ए. एस. ला जाणार आहे. शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग लोकप्रशासनात करावा या उद्देशाने मी सरकारी अधिकारी होण्याचा विचार करतो आहे

या कार्यक्रमाला यशस्वी विद्यार्थी तर आले होतेच; पण त्याचे पालक आणि शाळाचे मुख्याध्यापकही हजर होते. या सगळ्यानाच प्रोत्साहन देण्याची एच. एम. टी. ची कल्पना स्वागतार्ह आहे, आणि त्याबरोबरच शैक्षणिक स्थितीबद्दल होणारी चर्चाही उपयुक्त अशीच आहे.

□

१० वीचा निकाल लागल्यानंतर शाळेपेक्षा पूर्णपणे वेगळे असे महाविद्यालयीन जीवन सुरू होते. हे कॉलेजचे जग वेगळेच असते. एकदा स्वीकारलेल्या शाखेचा सखोल अभ्यास करावा लागतो आणि त्याच वेळी इतर भरपूर 'अॅक्टिव्हिटीज' वगैरे असतात; पण त्यात फारसा भाग घेता येत नाही. एका महाविद्यालयीन विद्यार्थ्याने नुकतीच 'मुक्त विद्यापीठाची' कल्पना माडली आहे. त्याचे म्हणणे थोडक्यात असे की— तात्रिक शिक्षण घेणारा एखादा विद्यार्थी जर एखाद्या महाविद्यालयातील नटसम्राटसारख्या नाटकाचे प्राध्यापकानी केलेले रसग्रहण ऐकण्यास उत्सुक असेल तर त्याला मज्जाव केला जातो. याउलट कलाशाखेच्या विद्यार्थ्यांना सुतारकामासारखे आवडीचे काम करता येऊ शकत नाही. असे साचेबंद शिक्षण देऊन विद्यार्थ्यांचा व्यक्तिविकास होतो का?

त्या विद्यार्थ्याचा हा प्रश्न विचार करण्या जोगा आहे आणि यावर त्याने 'मुक्त विद्यापीठाचा' उपाय सुचवला आहे.

हे विद्यापीठ जेव्हा स्थापन होईल तेव्हा होईल; पण याचा अर्थ विद्यार्थी गप्प बसलेले असतात असा नाही. ठराविक शाखेचा अभ्यास करूनसुद्धा सर्वांना एकत्र आणून केले जाणारे अनेक उपक्रम चालू असतात आणि महाविद्यालयाचे सचालकही त्यांना प्रोत्साहन देताना आढळतात. याचे एक चांगले उदाहरण म्हणजे गरवारे महाविद्यालयातील 'स्टुडट अॅक्टिव्हिटी सेंटर'. नाव मोठं भारदस्त असले तरी याची कार्यपद्धती अगदी साधी आहे आणि तरीही मुक्त विद्यापीठाच्या कल्पनेशी सुसंगत खटपट आहे.

'काय वाट्टेल ते!' सारख्या वक्तृत्व स्पर्धांपासून ते महाराष्ट्रस्तरावरील नाट्यसंगीत-

स्पर्धांच्या संयोजनापर्यंत अनेक कार्यक्रम विद्यार्थी घडवून आणतात. मग त्यात उस्फूर्त लेखनस्पर्धा असेल, एखादे शास्त्रीय प्रदर्शन असेल किंवा बिनधास्त ट्रेकही असेल. महाविद्यालय सुरू झाल्याबरोबर स्टुडंट अॅक्टिव्हिटीवाल्यांचे वातावरणनिर्मितीचे काम सुरू होते आणि 'पब्लिकची' जमवाजमव केली जाते. चांगला ग्रुप तयार होतो आणि मग वर्षभर कार्यक्रमांची धमाल उडवून दिली जाते. ही संस्था काय किंवा मेडिकल कॉलेजमधील 'आर्ट सर्कल' काय किंवा नाटकवेडचा मंडळींनी नुकतीच स्थापन केलेली 'अनुभव' संस्था काय हे सर्व मुक्त विद्यापीठाचेच छोटेछोटे प्रयोग आहेत. अभ्यासक्रमाच्या पलीकडेही बरंच काही शिकण्यासारखं असतं, हे ओळखून केली जात असलेली ही धडपड निश्चितच अनुकरणीय आहे. म्हणूनच नव्या वर्षाच्या सुरुवातीला त्यांची ही ओळख, दहावी पास झालेल्या आपल्या मित्रांसाठी !

—निरंजन



# मुंबापुरी

## ☐ 'ते' ही जबाबदार

गेल्या आठवड्यात 'पंजाब हीलिंग टच्' या विषयावर के. सी. कॉलेजमध्ये राम जेठमलानी यांचे भाषण झाले. जेठमलानी सध्या भारतीय जनता पार्टीचे (सुब्रमण्यम्) स्वामी बनू पाहात आहेत. पंजाबचा प्रश्न हाताळताना कॉंग्रेस आय्ने घातलेला घोळ जगजाहीरच आहे पण आता अकाली दलाचे वकीलपत्र घेतल्याने आपल्या अशिलाच्या सर्वच दोषांवर पांघरूण घालायची जेठमलानींची तयारी दिसते.

आपल्या भाषणांत त्यांनी भिंद्रनवाले यांना सद्वर्तनाचे सर्टिफिकेट दिले. लोंगोवाल यांच्यापेक्षाही भिंद्रनवाले बुद्धिमान होते ! त्यांना उत्तम विनोदबुद्धीही होती असे जेठमलानींचे म्हणणे आहे ! यावरून तुम्हाला जेठमलानींच्या विनोदबुद्धीची कल्पना येईल! आम्हाला मात्र भिंद्रनवाले यांनी थट्टेत इतके लोक ठार मारले याचे आश्चर्य वाटले ! फारच विनोदी माणूस बुवा ! जेठमलानी यांच्या मते भिंद्रनवाले यांनी कधीही खलिस्तानची मागणी केली नाही.

पंजाबमध्ये गेली दोन वर्षे दहशतवाद चालू होता तोवर त्याविरुद्ध आवाज उठविण्याची कुणा नेत्यांना गरज भासली नाही. लोंगोवाल तर सतत दोन वर्षे भिंद्रनवाले आणि त्यांचे साथीदार यांच्या सहवासात सुवर्ण मंदिरात राहिले. इतक्या प्रचंड प्रमाणात शस्त्रास्त्रे मंदिरात आणली गेली त्याची त्यांना आणि इतर अकाली नेत्यांना पूर्ण कल्पना होती. डी. आय. जी. अटवालपासून ते डॉ. तिवारींपर्यंत ज्याप्रकारे निरपराध लोकांचे दिवसाढवळ्या खून अतिरेकींनी पाडले त्याचा जाहीर निषेध त्यांनी कधी केला नाही. आता हेच लोंगोवाल जेठमलानींना साधेभोळे आणि निष्पाप वाटतात. पंजाबमध्ये जी परिस्थिती निर्माण झाली तिला सत्ताधारी पक्षाइतकेच अकाली दल आणि विरोधी पक्षही जबाबदार आहेत.

## ☐ जयकरबाईंची भेट

परवा पुपुल जयकर येऊन गेल्या. जयकरबाईविषयी आम्हाला फारशी माहिती नव्हती. केवळ इतकंच ठाऊक होतं की इंदिरा गांधींच्या 'प्रियदर्शनात' जयकरबाईंचा वाटा मोलाचा आहे.

म्हणजे असं की इंदिरा गांधींच्या पिंगट साडीवर निळीभोर फुलं असतात. किंवा त्यांच्या हातात अधून–मधून काठियावाडी बटवा असतो. किंवा गळयात मोत्यांचा बारीकसा सर असतो. किंवा त्यांच्या पतियाळी लेहेंग्यावर जैसलमेरी कलाबुत असते. हे सर्व, सर्व, सर्व जयकरबाई व्यक्तिशः बघतात, ठरवतात. परवा – गेल्या शुक्रवारी, टू बी प्रिसाईज –– जयकरबाईंची साक्षात भेट घडली.

'बॉम्बे चेम्बर्स ऑफ कॉमर्स अॅण्ड इंडस्ट्रीज' तर्फे बाईचं एन. सी. पी. ए. च्या सभागृहात भाषण होतं. संस्कृती संवर्धनासाठी, अन् देशातल्या प्राचीन, ऐतिहासिक वास्तूंच्या जपणुकीसाठी श्रीमती इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या 'इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अॅण्ड कल्चरल हेरिटेज' या संस्थेची माहिती मुंबईकरांना मिळावी या उद्देशाने जयकरबाई आल्या होत्या. भाषणाला जहांगीर भाभा, कुमुद मेहता, बकुल पटेल, जहांगीर निकलसन, माधव आपटे प्रभृती हजर होते.

बाईंचा बाब मोहक आहे. ही मोहकता अंगभूत वाटते. कुठेही आर्टी–फार्टी मानभावीपणा नाही. कॉकटेल सर्किटवर आढळून येणारा गुलजार लाघवीपणा नाही. बोलणं प्रभावी; परंतु शांत, मंद, आपल्याशीच बोलल्यासारखं, चारशे कोटी रुपये खर्चून गंगानदी काठाकाठाने स्वच्छ करण्याच्या प्रयोगाची त्यांनी माहिती दिली.

बॉम्बे चेम्बर्स जयकरबाईंच्या एवढ्या मोठ्या प्रयोगात रस घेत आहे ही चांगली गोष्ट आहे. हा जिव्हाळा खूप काळ टिको एवढी सदिच्छा.

## ☐ खांदेपालट

तब्बल तीन महिने धूप–दिवे ओवाळून घेतल्यानंतर श्रीमती इंदिरा गांधींनी आमच्या दादांना महाराष्ट्र मंत्रिमंडळात 'किरकोळ आणि मामुली' बदल करण्याची परवानगी दिली. लगेच वसंतदादा पाय ओढत ओढत दिल्लीला जाऊन आले. (ह्या सगळ्या ऐतिहासिक अन् दैदीप्यमान प्रसंगांची साद्यंत हकिगत इंद्रायणी सावकार फ्रेंचमध्ये लिहून काढताहेत असं ऐकतोय.)

ह्या खातेबदलामुळे दादांचं लुळंपांगळं सरकार एकदम खडखडीत बरं होईल असं नव्हे. तरीही दादांना या खांदेपालटामुळे थोडासा 'रिलीफ्' मिळेल असं वाटतं. ज्या चौदा मंत्र्यांनी रामराव आदिकांच्या बाजूने पत्रक काढलं होतं त्यांना तहहयात डच्चू देण्याचा दादांचा इरादा बाईंना सध्या तरी

मान्य नाहीसं दिसतंय.

पण नाही म्हटलं तरी दादांनी ,आदिकांवरचा आपला खुन्नस काढलाच. आदिकांचे पावशेर–नवटाक म्हणून मंत्रिमंडळात वावरणारे चंद्रकांत त्रिपाठी आणि सतीश पेडणेकर यांची महत्त्वाची खाती काढून घेऊन त्याना दादांनी वाटाण्याच्या अक्षता लावल्या आहेत.

त्रिपाठींनी मुबई महापालिकेची समाधी बांधून नगरविकासाच्या नावाने दिवे लावायला घेतले होते. आता त्रिपाठीकडून दादांनी ते खातं काढून घेतलंय. पेडणेकरांच्या बोडक्यावर 'तुरुंग' आलाय. (काय पोअेटिक जस्टीस आहे हो!) बाकी इतर महत्त्वाची खाती सुधाकर नाईक, प्रतापराव भोसले, शेरेकर प्रभृतीकडे गेली आहेत.

आता, या आठवड्यापास्नं विधानसभेच पावसाळी अधिवेशन सुरू होतंय. मंत्रीजन उत्तरे नीट पाठ करून येत नाहीत अशी नेहमी तक्रार होते. किमानपक्षी, खाती तरी पाठ असायला हवीत.

## ☐ मणिभवन–बेघर

एखाद्यान किती म्हणून छळावं! आता या पावसाचंच घ्या ना. जवळजवळ आठवडाभर इतका उच्छाद मांडला. रविवारपास्न तर अक्षरश खिडीतच धरल. मुबईच्या नाड्याच आखडून गेल्या.

त्यात छळवादाची चरम सीमा म्हणजे टी. व्ही.वरचा 'पंडित और पठाण' हा पिक्चर. पावसान फटकारलं अन टी. व्ही नं नागवलं तर कुठे जावं? पुन्हा गाड्याही बंद ना!

मुंबईत मोठं अजब आहे. चारदोन दणदणीत सरी पडल्या की, लोकल गाड्यांची बोब झालीच म्हणून समजा! अजिबात म्हणून हलायच्या नाहीत या गाड्या. ट्रॅकवर नुसत्या ढिम्म उभ्या राहतील. शिवडी–मशिदबंदर–परळ–दादर–ग्रँटरोड–चर्नीरोड भागात पाणी तुबलं की, आम्ही आपले आगगाडीत. तासाभरानंतर स्टेशनला गाडी एकदाची लागली की, वर पुन्हा 'आपकी रेल–यात्रा सुखद हो'चा मारा. असं वाटतं मुबई सोडावी आणि तिथे खान घनीखान चौधरीच्या माल्ड्याला जाऊन राहावं!

अधून–मधून दगा फटका करणाऱ्या गाड्या आणि गृहनिर्माण मंडळाच्या उद्धार टेकूवर जुनीपुराणी डुगडुगणारी घरं हीच पावसाळ्यातली खरी मुबई: बाकी सगळं मृगजळ!

परवा चर्नीरोड–ग्रँटरोडच्या दरम्यान रेल्वे ट्रॅकपाशी दबा धरून बसलेली 'मणि-भवन' ही सात मजली इमारत आचके द्यायला लागली. गेल्यावर्षी अवघ्या अडीच मिनिटात भुईसपाट होऊन अजरामर झालेल्या 'आकाश–दीप' समोरची ही 'मणि–भवन' बिल्डिंग महापालिकेने पाडायला घेतलीये. अन बॉम्बे सेंट्रल–चर्चगेट दरम्यानची रेल्वे वाहतूक गडबडलीये

ह्या मजकुराचे खिळे जुळेस्तवर 'मणि–भवन' पडून जाईलही. महापालिकेच्या जगड्व्याळ फायलीमधल्या कुठल्याशा पानावरची तळटीप म्हणून 'मणि–भवन' रेकॉर्ड बंद राहील. बेघराचा ताफा मात्र वाढत राहील.

–विष्णू जयदेव

## मुक्काम संगमनेर

# संवादयात्रेच्या निमित्ताने

दि. २५ चा सोमवार. संगमनेरच्या महाविद्यालयाचा रम्य परिसर. त्यातील छोटासा पण नीटनेटका असा ग्रंथालयाचा हॉल, निमंत्रितांनी आणि महाविद्यालयातील विद्यार्थी–विद्यार्थिनींनी भरल्यासारखा वाटत होता.

इतके दिवस तेंडुलकराच व्यक्तिमत्त्व 'छाप' पाडणारं आहे असं नुसतं ऐकत होते; पण त्या दिवशी त्याना बघताच त्याच प्रत्यंतर आलं. पांढरीस्वच्छ सुरवार, तितकीच पांढरी पण शोभून दिसणारी दाढी आणि बदामी रंगाचा खादीचा झब्बा, त्याच नाट्यक्षेत्र आणि त्याचे राजकीय विचार यांचीही आठवण करून देत होता.

ग्रंथाली वाचकचळवळीतर्फे काढण्यात आलेल्या 'संवादयात्रे'च संगमनेर हे शेवटचं ठिकाण. सगमनेरात विजय तेंडुलकराचे एकंदर दोन कार्यक्रम ठरले होते. त्यपैकी पहिला-महाविद्यालयातला जाहीर भाषणाचा. प्रा. पठारे या कार्यक्रमाच्या संयोजकांनी प्रास्ताविक केल्यावर जराही दिरंगाई न करता तेंडुलकर उठले. सौम्य पण स्पष्ट शब्दात 'जातीय दंगे व राष्ट्रीय एकात्मता' यांचा ऊहापोह सुरू झाला.

स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतीय नेत्यानी एकात्मतेसाठी तसे कोणतेही खास प्रयत्न केले नाहीत. नतरही त्याच्या सर्व हालचाली जातीयवादी–शक्ती प्रबळ होण्याला पूरक अशाच होत्या. त्यामुळेच आज विघटनवादी शक्तीचा देशात मुक्त संचार होताना दिसतो अस तेंडुलकर म्हणाले. त्याच्या मते भारताची 'राष्ट्रीय एकात्मतेची भानगड' पुन्हा एकदा नीट तपासून बघण्याची वेळ आलेली आहे. पण तरीही अत्यत महत्त्वाचं म्हणजे त्यानी केलेल्या भारताच्या वेगवेगळ्या प्रदेशातल्या प्रवासात त्याना सगळीकडे बधुभाव, आतिथ्यशीलता वगैरे समान गुणधर्म आढळून आले आणि म्हणूनच या सगळ्या दंगली, अराजक याच्याही पलीकडे एकसंध देश म्हणून काही तरी नक्कीच आहे हे त्यांना जाणवलं; पण ते जे काही आहे ते वाढवण्यासाठी 'सोल्यूशन' त्यानाही सापडलेलं नसाव. त्यामुळ इतकच बोलून ते थाबले. ते सुरुवातीलाच म्हणाले होते 'मी आज बोलायला नव्हे तर ऐकायला आलोय' त्याप्रमाणे ते थांबल्यावर अनेक वक्ते सरसावले; पण माझ्या दृष्टीने कार्यक्रम तेंडुलकराच्या बोलण्याबरोबरच सपला होता.

दुसरा कार्यक्रम अत्यंत महत्त्वाचा होता. 'पोफळे हॉल' या प्रशस्त हॉलमध्ये तेंडुलकरांबरोबर नागरिकांची चर्चा व गप्पा असा तो कार्यक्रम थोडासा उपेक्षिला गेला की काय कोण जाणे. कारण सनसनाटी विषय व त्यावर त्याचं भाषण यालाच प्रसिद्धीतही काही अंशी जास्तच महत्त्व दिलं गेल होत; पण तरीही पोफळेहॉलमध्ये अपेक्षेपेक्षा जास्त लोक आलेल दिसले. एका टोकाला गादीवर तेंडुलकर स्वत: आणि सयोजक श्री. चुनेकर बसले होते; त्याच्यासमोर श्रोते अशी व्यवस्था होती, तर दुसऱ्या टोकाला दोन टेबले आणि दोन स्टँडस् ठेवलेले होते. बरीच पुस्तके त्यावर मांडलेली दिसली. तिथे 'ग्रंथालीच्या' वेगवेगळ्या पुस्तकाची विक्री चालू होती. पुस्तकांपाशीही बरीच गर्दी होती. विक्रेते दोघे होते. ते दोघेही ग्रंथालीचे

'फुलटायमर्स' होते. असेच नवनवीन उपक्रम ते करत असतात. संगमनेरला बरीच पुस्तके खपली असे त्यांच्या बोलण्यावरून समजले अनेक पुस्तकं जवळजवळ अर्ध्या किमतीत मिळवाना दिसत होती.

माईकमधनं आवाज ऐकायला यायला लागल्यावर तिकडे गेले. चुनेकरसरानी प्रास्ताविक केलं. लगेचच तेंडुलकर माईकचा ताबा घेऊन चर्चा कशी असेल ते सांगायला लागले. पहिल्यांदा त्यानी पादाक्रांत केलेली क्षेत्रं कोणकोणती ते सांगितलं. चर्चाही नाट्य, चित्रपट, लेखन, दिग्दर्शन, सामाजिक कार्य या त्या क्षेत्रापुरतीच मर्यादित असावी हेही त्यांनी स्पष्ट केलं. प्रश्नकर्त्यांनी प्रश्नच विचारावेत, उत्तरेही देऊन टाकू नयेत हे त्यांनी हळूच सुचवलं.

पहिलाच प्रश्न भुताखेतांवरील विश्वासाचा होता; पण तेंडुलकरांनी अगदीच अनपेक्षितपणे सांगितलं की, ते अजून 'भुते नाहीत' या निष्कर्षाप्रत येऊ शकत नाहीयेत. कारण त्यांचे काही अनुभव याविरुद्ध आहेत. त्याबद्दल बोलताना त्यानी सांगितलेलं एक वाक्य मला फारच महत्त्वाचं वाटलं, 'अंधश्रद्धेविरुद्ध चळवळ करणारे कार्यकर्तेच आज त्या चळवळीवरच अंधश्रद्धा ठेवताना दिसताहेत.' आजच्या बुद्धिवाद्यांनी या तेंडुलकरांच्या वाक्यावर नीट विचार करण्याची वेळ आली आहे.

नंतर लोक आपोआपच त्यांच्या 'पद्मभूषण'कडे वळले.एके काळी 'पद्मश्री'मोठ्या दिमाखानं नाकारणाऱ्या या साहित्यिकानं आज पद्मभूषणच्या स्वीकाराचं हिरीरीनं समर्थन करावं हे लोकाना फारस रुचलेलं दिसलं नाही. तेंडुलकरांनीही मग ती पदवी तशी किती निरुपयोगी आहे, ते पटवण्याचा आणि तरीही कधी तरी आवश्यकता पडल्यास ती जवळ असण्याची जरुरी स्पष्ट करण्याचा फार केविलवाणा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे त्या पदवीचा वापर केवळ स्वत साठीच नव्हे तर 'आम जनतेसाठी 'ही करण्यास ते कधीही तयार असल्याचे त्यांनी सांगून टाकले. आता त्यांच्या त्या किताबाला योग्य रीतीने उपयोगात आणणं बरचस नागरिकाच्या (तेही मुंबईच्या) हातात आहे.

सामाजिक बांधिलकीच्या प्रश्नावर तेंडुलकर गोंधळून गेलेले दिसले. रा. स्व. संघावरही चर्चा येऊन ठेपली तेव्हा लहानपणी ते संघात जात होते हे लोकाना समजलं. त्याचा परिणाम म्हणून की काय पण त्यांनी एकदम संशयास्पद असं विधान केलं. हे विधान समाजवाद्यांची हिंदू धर्मावर आगपाखड आणि मुस्लिम धर्मावरील सौम्य टीका यावरील उत्तरादाखल होतं. ते म्हणाले की, 'आपल्याच घरात आरडा-ओरडा करायला कुणीही बिचकत नाही; पण दुसऱ्याच्या घरात बोलताना आपला आवाज आपोआपच सौम्य होतो, तसेच समाजवादी कार्यकर्त्यांचे होत असावे.'

— समाजवादीदेखील हिंदूधर्म आपला किंवा मुस्लिमधर्म परका मानतात म्हणजे मोठेच नवल म्हणायचे आणि तेही तेंडुलकरांसारख्याने कोणतीही 'पॉलिसी' न वापरता मान्य केल म्हणजे फारच नाही का?

आणि हे सगळं 'अशी पाखरं येती'मधील 'बंडू' वरच्या प्रश्नाने बाहेर आलं. ते बंडूच पात्र आता केरळमध्ये नाटक गेल्यावर C. P. M. च दाखवलं जाणार आहे. तेंडुलकरांनी लोकांना संघ आणि C. P. M. मध्ये तुलना का करायला लावावी? नाटकामुळे चर्चा 'कन्यादान' वर घसरली. तेंडुलकरानी 'कन्यादान' हे नाव उपरोधिक अर्थाने वापरल्याचं स्पष्ट केलं. नाटकातल्या दलितसमस्येवर चर्चा होणार असं म्हणताना एकाने असं म्हणलं की, तेंडुलकरांवर या नाटकामुळे पेपर्समधून फार 'ॲटॅक्स' झाले वगैरे; पण छे! तेंडुलकरांनी 'ॲटॅक' हा शब्दही मान्य केला नाही. त्यांच्या मते इतकं त्या नाटकात काहीही नाही. एकंदरीत तेंडुलकरांनी 'कन्यादान' प्रकरण अजिबात मनावर घेतलेलं नसाव आणि त्यांना प्रत्येक गोष्ट लाइटली घेऊन ती उडवून लावण्याची फार चांगली कला अवगत असावी असं वाटलं. शेवटचा त्याच टाइपचा प्रश्न ऐकून तिथून उठलेच.

पाठीमागच्याच बाजूला श्री. दिनकर गांगल उभे असलेले दिसले आणि राहावलं नाही. त्यांना या संवादयात्रेचं ध्येय किंवा उद्दिष्ट काय म्हणून विचारल्यावर ते म्हणाले, 'आजच्या विसंवादाच्या दिवसात लोकांशी मुख्यत: सांस्कृतिक संवाद साधला जावा' हाच मूळ हेतू आहे.

आजच्या दिवसात लोकांचा राजकारण्यांवर अजिबात विश्वास उरलेला नाही. अशा वेळेला सांस्कृतिक क्षेत्रातली आदर्श मंडळी लोकापुढे आणण, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू लोकांना समजणं आणि कुठे तरी संवादाच्या पातळीवरून प्रश्न समजण व तो सोडवण्यासाठी कार्यरत होणं महत्त्वाचं व आवश्यक ठरतं. म्हणूनच तेंडुलकरांनी संवादयात्रेच्या निमित्तानं 'कन्यादान', 'पद्मभूषण' यावरून त्यांच्याविरुद्ध निर्माण झालेलं वादळ शांत करणं आवश्यकच होतं नाही का? 'प्रतिमा उंचावण्यासाठीचा पद्धतशीर प्रयत्न' वगैरे कोणी तरी उगीचच बोलल्यासारखं वाटलं म्हणून बघायला वळले तोच समारोपासाठी 'गांगलांना' जाणं भाग पडलं आणि आमचा संवाद, तेंडुलकर आणि ग्रंथालीच्या संवादयात्रेची कहाणी संपली.

—स्मिता फाटक


मांडणी, विचार व देखणेपणा या साऱ्यातच 'उत्तम' असे म्हणता येईल असे हे पुस्तक आहे.

—प्र. बा. भोसले
संपादक, बळीराजा मासिक

**योद्धा शेतकरी**

**ले. विजय परुळकर**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

मूल्य : ३६ रुपये

# अनवट

## ☐ असाही 'सामना'

आइका हो मंडळी,

तमाम शहरी–पांढरपेशा–मध्यमवर्गीय–नोकरदार – लेखक–कवी – शिणूमा – नाटक इत्यादीवाल्या मंडळींना दुःखद बातमी !

यापुढं कुठल्यापर साकर कारकान्यावं, तेच्या चेरमनवं, आनिक झालंच त, तेंच्या 'कोबडी न् बाटली पार्टीवं', कुनाला कायबाय लिव्हता यायच न्हाय.

'अवं पर असं कावा बर मनता !'

आरं, ए घसाडीच्या, आपली कोळपेवाडी हाय का, कोपरगावाजवळ ? साकर कारकाना हाय तितं (का तथ ?)

हां–जी, पर–त्येचं काय ?

'तिथल्ल्या नव्या डायरेक्टरबोर्डानं ठरिवलंय का, आत्तापतूर झालं, पर यापरतं कुन्यापर 'व्हायपी' का अजूक कोनालापर कारकान्याच्या गेष्टहौसावर कोंबडीची पार्टी करायची न्हाय. दारूचा धिंगाना हूं द्याचा नाय. –थोप, पुढ आइक. फुकटात मिळणारी शिग्रेट न् काडी पर मिळणार नाय !'

'या बाबो – – आक्रितच की हो. पर ह्ये खूळ कश्यापायी ?'

'अरं बाहबा ऽ, या सुटाबुटातल्या, झब्बा-शर्टातल्या, चष्मास्कूटरवाल्या माशिक–पाक्षिक–साप्ताहिक–नाटक–शिनेमिक मंडाळींनी, लेका पार बदनाम केलंय आपल्याला ! त्ये तिथं हाटिलात जाऊन काय पर हडपतेत, कॅब्रे–विग्रजी शिनेमे पघत्येत आन् आपला ग्येष्टौसावरचा खकाना त्यांच्या डोळ्यात भरतो.'

'तिथं खुर्चीवर बसून मग 'हे सर्व कुठे चाललय, ते तिथे काय होतंय' असं लिव्हतेत आन दुसरीकडे लगीच 'खास कव्हरष्टोरी–चटकदार–मनोरजक खास अंक' छापतेत. बरं – जाय तू. तुला नाय उमगायचं हे लफडं !

'बा ऽ र, पर हे कुनाचं डोकं ?'

'आपले नगरचे शंकरराव काळे–माजी मंत्री. कोळपेवाडीचे चेरमन.'

'आसं, मग कोल्हे–पाटील का माग ऱ्हायले ?'

'माग कुनीच ऱ्हानार न्हाय. इथं शुद्धी करून सर्वे आता मुंबैला जाऊन कोंबडी हानतील. आइचन हाय आपल्या नोकरा–चाकराची – – महिना–पधरादि मिळणारा झनझनीत रस्सा आता कुठनं ?'

पुण्या–मुंबईकडच्या चटकदार-ज्ञान–प्रबोधनवाल्या नियतकालिकातून 'गिरामीण' बोली म्हणून फ्लॅटमध्ये राहणारे अशी भाषा वापरतात. आम्हाला ती येत नव्हती; पण आता वाचून वाचून येते. उणीवांबद्दल (त्यांना) क्षमा करावी !

## ☐ 'माणसाईना दिवा'

रविशंकरमहाराज गेले १०१ वर्षांचे होऊन ! कोणाला माहीत होते ? गांधीवादी, सर्वोदयी वगैरे म्हणून त्यांच्यावर आता अग्रलेखादि सामग्री येत आहे. नेहमीप्रमाणेच.

इतर सर्व गोष्टी जरी दुर्लक्षिल्या तरी या माणसाची एक जिद्द होती. त्या वेळी गुन्हा झाला की, धरून नेल्या जाणाऱ्या आदिवासी व 'खेडूत' (शेतकरी) मंडळींना मायबाप इंग्रज सरकारने धारेवर धरले होते. त्यांना दोन वेळा ५०–६० मैलावरल्या पुलिसस्टेशनमध्ये हजरीला जावे लागे. नच गेल्यास लॉक–अप !

महाराज सत्याग्रही होते. असलेला कायदा पाळावा. तो मोडू नये कायदा पाळूनच त्याचा प्रतिकार केला पाहिजे या गांधीवादी भूमिकेवरून त्यांनी महीनदीच्या खोऱ्यातील जंगला–झाप्यातून राहणाऱ्या आदिवासींना पोलीस–लॉकअपमधून सोडविणे, त्याना हजरी द्यायला लावणे ही कामे केली एखादा चुकार निघे मग महाराज स्वत चालत त्याच्या घरी येत. तो नसला की, उलट–पावली ४०-५० मैलावर पोलिसाकडे जाऊन रदबदली करत. नसता स्वत: जामीन राहत. एकही उणा शब्द न काढता आदिवासी–शेतकऱ्याच्या घरी, त्याना हजरीवर घेऊन जाण्यासाठी सोशिकतेने वाट पाहत. अनेक वेळा दिवसाला ५०–६० मैलाची रपेट केवळ एका माणसाच्या हजरीसाठी ते करत. त्याच्या बायकामुलांना मायेची ऊब देत. संध्याकाळी अंगणातल्या चारपाईवर बसून गांधीजीच्या चळवळीच्या 'गप्पा' मारत.

हे सर्व का ? त्याची इच्छा असे की, या गरीब मंडळींनी पोलिसाची अटकेची सतत दहशत मागे लावून घेऊ नये. अधिकाऱ्यांना त्याच्याविषयी विश्वास वाटावा. एकदा हा विश्वास वाटला की, त्याना पोलीस त्रास देणार नाहीत. ही प्रक्रिया फार चेंगट-लांबची असते. तिच्यात दोषही असतील; पण रविशंकरमहाराजानी ती वाट घालून दिली. विरोधाबरोबर दुसरी बाजूही पक्की व्हावी.

झवेरचंद मेघाणी या गुजराती साहित्य-विश्वातल्या अवलियाने, महाराजाच्या या टाचा झिजवण्यावर 'माणसाईना दिवा' हे पुस्तक लिहिले. बऱ्याच वर्षांपूर्वी अच्युतभाईंनी त्याचा 'माणुसकीचा दिवा' हा मराठी अनुवाद केला होता.

अंधारून येत असताना, महीच्या काठावरील रानातनं हा म्हातारा आपला चालतच होता- दुसऱ्यांसाठी !

## ☐ टेलिकॉन्फरन्स


लंडन, सिडनी, टोकियो, फिलाडेल्फिया यासारख्या ठिकाणी बसून परस्पराशी प्रत्यक्ष चर्चा करायची कल्पना व योजना अनेकदा मांडली गेली. मात्र गेल्या महिन्यात अशी 'टेलिकॉन्फरन्स' जगात प्रथमच भरली होती. अमेरिका, जपान, कॅनडा, ऑस्ट्रेलिया-सारख्या देशातील दोन हजार तज्ज्ञांनी जागीच बसून चर्चेसह ५० निबंध तेरा सत्रामध्ये सादर केले !

'इटेलसॅट' या आंतरराष्ट्रीय उपग्रह-संघटनेने ब्रिटिश दूरसंचार संघटनेच्या मदतीने तीन दिवसाची दूर परिषद भरवली होती.

उपग्रहसंचारयोजनेमुळे दुहेरी किंवा तिहेरी अशी चर्चा होऊ शकली. शेवटच्या एका तासात तर सर्व केंद्रांना एकत्र टेलिव्हिजनवरून संपर्क साधता आला यासाठी इटेलसॅटने अटलांटिक पॅसिफिक व हिंदी महासागरावरील आपल्या उपग्रहांना राबविले.

हे सर्व होत असताना प्रा., डॉ. वगैरें-सारख्या बुद्धिवंत परिषदार्थींनी एक धोका वेळीच लक्षात घ्यायला हवा. सेमिनार–वर्कशॉप–वगैरे नावांखाली परगावचे किंवा परदेशाचे सुटीवजा दौरे यामुळे बंद पडण्याची धास्ती आहे.

(पृष्ठ ३२ वर चालू)



# मन:चक्षूचे सामर्थ्य

विक्रमच्या यशाचे रहस्य कशात होते ? या प्रश्नाचे उत्तर असे की, काही मानसचित्रांचा कल्पकतेने उपयोग करून त्याने स्वतःच्या मनात धूम्रपानाबद्दल तिटकारा निर्माण करण्याची कला आत्मसात केली, यातच त्याच्या यशाचे रहस्य दडलेले होते. कारण त्याच्या मनात एकदा धूम्रपानाबद्दल तिटकाऱ्याची भावना वाढीस लागल्यावर, मग साहजिकच सिगारेट ओढण्याची त्याची तलफ मावळ लागली व अखेर ती अस्तंगत पावली !

☐

लेखांक : पाच । लेखक : कि. मो. फडके

## अनिष्ट सवयींचा बीमोड

मन:चक्षूच्या सामर्थ्याचा उपयोग करून रेखा आपली प्रगती करून घेत होती हे पाहून विक्रमला स्फूर्ती मिळाली होती, हे तुमच्या लक्षात असेलच. मानसचित्रांच्या साहाय्याने धूम्रपानाच्या व्यसनातून त्याला स्वतःची मुक्तता करून घेता येईल का, असे त्याने मला विचारले होते. त्याचा तो प्रश्न म्हणजे काही उगीच आपली सहज केलेली एक चौकशी नव्हती. धूम्रपानाचे व्यसन सोडून द्यावे असे त्याला मनापासून वाटत होते. त्यामुळे त्याने माझी भेट घेतली आणि अखेर मन:चक्षूच्या सामर्थ्याचा अवलंब करून त्याने आपले धूम्रपानाचे व्यसन सोडून दिले. त्याच्या प्रगतीचा आढावा घेतला तर माणसाला आपल्या अनिष्ट सवयींचा बीमोड करण्यासाठी मानसचित्रांचा उपयोग कसा करता येतो, हे समजणे सोपे जाईल.

एक दिवस संध्याकाळी विक्रम मला भेटावयास आला. तो माझ्याशी बोलू लागल्यावर थोड्याच वेळात मी चटकन ओळखले की, धूम्रपानाचे व्यसन सोडून द्यावे असे जरी त्याला प्रामाणिकपणे वाटत होते तरी तसे करणे त्याला जमेल की नाही याबद्दलची शंका त्याला छळत होती. कारण माझ्याशी बोलताना, तो वारंवार मला सांगत होता की, धूम्रपानाचे व्यसन आत्मघातकी असते, हे त्याला माहीत असूनही आजपर्यंत त्याने ते व्यसन सोडून दिले नव्हते, म्हणजे बहुधा त्याच्याजवळ पुरेशी इच्छाशक्ती नव्हती किंवा त्याचे मन खंबीर नव्हते. त्याच्या मनाची होत असलेली कुतरओढ पाहून मी ठरवले की, 'इच्छाशक्ती' किंवा 'खंबीर मन' या कल्पनेकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोण त्याला समजावून सांगणे हितावह ठरेल आणि म्हणून मी त्याला खालील किस्सा सांगितला.

वीस शाळकरी मुलांच्या एका गटाला एका वर्तुळाकार टेबलाभोवती बसविण्यात आले. प्रत्येक मुलापुढे टेबलावर एक बशी ठेवली होती आणि त्या बशीत तीन गरम बटाटे-वडे ठेवले होते. त्या मुलांना असे सांगितले होते की, समोर गरम बटाटे-वडे दिसत असूनसुद्धा ते खाण्याचा मोह तुम्ही किती वेळ आवरू शकता हे पाहवयाचे आहे. अर्थात तुम्हाला वाटेल तेव्हा बटाटे-वडे खाण्याची तुम्हाला परवानगी आहे. तुमच्यावर बंधन असे कोणतेच नाही. फक्त तुम्ही तुमच्या मोहाला स्वखुशीने किती वेळ आवरून धरू शकता, हे पाहवयाचे आहे.

वरील प्रयोग वीस शाळकरी मुलांच्या दुसऱ्या एका गटावर करून पाहिला. मात्र या गटातील मुलांना असे सांगितले की, तुमच्या मोहाला दीर्घकाळ कह्यात ठेवण्यासाठी तुम्हाला एक युक्ती योजता येईल. ती युक्ती म्हणजे तुम्ही तुमच्या समोरील बटाटे-वडे पाहून मनात असे चित्र रेखाटा की, ते बटाटेवडे म्हणजे रंगविलेल्या पुठ्ठ्याच्या वेष्टणात गुंडाळलेले दगड आहेत आणि तुम्ही ते खाण्यास सुरुवात केलीत तर लवकरच तुमच्या दातांचे तुकडे पडण्याची वेळ येईल !

वरील प्रयोगावरून असे दिसून आले की, दुसऱ्या गटातील मुलांनी आपल्या मन:पटलावर ज्या प्रतिमा रेखाटल्या होत्या, त्यामुळे त्यांना आपल्या बटाटे-वडे खाण्याच्या मोहाला अधिक वेळ प्रतिबंध करता आला.

हा सर्व किस्सा सांगून झाल्यावर मी विक्रमला असे विचारले की, पहिल्या गटातील मुलांमध्ये 'इच्छाशक्ती' कमी होती किंवा त्यांचे 'मन खंबीर नव्हते' असे म्हणता येईल काय ? थोडा वेळ विचार करून विक्रम म्हणाला की, तसे म्हणता येणार नाही. कारण त्या गटातील मुलांनी बटाटे-वड्यांसंबंधी काही अप्रिय प्रतिमा आपल्या मन:पटलावर स्पष्टपणे रंगविल्या असत्या, तर कदाचित त्यांनाही आपल्या बटाटे-वडे खाण्याच्या मोहाला जास्त वेळ प्रतिबंध करता आला असता.

## विक्रमच्या यशाचे रहस्य

'इच्छाशक्ती' किंवा 'खंबीर मन' या कल्पनेकडे पाहण्याचा हा नवा दृष्टिकोण समजावून घेतल्यावर विक्रमने आपल्या धूम्रपानाच्या व्यसनाचा बीमोड करण्याचा निर्धार केला. दुसऱ्या दिवशी सकाळी आंघोळ वगैरे झाल्यावर, तो डोळे मिटून शांतपणे आरामखुर्चीत बसला. नंतर आपले सर्व अंग अगदी सैल सोडून, त्याने हळूहळू स्वतःच्या मनःपटलावर कल्पनेच्या कुंचल्याने खालील प्रतिमासृष्टी उभी करण्यास सुरुवात केली.

सकाळचे ८॥ वाजले आहेत. विक्रमने नास्ता संपविला आहे व तो कामावर जाण्यास निघाला आहे. नेहमीप्रमाणे त्याने एक सिगारेट पेटवून ती ओढण्यास सुरुवात केली आहे, सिगारेटच्या झुरक्यांमुळे त्याच्या श्वासनलिकेतील केशतंतूंना, फुप्फुसांना, रक्तवाहिन्यांना व हृदयाला अपाय होऊ लागला आहे. सिगारेटमधील निकोटीन हे विषारी द्रव्य आपले काम चोखपणे बजावीत आहे आणि तंबाखूच्या ज्वलनक्रियेतून जे अनेक विषारी वायू निर्माण होत आहेत, तेही विक्रमच्या शरीराला निरनिराळ्या प्रकारे रोगट बनवीत आहेत. सिगारेटच्या प्रत्येक झुरक्याबरोबर विक्रमचे शरीर आतून पोखरले जात आहे. इतकी वर्षे तो धूम्रपान करीत असल्यामुळे अगोदरच त्याच्या प्रकृतीला जो काही अपाय झालेला आहे, त्यात आणखीनच भर पडत आहे; परंतु विक्रमचे सिगारेट ओढण्याचे काम तसेच चालू राहिले आहे व लवकरच त्याला वैद्यकीय तपासणी करून घेतल्यावर असे आढळून आले आहे की, त्याच्या डाव्या फुप्फुसाला कर्करोगाची बाधा झालेली आहे !

विक्रमने आपल्या मनःपटलावर वरील प्रकारची मानसचित्रे आठ दिवस इतक्या स्पष्टपणे रेखाटली की, नवव्या दिवशी नास्ता झाल्यावर कामावर जाताना त्याने सिगारेट ओढलीच नाही. त्या दिवशी दुपारी जेवण झाल्यावर त्याने चार सिगारेटस ओढल्या; परंतु त्याने आपल्या मनःपटलावर धूम्रपान करण्यासंबंधी इतक्या अप्रिय व मन अस्वस्थ करून सोडणाऱ्या प्रतिमा रंगविण्याचा सराव केला की, हळूहळू त्याला धूम्रपानाविषयी तिटकारा वाटू लागला. त्यामुळे काही दिवसांनी त्याचे धूम्रपान करण्याचे प्रमाण कमीकमी होत गेले आणि कालांतराने तर त्याने धूम्रपान करणे अजिबात बंद केले !

विक्रमच्या यशाचे रहस्य कशात होते ? या प्रश्नाचे उत्तर असे की, काही विशिष्ट मानसचित्रांचा कल्पकतेने उपयोग करून त्याने स्वतःच्या मनात धूम्रपानाबद्दल तिटकारा निर्माण करण्याची कला आत्मसात केली, यातच त्याच्या यशाचे रहस्य दडलेले होते. कारण त्याच्या मनात एकदा धूम्रपानाबद्दल तिटकाऱ्याची भावना वाढीस लागल्यावर, मग साहजिकच सिगारेट ओढण्याची त्याची तल्लफ मावळू लागली व अखेर ती अस्तंगत झाली !

मनःचक्षूच्या सामर्थ्याचा उपयोग करून विक्रमने ज्याप्रमाणे स्वतःच्या मनात धूम्रपानाबद्दल तिटकारा उत्पन्न केला, त्याचप्रमाणे एखाद्या लठ्ठ माणसाला आपल्या खादाडीवर ताबा ठेवून वजन कमी करण्यासाठी आपल्या मनात काही खाद्यपेयांविषयी तिटकारा निर्माण करता येईल. उदाहरणार्थ, लठ्ठ माणसाला, तो जे गोड पदार्थ खात असतो, त्या पदार्थांमुळे त्याच्या वजनात कशी भर पडत असते व त्यामुळे त्याच्या आरोग्यास कसा अपाय होत असतो,



याविषयी अनेक स्पष्ट प्रतिमा आपल्या मनःपटलावर तपशीलवारपणे रेखाटता येतील. आपल्या मनःपटलावर अशा अप्रिय प्रतिमा पुन्हापुन्हा रेखाटल्यामुळे, त्याच्या मनात त्याच्या प्रकृतीला अपायकारक ठरणाऱ्या अगदी आवडीच्या गोड पदार्थांबद्दलसुद्धा तिटकारा उत्पन्न होईल आणि त्याने अशा अप्रिय प्रतिमा आपल्या मनःपटलावर वारंवार रेखाटण्याचा सराव केला तर, कालांतराने तो गोड पदार्थांपासून चार हात दूर राहून, स्वतःचे वजन कमी करू शकेल.

लठ्ठ माणूस ज्याप्रमाणे आपल्या खादाडीला आळा घालून, आपले वजन कमी करू शकेल, त्याचप्रमाणे मद्यपानाचे व्यसन असलेला माणूसही आपल्या आत्मघातकी व्यसनावर मात करू शकेल. त्यासाठी त्याने आपण जेव्हा मद्याचे पेले पोटात रिचवीत असतो तेव्हा आपल्या प्रकृतीवर कोणकोणते अनिष्ट परिणाम होत असतात, याचे सुस्पष्ट चित्र आपल्या मनःपटलावर रेखाटण्यास शिकले पाहिजे शिवाय आपल्या मद्यपानाच्या व्यसनामुळे आपल्याला आर्थिक, कौटुंबिक व सामाजिक अडचणीही कशा बेजार करतात, याचे चित्र आपल्या मनःपटलावर रंगवून त्याला आपल्या मनात मद्यपानाबद्दल तिटकारा निर्माण करण्याच्या कामाला अधिक गती देता येईल. असे केल्यामुळे त्याच्या मनःपटलावरील मद्यपानासंबंधीच्या अप्रिय प्रतिमा जास्त–जास्त सुस्पष्ट व रेखीव होत जातील व त्याला मद्यपानाबद्दल अत्यंत तिटकारा वाटू लागेल. इतकेच नव्हे तर एक दिवस असा उजाडेल की, ज्या दिवशी कोणी मद्याचा पेला त्याच्या हातात दिला

पृष्ठ २९ वर

# ग्रंथाली
# एक दिशाहीन वाचक चळवळ

ग्रंथाली या अभिनव वाचकचळवळीची सुरुवात ऐन आणीबाणीत झाली. १९७५ साली दुर्गाबाई भागवतांच्या अध्यक्षतेखाली कऱ्हाडला जे साहित्यसमेलन भरले होते, त्या समेलनात बाईंचे एक पुस्तक प्रकाशित करून ग्रंथालीचे तरुण कार्यकर्ते मराठी प्रकाशनव्यवसायाला आलेली मरगळ झटकून टाकायला उत्साहाने पुढे आले. हे सर्व कार्यकर्ते तरुण होते. तरुण जेव्हा काही चळवळ करायला बाहेर पडतात तेव्हा ते अस्वस्थ असतात. त्यांना परंपरेची चौकट पार मोडून टाकायची असते. तारुण्य हे नेहमी उसळ्या घेत असते. आपल्या आजूबाजूचे सारे जग त्यांना साचेबंद वाटते. तेथे त्यांचा कोंडमारा होतो.

त्याना सतत वाटत असते की, जुनी खोडं नवीन काही करायला तयार नाहीत. याना दूरदृष्टी नाही, कल्पकता नाही, धाडस नाही. ही मुर्दाड आहेत ! रूढ परंपरेच्या बाहेर ही मेली तरी जाणार नाहीत व विशेषत: हे आपल्याला नवीन काही करायला कसलीच संधी देणार नाहीत. या वडीलधाऱ्या मंडळींचे काहीच या तरुण मडळीना आवडत नसते. या वडीलधाऱ्या मंडळीविरुद्ध तरुणाचा राग सतत धुमसत असतो. तारुण्याचे हे अबाधित वैशिष्ट्य आहे.

अर्थात आमची ग्रंथालीची ही तरुण मंडळी स्वातंत्र्योत्तर काळातील होती. परक्यांविरुद्ध बंड करून उठणाऱ्या स्वातंत्र्यपूर्व काळातील तरुणाशी यांची तुलना करता येणार नाही. त्या काळातील तरुणांना परक्यांविरुद्ध लढायचे असल्यामुळे आपल्या ध्येयासाठी ते देहदंड सोसत, वाटेल त्या त्यागाला तयार होत. आपल्या ध्येयासाठी आपले आयुष्य उधळून लावायची त्यांची तयारी होती... स्वातंत्र्यानंतरच्या तरुण मडळीची या बाबतीत मोठी पचाईत झाली आहे. त्याना स्पष्ट असे ध्येय आपल्यापुढे ठेवता येत नाही. शिवाय आता लढाई द्यायची आहे स्वकीयांशी. स्वकीयांशी दोन हात करणे, त्यांच्या विरुद्ध उघड उघड बंड पुकारून, आपल्या वडीलधाऱ्याना नेस्तनाबूद करून, त्याची जागा आपण घेणे हिंदूना फार प्राचीन काळापासून अवघड वाटत आले आहे महाभारतात अर्जुनाला स्वकीयांविरुद्ध लढायला उभे करण्यासाठी श्रीकृष्णाला गीता सागावी लागली व संपूर्ण गीता ऐकूनही, ज्यांना मारायचे नाही त्याना अर्जुनाने मारले नाहीच. आपल्याकडील पितापुत्र–संघर्षात पुत्र वडिलाविरुद्धचा रोष किती बालिशपणे प्रकट करतो हे पाहाणे निश्चितच मनोरजक ठरेल.

ग्रंथालीच्या तरुण कार्यकर्त्यांनी चळवळीच्या सुरुवातीला मराठीतील मातबर प्रकाशकाच्या भेटीगाठी घ्यायला सुरुवात केली. त्यांच्याशी आपल्या कल्पनांविषयी उत्साहाने चर्चा करायला सुरुवात केली. त्यानी बालिश उत्साहाने प्रकाशकांना आपली योजना समजावून सांगितली. ती योजना ढोबळ मानाने अशी होती– या कार्यकर्त्यांना प्रकाशकांची जी पुस्तके चांगली वाटतील त्यातील ३००–४०० पुस्तके उत्पादक किमतीला (cost–price) त्यानी या मंडळीना द्यावी. ती पुस्तके ग्रंथाली आपल्या सभासदांना त्याच किमतीला देणार. जसजसे सभासद वाढतील तसतसे हे जास्त प्रती घेणार. बाकीच्या प्रती छापील किमतीला प्रकाशकाने इतरांना (पुस्तकविक्रेते, लायब्ऱ्या व इतर वाचक) विकाव्या. कोणा प्रकाशकाने या योजनेला मान्यता दिली नाही. मग या तरुण कार्यकर्त्यांनी आपली अभिनव कल्पना राबवण्यासाठी स्वत:च प्रकाशनक्षेत्रात उतरायचे ठरवले. जे कोणी वाचक या योजनेत सामील होतील त्याना उत्पादक किमतीला पुस्तक द्यावे व इतरांना तेच पुस्तक छापील किमतीला विकावे अशी त्यांची योजना आहे. याप्रमाणे गेल्या नऊ वर्षांत त्यांनी जवळजवळ २५–३० पुस्तके प्रसिद्ध केली आहेत.

ग्रंथाली पुस्तके उत्पादक किमतीला विकते हा दावा खोटा आहे व त्याच्या कोणत्याही पुस्तकांचा हिशेब मांडून ते सिद्ध करता येईल. या पद्धतीने आजही अनेक प्रकाशक नफा घेऊन, सवलतीत, अर्ध्या किमतीत वाचकांना पुस्तके विकतात. म्हणजे ग्रंथाली अभिनव पद्धतीने पुस्तके वाचकाना देते हा त्यांचा दावा बिनबुडाचा आहे. या तरुण मंडळीनी जी पुस्तके प्रसिद्ध केली त्यांपैकी ३–४ पुस्तकांच्या तीन आवृत्त्या

### ग्रंथालीने प्रसिद्ध केलेली प्रमुख पुस्तके

| पुस्तकाचे नाव | लेखक | छापील किंमत | सभासदांसाठी किंमत |
|---|---|---|---|
| १) क्लोरोफॉर्म (तिसरी आवृत्ती) | डॉ. अरुण लिमये | २० रु. | १० रु. |
| २) बलुतं ( ,, ,, ) | दया पवार | २२ रु. | ११ रु. |
| ३) सिंहासन ( ,, ,, ) | अरुण साधू | ३६ रु. | १५ रु. |
| ४) ज्वालामुखीच्या तोंडावर (दुसरी आवृत्ती) | कुमार केतकर | २२ रु. | ११ रु. |

'बोल वाचका हमला बोल' सारख्या आचरट घोषणा देऊन आपण पुस्तकाच्या जगात फार क्रांती केली असे त्यांना वाटते. आश्चर्य एवढेच की, अशा बालिश व आचरट चाळयांना महाराष्ट्रातील थोर थोर विद्वान, मोठमोठ्या बुद्धिवंतांनी पाठिंबा द्यावा, त्यांना डोक्यावर घेऊन नाचावे ! या बुद्धिवंतांनी आपली शास्त्रीय विचारसरणी खुंटीला टांगली आहे की काय ? का साधा विचार करण्याची कुवतही त्यांना राहिलेली नाही ?

● रमेश रघुवंशी, गजानन बुक डेपो, मुंबई–पुणे ●

निघाल्या, म्हणजे ६–७ हजार प्रती त्यांनी वाचकापर्यंत पोचवल्या. (त्यात वाचनालयाने किती घेतल्या हा हिशेब वेगळा काढावा लागेल.)

वाचकामध्ये पुस्तकांसंबंधी गोडी निर्माण व्हावी म्हणून त्यांनी महाराष्ट्राच्या काही भागातून ग्रंथयात्रा काढली. मुंबईच्या सोसायट्यातून प्रदर्शने भरवली. वाचक–लेखक यांचा संवाद व्हावा म्हणून लेखकांना दरवेशासारखे गावोगाव हिंडवले. ही आजवर या चळवळीची फलश्रुती आहे.

लेखाच्या सुरुवातीला मी म्हटले आहे की, हिंदूंच्या पिता–पुत्र–संघर्षात पुत्र बापाविरुद्धचा रोष अतिशय बालिशपणे प्रकट करतो व त्याचा कोणी अभ्यास केला तर तो निश्चितच मनोरंजक ठरेल.

ग्रंथालीच्या तरुण कार्यकर्त्यांच्या मनात प्रस्थापित रचनेविरुद्ध जो रोष होता, त्यामुळे ते जे खूप अस्वस्थ झाले होते, त्यांची जी कोंडी झाली होती, ही जुनाट कालबाह्य रचना तोडून–मोडून, त्यांची त्यांना स्वतःच्या कल्पनेप्रमाणे जी फेरमांडणी करायची होती त्याचा उद्रेक फक्त २५।३० पुस्तके प्रकाशित करण्यातच का झाला ? ते आज काहीही म्हणोत, चळवळ सुरू करण्याच्या काळातील त्यांच्या मनःस्थितीचा विचार केला तर असे दिसून येईल की, त्यांना प्रकाशनव्यवसायात आमूलाग्र बदल करायचा होता. सहा कोटींच्या महाराष्ट्रात ५।६ लाखांची आवृत्ती त्यांना हातोहात विकून दाखवायची होती. जे या क्षेत्रातील दुढ्ढाचार्यांना जमले नाही अशी समाजात प्रचंड खळबळ माजवणारी पुस्तके त्यांना प्रकाशित करायची होती. छापील शब्दांचा त्यांना स्फोट करायचा होता. महाराष्ट्राच्या सामाजिक अन् सांस्कृतिक जीवनात त्यांना प्रचंड उलथापालथ घडवून आणायची होती. पवनचक्कीचा राक्षस समजून त्याच्यावर तलवार चालवणाऱ्या डॉन क्विक्झोटचा उत्साह त्यांच्या अंगात संचरला होता. त्यांनी आपले ध्येय धूसर ठेवले होते, म्हणूनच ते त्यांना फार सुंदर व स्वप्निल वाटत होते. ध्येय स्पष्ट असले की स्वप्न विरून जाते व ओबड–धोबड पायवाटेवरून प्रवास करावा लागतो.

## प्रकाशक–ज्ञानाचा डोअरकीपर

या वरील गोष्टीबाबत आजही त्यांच्याशी चर्चा केली तर ते या सर्व गोष्टी धुडकावून लावतील व आपण वाचक वाढवण्याच्या दृष्टीने काय काय केले, आपण किती श्रेष्ठ दर्जाची पुस्तके प्रकाशित केली याचा पाढा वाचतील. आजही त्यांना आपले धूसर ध्येय फार प्रिय आहे व या स्वप्निल जगातून आजही ते बाहेर पडायला तयार नाहीत. त्यांचा बालिश उत्साह अजूनही कायम आहे !

या ठिकाणी या चळवळीच्या आर्थिक अंगाचा मला विचार करायचा नाही. एक तर त्यांना आपला आर्थिक व्यवहार फार गुप्त ठेवायचा आहे. खोपोली येथील ग्रंथव्यवहार परिषदेत या चळवळीचे कार्यवाह श्री. दिनकर गांगल यांना 'तुम्ही पुस्तकाच्या किंमती कशा ठरवता ?' हे अनेकांनी जाहीररीत्या पुन्हा पुन्हा विचारले होते, त्यांनी त्या वेळी उडवाउडवीची उत्तरे दिली होती. दुसरे, त्यांना फोर्ड फाउंडेशनतर्फे जी देणगी मिळाली आहे असे ऐकिवात आहे, त्यांचा विनियोग त्यांनी कसा केला, याबद्दलही त्यांनी सोयिस्कररीत्या आजवर मौन पाळले आहे.

त्यांचे ध्येय व त्यांनी या नऊ वर्षांत केलेली वाटचाल यात जी प्रचंड तफावत दिसते ती का, याचीच मला प्रामुख्याने चर्चा करायची आहे.

ग्रंथाली ही एक अभिनव वाचक–चळवळ आहे व वाचकांनी पुस्तके विकत घेऊन वाचावी असा त्यांचा मुख्य आग्रह आहे. या नऊ वर्षांत त्यांनी जी पुस्तके प्रकाशित केली व विकली तेवढी सर्वसामान्य प्रकाशकही विकत आला आहे. या चळवळीचे मुख्य कार्यकर्ते प्रसिद्धिमाध्यमांच्या महत्त्वाच्या स्थानावर नोकरी करतात. त्यामुळे त्यांना रेडियो, टि. व्ही., वर्तमानपत्रे या माध्यमांचा आपल्या प्रकाशनासाठी अगदी विनासायास वापर करता येतो जो पुरोगामी मुखवटा त्यांनी धारण केला आहे त्यामुळे शासनाचा, तथाकथित बुद्धिवंतांचा (यांना नेहमी स्वतःला पुरोगामी म्हणवून घेणे फार आवडते.) पाठिंबाही त्यांना सहज मिळतोय. काहीच करता येत नाही तर निदान हे करावे, अशा भावड्या कार्यकर्त्यांचा ताफा त्यांच्या दिमतीला हजर आहे. एवढे प्रचंड साहाय्य त्यांना लाभत असूनही, त्यांची जी सुरुवातीची ध्येये होती, त्याच्या पायरीपर्यंतही ते आजवर का पोहोचू शकले नाहीत ?

पहिली गोष्ट आपण नेमके काय करायला हवे हे त्यांना आजवर धडसे समजलेले नाही. त्यांचा प्रचंड गोंधळ उडालेला आहे. त्यांना एकीकडे चांगली, उत्कृष्ट, प्रचंड धक्का देणारी, खळबळ उडवणारी, नवीन प्रतिभाशाली पुस्तके प्रकाशित करायची आहेत दुसरीकडे साबण, टूथपेस्टसारखी पुस्तके घरोघर पोहोचवायचीदेखील आहेत. आज ते या दोन्ही डगरींवर पाय ठेवून आहेत. या दोन्ही गोष्टी परस्परविरोधी आहेत हे त्यांच्या लक्षात येत नाही या दोन्ही कल्पनाविषयी त्यांचे भयानक अज्ञान तर आश्चर्य करण्याजोगे आहे.

त्यांना प्रकाशनव्यवसायाच्या एकूण स्वरूपाविषयी प्राथमिक ज्ञानदेखील नाही ! पुस्तके उत्पादक किंमतीला (cost-price) वाचकाला उपलब्ध करून द्यावी ही कल्पनाच मुळी प्रकाशनव्यवसायाचा पाया उखडून टाकणारी आहे !

प्रकाशन म्हणजे ज्ञानाची निर्मिती व त्याचा प्रसार. प्रकाशक हा पुस्तकनिर्मिति-प्रक्रियेचा सयोजक असतो. प्रकाशकाला आपण निर्माण करणार असलेल्या वस्तूला मार्केट आहे की नाही हे जसे माहीत असायला हवे, तसेच जे काही नवीन टॅलेंट, नवीन संशोधन, नवीन ज्ञान निर्माण होईल तेही जगापुढे आणायचे कार्य त्याला करायचे असते. एकाच वेळी व्यावसायिक व शिक्षक या दोन्ही भूमिका त्याला वठवाव्या लागतात.

प्रकाशक हा ज्ञानाचा डोअरकीपर असतो. कोणते ज्ञान समाजापुढे येऊ द्यायचे, कोणते येऊ द्यायचे नाही हे त्याने ठरवायचे असते. प्रकाशन या व्यवसायात म्हणूनच मार्केट रिसर्चचा फारसा उपयोग नसतो. नवीन प्रतिभा, नवीन सशोधन यासाठी अदाजे (Guesswork) निर्णय घ्यावा लागतो. डार्विनचे प्रचंड धक्कादायक संशोधन, फ्राइडची मानसशास्त्रातील खळबळजनक क्रांती ही त्या काळात तरी समाजाचा रोष पत्करूनच प्रकाशकानी जगापुढे ठेवली असेल. ज्या पुस्तकाच्या सुरुवातीला दहा-पधरा प्रती खपणे मुश्किल, ती वाचकांना उत्पादक किंमतीला कशी देणार ? आइन्स्टाइनचे रिलेटिव्हिटीवरचे पुस्तक का प्रकाशक साबण, टूथपेस्टप्रमाणे घरोघर विकण्याचा प्रयत्न करणार ?

जेम्स जॉइसचे पहिलेवाहिले लिखाण एवढे नाविन्यपूर्ण, अनोखे व धक्का देणारे होते की, नामवंत प्रकाशकाना ते समजूच शकले नाही ! सर्वांनी ते नाकारले. जेम्स जॉइसला ते स्वतःच्या खर्चाने प्रकाशित करावे लागले. आपल्याकडे राजवाडे यांची विवाहसंस्थेच्या इतिहासाची दोन प्रकरणे चित्रमयजगतमध्ये येताच लोक प्रेस जाळायला निघाले होते ! पुढची प्रकरणे बासनात गुंडाळून ठेवावी लागली. राजवाडे यांच्या मृत्यूनंतर पन्नास वर्षांनी त्यांना बाहेरचा वारा मिळाला. नवीन प्रतिभा ही नेहमी प्रकाशकाला गोंधळात टाकते.

आर्थिकदृष्ट्या प्रकाशनव्यवसाय ही तारेवरची कसरत आहे. कोणते पुस्तक खपेल, कोणते खपणार नाही, हे ज्यानी या व्यवसायात हाडाची काडे केली आहेत त्यानाही कळत नाही. नित्शेच्या 'दस स्पेक झरतुष्ट्रा' या ग्रथाच्या पहिल्या तीन भागाच्या सुरुवातीला २०–२५ प्रतीही खपल्या नाहीत ! प्रकाशकाने घाबरून पुढचा भाग काढण्याचे नाकारले. चौथ्या भागाच्या नित्शेने स्वतःच्या खर्चाने अवघ्या शंभर प्रती छापल्या. त्याच्यातील २०–२५ त्याने आपल्या मित्राना वाटल्या. उरलेल्या प्रती नंतर रद्दीत गेल्या ! काही वर्षे उलटली, नित्शेचे महत्त्व लोकाना कळले. आज या पुस्तकाच्या आवृत्त्यावर आवृत्त्या निघत आहेत. हेमिंग्वेच्या पहिल्या कादबरीच्या अवघ्या १४० प्रती विकल्या गेल्या होत्या. उरलेल्या प्रतीनी रद्दीचे दुकान पाहिले होते. 'रणांगण'च्या पहिल्या आवृत्तीच्या १००० प्रती संपायला वीस वर्षे लागली ! आज ती क्लासिक म्हणून डोक्यावर घेतली जात आहे.

## यात अभिनव काय ?

आजही टेक्स्ट पुस्तकाच्या आधाराशिवाय इंग्लड–अमेरिकेतील प्रकाशक तग धरू शकत नाहीत. त्याच्या एकूण व्यवसायातील ३० टक्के उलाढाल ही टेक्स्ट बुकांची असते. टेक्स्ट पुस्तके झटकन विकली जातात. हमखास सेल मिळतो. कमिशन कमी द्यावे लागते. जाहिराती वगैरेचा खर्च नसतो. पैसा चटकन मोकळा होतो. जनरल पुस्तकात, तिथे २५ पैकी १० पुस्तकात पैसा जवळजवळ बुडतो. ४५ पुस्तकात खर्च निघतो व उरलेली पुस्तके नफा देऊन जातात.

प्रकाशन हा व्यवसाय खूपसा तर्करहित, (Irrational) खूपसा गुतागुतीचा आहे. आपल्याकडेही निव्वळ वैचारिक व उच्च दर्जाचे ललितवाङ्मय प्रसिद्ध करून आर्थिकदृष्ट्या भरभक्कमपणे उभी असलेली एकही प्रकाशनसंस्था नाही ! काहीनी गाईड्स, काहीनी लॉटरी, काहींनी धार्मिक पुस्तके, क्रमिक पुस्तके, प्रेस हा मुख्य व्यवसाय चालवूनच केवळ हौस म्हणून, प्रतिष्ठा मिळते म्हणून वरील पुस्तके प्रकाशित केली आहेत.

ग्रथालीने नऊ वर्षांत जी पुस्तके प्रकाशित केली आहेत त्यात धक्का देणारे, नवीन संशोधन–ज्ञान देणारे, अनोखे असे एकही पुस्तक प्रकाशित केले आहे का ? सर्वसामान्य प्रकाशक रूटिनमध्ये जशी पुस्तके छापतात तशी पुस्तके ग्रंथालीने काढली आहेत. बलुतं उपरा ही पुस्तके आम्ही लेखकाच्या पाठीशी लागून मुद्दाम लिहून घेतली, मुक्या समाजाला बोलत केलं वगैरे दावे त्यांना करायचे असतील व हा प्रतिभेचा अनोखा आविष्कार आहे असा टेंभा त्यांना मिरवायचा असेल तर त्यावर आपण काय वाद घालणार ? त्याची वाङ्मयीन व सांस्कृतिक समज अतिशय तोकडी आहे एवढे फार तर म्हणता येईल.

वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी त्यानी केलेले प्रयत्न हेही बालिश आहेत व यासंबंधी त्याना असलेली तोकडी समज उघड करणारे आहेत. पुस्तके वाचकापर्यंत पोहचवण्यासाठी गावोगाव ग्रथयात्रा काढणे ही कल्पना अभिनव मुळीच नव्हती. ज्या वेळी आपल्याकडे छापण्याची कला आलेली नव्हती त्या काळी, काही ब्राह्मणमडळी, आठ महिने पोथ्याच्या नकला करून, चातुर्मासापूर्वी त्या बैलगाडीवर लादून, गावोगाव त्या विकायला नेत. डॉ. केतकरांचे आजोबा हा व्यवसाय करत असत. अतिथी देवो भव हा वागी भिनलेला संस्कार पोथ्या घेऊन आलेला अतिथी तर पुण्यात्मा ! पालखी वा मोठ्या सताची पावले गावाच्या वेशीला लागावी तसा आनंद गावकऱ्याना व्हायचा. त्याची गाडी मिरवणुकीने, फुले, गुलाल उधळत (फक्त, बोल वाचका हमला बोल, वाचा हो वाचा पुस्तके वाचा, अशा आचरट घोषणा त्या वेळी होत नसत तर हरिनामाचा गजर होई ! ) गावात आणली जाई. पोथ्या बनवणाऱ्याचा चागला आदरसत्कार होई. त्याच्या पाया पडून त्याच्या पायावर दक्षणा ठेवून श्रीमंत लोक पोथ्या चांगल्या श्रद्धेने स्थानिक पुराणिकाला विकत घेऊन देत. (स्वतः विकत घेत नसत.) मग पौराणिक चातुर्मासात त्याचे पारायण करी व सर्व लोक ती कथा कान देऊन ऐकत. ग्रंथालीच्या ग्रथयात्रेचे जे उत्साहाने गावोगाव स्वागत झाले, गावातील नगराध्यक्ष वगैरे प्रमुख लोकानी यात्रेला सामोरे जाऊन मोठ्या सन्मानाने ग्रंथांची पालखी गावात आणली व

आपल्या गावातील लायब्ऱ्याना पुस्तके विकत घ्यायला लावली, (व्यक्तिगत वाचकानी किती पुस्तके घेतली हा हिशेब ग्रंथालीने कधी दिलेला नाही.) ती ही प्राचीन परंपरा होती म्हणून. काळ पालटला तरी लोकं परंपरा विसरत नाहीत हेच याच्यावरून सिद्ध होते !

ग्रंथासंबंधी आपल्याकडील वाचकामध्ये फार प्राचीन काळापासून श्रद्धा आहे ग्रंथाना आपण देवस्वरूप मानतो आपण ग्रथाच्या पाया पडू. पुण्य मिळावे म्हणून ग्रथ गुरुजीना घेऊन देण्याची अजून परंपरा आहे. आजही चातुर्मासापूर्वी मुबईतील गिरणीकामगार टोळचा–टोळघानी माधवबागेत जातात, तेथील पुस्तक विक्रेत्यांच्या पाया पडतात व मग श्रद्धेने ग्रंथ घरी आणतात व पारायण करतात ही श्रद्धा आहे म्हणून पुस्तके वाचली जातात का ? तर त्याचे नाही हे उत्तर द्यावे लागेऊ !

आपल्याकडे वाचनाची आवड निर्माण करणे फार अवघड आहे आपल्याकडे ग्रथाचे सामूहिक पारायण करण्याची परंपरा होती. ग्रंथ 'लावला' जात असे. पारायणात एकजण ग्रथ वाचत असे व इतर सर्वजण ऐकत असत. वाचनात डोळयाला व डोक्याला श्रम असतात.

अगदी इग्लड–अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रातही पुस्तके साबणाच्या वडीसारखी खपत नाहीत. तिकडेही पुस्तकाची पहिली आवृत्ती (१३ व्या शतकापासून छापील पुस्तके वाचायची परपरा असूनही) २१०० ते ३१०० चीच निघते व जवळजवळ त्यातील ९० टक्के पुस्तके लायब्ऱ्या विकत घेतात. पुस्तकाचा चांगला गाजावाजा झाला की मग त्याची स्वस्त आवृत्ती काढली जाते.

उच्च दर्जाचे वाङ्मय, ज्ञान–संशोधन हे शेवटी समाजातील काही थोडे लोकच वाचणार, समजू शकणार. संपत्तीचे, जमिनीचे समान वाटप करता येईल; पण ज्ञानाचे समान वाटप समाजवादी रशियालाही सक्ती करूनही जमण्यासारखे नाही. लोक आपल्याकडचे ज्ञानही घ्यायला तयार नसतात. पुस्तके अगदी फुकट वाटली इतकेच काय, पुस्तके वाचा–पैसे देऊ, ही लालूच दाखवूनही सर्व लोक आवडीने पुस्तके वाचणार नाहीत. पुस्तके ही ज्ञानाची देवाणघेवाण करण्याचे साधन आहे. ते साबणाच्या वडीसारखे कधीच घरोघर जाणार नाही. वाचायचे व फेकून द्यायचे हे जर ग्रथालीचे ध्येय असेल तर त्यानी फक्त गुलशन नदा छापत बसावे. त्याचो महत्त्वाकांक्षा विनाकष्ट निश्चित पूर्ण होईल !

## बालिश प्रयत्न–आचरट घोषणा

जेथे जेथे सास्कृतिक परंपरा आहे, नाटके, होतात, भाषणे होतात तिथे अतिशय दारिद्र्य असूनही पुस्तके खपतात. जिथे खूप समृद्धी आहे पण सास्कृतिक वातावरण नाही तिथे खूप प्रयत्न करूनही पुस्तके खपत नाहीत असा निष्कर्ष रूसी जे. तारापोरवाला यानी अमेरिकेतील पुस्तकविक्रीविषयी जे संशोधन (American Book Industry) केले होते त्यातून निघाला आहे. आपल्याकडेही गोवा, दक्षिण रत्नागिरीचा पट्टा, सांगली, कोल्हापूरचा परिसर, पुणे–मुबई याच भागात पुस्तके, जास्त खपतात. खानदेश–वऱ्हाडसारख्या सपन्न भागात प्रयत्न करूनही पुस्तके बेताचीच खपतात.

पुस्तके विकत घेऊन वाचायला वाचकाची आर्थिक परिस्थिती, परंपरा, आजूबाजूचे वातावरण फार परिणाम करते. मराठी साप्ताहिके, मासिके व पुस्तकाचा अर्धा हिस्सा नेहमी मुबई रिचवते. समजा दहा हजार प्रतीची पुस्तकांचो स्वस्त आवृत्ती खपली तर जवळजवळ सहा हजार प्रती मुंबईत (ठाणे–कल्याणचा परिसर धरून) संपते. उरलेल्या प्रती पुणे व उर्वरित महाराष्ट्रात विकल्या जातात. जथे जेथे औद्योगिक वसाहती झाल्या आहेत तिथे पुस्तकाना मागणी असते. पारंपारिक कुटुब सोडून तरुण परक्या शहरात राहायला जातो तो पुस्तकाला आश्रय देतो.

एस. टी. स्थानके, रेल्वेस्टेशन्स, धार्मिक क्षेत्रे–जेथे लोकाना रेंगाळावे लागते, प्रतीक्षा करावी लागते, तिथे पुस्तके खपतात. टि.व्ही. हे माध्यम ज्ञानासंबंधी उत्सुकता वाढवणारे आहे. ज्या ज्या वेळी टि. व्हीवर पुस्तकांची चर्चा झाली, तेव्हा तेव्हा त्या पुस्तकाला मागणी आली असे दिसून आले आहे. पुस्तकांसंबंधी वाचकाचे कुतूहल वाढवण्याचे अनेक मार्ग आहेत. त्यापैकी एकाचा तरी या कार्यकर्त्यांनी कधी प्रयोग केला आहे का ?

वाचकाने पुस्तके विकत घ्यावी असे वाटते तो वाचक आहे तरी कसा ? त्याची ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी कोणती आहे ? आज तो आपला रिकामा वेळ कसा घालवतो ? भारतातील इतर प्रातात तेथील प्रकाशकांनी याबाबत काय प्रयोग केले आहेत ? केरळात लेखकांच्या सहकारी प्रकाशनसस्थेने आजवर दोन हजारच्यावर पुस्तके प्रकाशित केली आहेत. 'चेनिम्म' ही कादंबरी सवलतीत एक रुपयाला देऊन लाखभर प्रती विकल्या. त्यांनी दहा खडांत जो ज्ञानकोश काढला होता तसाच ज्ञानकोश त्याच सुमारास एका खाजगी प्रकाशकानेही काढला. दोन्ही प्रकाशकाचे वर्तमानपत्रातून जाहिरातयुद्ध सुरू झाले. त्यामुळे वाचकात जी उत्सुकता निर्माण झाली त्याचा परिणाम विक्रीवर किती चागला झाला, त्याचप्रमाणे पुस्तकविक्रीसाठी त्यानी गावोगाव उघडलेली स्वतःची दुकाने, त्यांनी डिस्प्लेमध्ये आणलेले नाविन्य, तेथील खाजगी प्रकाशकानी या स्पर्धेला दिलेले यशस्वी तोड यावर 'रुचो' या ग्रथालीच्या मुखपत्रात कधी अभ्यासपूर्ण लेख आले आहेत का ?

वेगाने होणाऱ्या औद्योगीकरणामुळे जपानमध्ये पारपारिक पद्धतीचे मोठ बुकडेपोज बंद पडले. त्यावर तेथील प्रकाशकानी काय तोड काढली ? पाश्चिमात्य देशात पुस्तकांसबंधी वाचकात उत्सुकता वाढवण्यासाठी काय युक्त्या योजतात ? इंग्लंड–अमेरिकेत नामवत प्रकाशकानी आत्मचरित्रे प्रसिद्ध केली आहेत. जॉर्ज ॲलन अँड अनविन या सुप्रसिद्ध प्रकाशनसस्थेचे सस्थापक लॉर्ड अनविन यानी प्रकाशनव्यवसायावर एक ग्रंथ लिहिला आहे. त्याची जगातील सर्व प्रमुख भाषेत (हिंदीतही) भाषातरे झाली आहेत. ही चळवळ सुरू करण्यापूर्वी हा ग्रंथ जरी ग्रंथालीच्या कार्यकर्त्यांनी अभ्यासला असता तरी त्यानी आपल्या बालिश व आचरट कल्पनाना तावडतोब तिलाजली दिली असती ! अजून वेळ गेलेली नाही. अजून त्यानी तो अभ्यासावा. हा ग्रथ जगभरच्या प्रकाशनक्षेत्रात धर्मग्रंथ मानला जातो. त्यातील निष्कर्ष अजूनही ताजे आहेत. या ग्रंथात अनविन यानी स्पष्ट म्हटले आहे की, त्यांच्या उभ्या व्यावसायिक आयुष्यात त्याना

पृष्ठ २५ वर

# पॅब्लो नेरूदांच्या आठवणी...

पॅब्लो नेरूदांच्या आठवणींचा काही भाग मागील अंकात प्रसिद्ध झाला होता. या अंकात पुढील उरलेला भाग व नेरूदांची एक प्रभावी कविता– 'मी काही गोष्टी समजावून सांगतोय...'

● रघुपती भट्ट ●

चिलीच्या सरकारने नेरूदांची पाठ सोडली नव्हती. एका अहवालात त्यांनी म्हटलं होतं, 'नेरूदा आणि त्यांची बायको रशियन हेर आहेत. त्यांचा खबऱ्या आहे इल्या एहरेनबर्ग नावाचा रशियन लेखक. त्यांच्या इमारतीतच नेरूदा राहतात.' हा अहवाल फ्रेंचांकडे पोच झाला.

पॅब्लोंना एहरेनबर्ग माहिती नव्हता. त्यांनी अधिकाऱ्यांना ते पटवून दिलं; पण पॅब्लोंच्या मनात एहरेनबर्गला भेटायचं आलं.

एक दिवस ते एहरेनबर्गकडे गेले आणि त्याला म्हणाले, 'मी, पॅब्लो नेरूदा. पोलिसांच्या मते आपण मित्र आहोत, एकाच इमारतीत राहतो. तुमच्यामुळे मला ते फ्रान्सच्या बाहेर हाकलायला निघालेत. तेव्हा तुम्हाला भेटावं, हस्तांदोलन तरी करावं म्हणून आलोय!'

एहरेनबर्गच्या मुद्रेवर प्रथम आश्चर्य आणि नंतर स्मितहास्य उमटलं. 'नेरूदा, मलासुद्धा तुम्हाला भेटण्याची इच्छा होती.' तो म्हणाला, 'मला तुमची कविता आवडते. बसा. माझ्याबरोबर मद्य घ्या!'

फ्रेंच पोलिसांच्या त्या सांगण्यावरून नेरूदांना एक चांगला मित्र मिळाला. याच एहरेनबर्गने पॅब्लोंच्या कवितांचे रशियन भाषेत भाषांतर केले.

एक दिवस त्यांना फ्रान्सच्या पोलीस-प्रमुखांकडून बोलवणे आले. चिलीच्या अँबॅसेडरने नेरूदांचा पासपोर्ट चुकीचा आहे तो ताब्यात घ्यावा असे त्याला सांगितले होते. नेरूदांनी त्याला पासपोर्ट दाखवला. त्यांच्या मित्रांनी तो व्यवस्थित करून आणला होता. हा पोलीसप्रमुख एका युरुग्वेच्या कवीचा जावई होता. तो म्हातारा कवीसुद्धा पॅब्लोंबरोबर आला होता.

त्याने त्या राजदूताला फोनवर सांगितले की, नेरूदांचा पासपोर्ट व्यवस्थित आहे. तो ताब्यात घेणे चुकीचे होईल. तो राजदूत त्या प्रमुखाला सांगत होता की, काहीही करून तो पासपोर्ट ताब्यात घ्या; पण त्याने स्पष्ट नकार दिला आणि पॅब्लोंना तो म्हणाला की, त्यांना जेवढे दिवस राहायचे आहे तेवढे दिवस ते फ्रान्समध्ये राहू शकतात.

विशेष म्हणजे हा राजदूत स्वतःला पॅब्लोंचा मित्र म्हणवून घेत होता व त्याने त्या दिवशीच पॅब्लोंना प्रेमाचा संदेश पाठवला होता.

□

४९ च्या दरम्यान पॅब्लोंनी सोव्हिएट रशियाला भेट दिली. 'पुष्कीन' या कवीच्या स्मरणार्थ होणाऱ्या सोहळ्यात भाग घ्यायला ते जात होते. या सोहळ्यासाठी रशियन लोकांनी झारचा राजवाडा पुनः बांधला होता. तोही प्रत्येक दगड न् दगड पुन्हा पूर्वीसारखा बसेल याची दक्षता घेऊन! त्या वेळच्या सर्व लेखकांप्रमाणे पॅब्लोसुद्धा रशियाच्या प्रथम दर्शनाने भारावून गेले मायकाव्हस्की आणि पास्तरनाक या थोर कवींबद्दल त्यांनी ऐकले.

रशियामध्ये अनेक कवींबरोबर त्यांचा नाझिम हिकमेट या तुर्क कवीशी परिचय झाला. या तुर्क कवीने आपल्या सरकारविरुद्ध बंड पुकारले होते. तुर्की आरमाराला आपल्या कवितांतून चेतावणी देण्याचा उद्योग केल्याबद्दल त्या सरकारने त्याला तुरुंगात डांबले. त्याचा जेवढा छळ करता येईल तेवढा केला होता. एकदा तर त्यांनी घाणीत उभे केले होते. गुडघ्यापर्यंत घाण असलेल्या त्या खोलीत कोणताही शहाणा असलेला मनुष्य वेडा झाला असता; पण नाझीमच्या मनात विचार आला हे लोक माझा अंत पाहताहेत. यांची जीत मी होऊ देणार नाही.

मग त्याने आवाज उंचावला. क्षीण होत चाललेल्या शरिराला कवितेची संजीवनी दिली. आपल्याला युद्धगीते, प्रेमगीते, लोकगीते आणि त्यातून त्याला सामर्थ्य मिळालं ती घाण, तो छळ सहन करण्याचं. पुन्हा तो त्यातून निसटला. रशियामध्ये त्याने राजकीय आश्रय घेतला. त्याची हकीकत ऐकून पॅब्लो त्याला म्हणाले, 'दोस्त भाऊ, तुम्ही आम्हा सर्वांसाठी गायलात. आता आम्ही काय करावं याबद्दल शंका राहिली नाही. आता आम्हालाही उच्च रवात गायला पाहिजे!'

नाझीममुळे पॅब्लोंना तुर्की जनता जुलूम-जबरदस्तीच्या दिवसांत कसे जीवन कंठत आहे ते समजले.

□

## नेहरूंचा निरोप

१९५० मध्ये पॅब्लोंनी भारताला दुसरी भेट दिली. या खेपेला ते शांतिदूत म्हणून आले होते. जोलिएट क्युरी या जागतिक शांततापरिषदेच्या अध्यक्षाने त्यांना वेगवेगळ्या व्यक्तींना भेटायला पाठवले होते. भारतावरील त्यांच्या प्रेमामुळेच शांतता-परिषदेने त्यांची नियुक्ती केली होती. पॅब्लोंना औत्सुक्य होते. ज्या देशाचा स्वातंत्र्यलढा त्यांनी पाहिला होता तो आता एक स्वतंत्र देश म्हणून काय करतो आहे हे त्यांना पाहायचे होते.

पहिला दणका त्यांना कस्टमवाल्यांनी दिला. दोन तास त्यांनी पॅब्लोंच्या सूटकेसिस चेक केल्या. त्यांचे कपडे, अंडरपॅंटस् चेक केले. त्यांनी एका कागदात बूट गुंडाळले होते. तो कागद म्हणजे गुप्त कागदपत्र असल्याप्रमाणे त्याची तपासणी झाली. पुन्हा त्यांचे बूट म्हणजे ऐतिहासिक असल्यामुळे त्यांची अंतर्बाह्य तपासणी झाली.

मग ते सगळे ठेवून पॅब्लोंना जायला सांगण्यात आले. संयम ठेवून पॅब्लो म्हणाले, 'माझे कागदपत्र, माझ्याकडे असणारी पत्रे तुमच्याकडे आहेत, मी जाऊ कसा ?'

त्या कस्टमवाल्यांनी त्यांना सांगितले की, त्यांच्या पत्त्यावर सगळे पोच करण्यात येईल आणि त्यांना हॉटेलमध्ये प्रवेश करताना अडचण येणार नाही.

पॅब्लोंना आंतरराष्ट्रीय स्मगलरसारखे वागवण्यात येत होते. पॅब्लोंना जुने दिवस आठवले. ते अतिशय वैतागले.

हॉटेलमध्ये प्रो. बाएश यांच्याशी भेट झाली. त्याने कस्टमवाल्यांचे फारसे मनावर न घेण्याचा सल्ला दिला. त्यानंतर पॅब्लो ज्युलिएट क्युरीचं पत्र घेऊन डॉ. सी. व्ही. रामन यांना भेटले. रामननी त्यांना अणुसंशोधनकेंद्र दाखवले आणि संध्याकाळी नेहरूंच्या बहिणीच्या घरी खाण्याचे आमंत्रण दिले.

विजयालक्ष्मी पंडित यांच्याबद्दल पॅब्लो लिहितात, 'त्या दिवशी ज्यांच्याकडे आम्ही खाना घेतला त्या नेहरूंच्या बहिणीचे नाव मी विसरलो आहे. त्यांच्या सहवासात मी (मला कस्टमवाल्यांनी दिलेला) मनस्ताप विसरून गेलो. त्या अतिशय सुंदर होत्या. एखाद्या अभिनेत्रीसारखा त्यांनी पोशाख



उध्वस्त स्पेन पहा...प्रत्येक घरातून जळता धातू वहातोय ..

¤

केला होता. त्यांच्या साडीचा रंग झळाळत होता. त्यांचा देखणेपणा त्यांच्या दागिन्यांनी अधिकच खुलला होता. मला त्या अतिशय आवडल्या; पण एवढ्या देखण्या, रुबाबदार बाईने हात घालून जेवताना पाहून विरोधाभास वाटत नाही. आपली सुंदर लांबसडक, हिऱ्यांनी सजवलेली बोटे आमटीत, भातात कालवून त्या जेवल्या. मी त्यांना सांगितले की, त्यांच्या भावाला आणि इतर शांतताप्रेमींना भेटायला दिल्लीला जाणार आहे. त्या म्हणाल्या की, 'सर्व भारताने या चळवळीत सहभागी व्हायला पाहिजे !'

नंतर पॅब्लोंना कस्टमवाल्यांनी त्यांचे कागदपत्र आणून दिले. त्यांच्या डायरीमध्ये ज्यांचे पत्ते होते त्या सर्वांना पोलिसांनी प्रश्नोत्तरांच्या फैरी झाडून पिळले होते असे त्यांना समजले.

नंतर दिल्लीमध्ये पॅब्लोंनी अनेक मोठ्या व्यक्तींच्या भेटी घेऊन शांतताचळवळीसंबंधात चर्चा केली. चिलीचा भारतातील राजदूत पॅब्लोंचा जुना मित्र होता. त्याने पॅब्लोंना सांगितले की, भारत सरकारला त्यांच्या हालचालींविषयी चिंता वाटते आहे आणि त्यांनी लवकरात लवकर भारत सोडला तर बरे होईल. त्याच दिवशी भारतातील पोलीसप्रमुखाने पॅब्लोंच्या मित्राजवळ हे स्पष्ट केले होते.

पॅब्लोंना काय बोलायचे ते सुचेना. भारताचे त्यांनी काय घोडे मारले होते? ते एवढेच म्हणाले, 'नेहरूंना पत्र दिल्यावर एक क्षणही मी इथे थांबत नाही !'

नेहरूंना ते भेटले. स्वातंत्र्यलढ्याचा आपण साक्षीदार असल्याची त्यांनी आठवण

करून दिली; पण नेहरूंच्या चेहऱ्यावर कसलीही प्रतिक्रिया उमटली नाही. पॅब्लोच्या येण्याने त्यांना कसलाही आनंद झाल्याचे दिसले नाही. जोलिएट क्युरीचे पत्र त्यांना दिल्यावर त्यांनी ते वाचायला सुरुवात केली.

नेहरू कसल्या तरी राजकीय किंवा मानसिक ताणाखाली असावेत असं त्यांना वाटलं. नेहरूंचे घराणे जमीनदार. कदाचित त्यांच्यातील जमीनदार एखाद्या खेडुताकडे पाहतो आहे तसं ते आपल्याला न्याहाळत असावेत असंही पॅब्लोना वाटलं. कारण ते पॅब्लोबरोबर बोलायलाच तयार नव्हते. पुन्हा ते म्हणाले, 'मी याला उत्तर लिहीन!'

पॅब्लो मग शांततेच्या प्रयत्नावर बोलले. 'जे शांततेच्या गोष्टी बोलतात त्यांनी या चळवळीत काही तरी केलं पाहिजे असं मला वाटतंय. जे युद्ध आणि सूड यांच्या गोष्टी बोलतात त्यांना सोडून सर्वांनीच.'

नेहरूंना एकंदरीत इंटरेस्ट दिसत नव्हता. 'तुम्हाला काही मदत मी करू शकतो काय? काही बघायचंय का तुम्हाला?'

पॅब्लोंचा संयम संपला होता. 'होय. मला ताजमहाल बघायचा होता; पण पोलिसांनी मला शहराच्या बाहेर जाण्यास प्रतिबंध केलाय. मी लवकरात लवकर या देशातून बाहेर जावं असं मला सांगण्यात आलंय. मी उद्या जातोय!'

त्यांनी नेहरूंचा निरोप घेतला.

पुन्हा त्यांना समजलं की, नेहरूंनी आदेश दिल्यामुळे त्यांची ताजमहालकडे जायची व्यवस्था करण्यात आली होती; पण त्याचा विचार न करता पॅब्लो पहिल्या विमानाने पॅरिसला निघून गेले.

¤

५१ मध्ये त्यांनी चीनला भेट दिली. सन्‌-यत्‌-सेनची बायको चिंग-लिंग हिला लेनिन-पारितोषिक दिले होते. ते तिला देण्यासाठी म्हणून एहेरनबर्ग त्यांच्याबरोबर होता. या काळातच स्टॅलिन राजवटीतील काही कृष्णकृत्ये त्यांना एहेरनबर्गकडून समजली; पण पॅब्लो क्रांतीच्या यशाने भारावले होते, त्यामुळे एहेरनबर्गचे त्यांना फारसे पटले नाही.

चिनी त्या काळात निळा गणवेश घालत असत. रस्त्यावर वाहने नव्हती. चिनी पद्धतीचे जेवण त्यांना जेवायचे होते; पण प्रत्येक ठिकाणी त्यांना युरोपियनच जेवण मिळू लागले. एक दिवस पॅब्लोंनी वैतागून सांगितले, 'एक तर चिनी जेवण द्या, नाही तर पॅरिसला परत जाण्याची व्यवस्था करा!' मग त्यांना चिनी जेवण मिळाले.

## पॅब्लोंचं प्रेमकाव्य

भूमिगत काळात एकदा पॅब्लो इटलीमध्ये आले आणि इटलीच्या प्रेमात पडले. इटालियन साधेपणा, इटालियन पाव, मद्य सगळेच त्यांना आवडले. इटालियन पोलिसांनी त्यांचा सर्वत्र पाठलाग केला; पण कधीही आपली मर्यादा सोडली नाही नेहमीच त्यांनी पॅब्लोंचा मान राखला. पॅब्लोनी सर्वत्र कविता ऐकवल्या. इटालियन कवींनी त्यांना त्यांच्या कवितांचे इटालियन भाषांतर ऐकवले.

अनेक इटालियन शहरांनी त्यांचा सत्कार केला. त्यांना सन्माननीय नागरिकत्व बहाल केले. कौंसिलहॉलमधल्या गराड्यातून ते बाहेर पडले की, पोलीस त्यांची वाट पहातच असत.

व्हेनिसमध्ये त्यांना डेस्डिमोनाची आठवण झाली. त्यांचे कवितावाचन झाल्यावर, त्यांना सन्माननीय नागरिकत्व देण्यात आले; पण पोलिसांना त्यांचे वास्तव्य कबूल नव्हते. गोंडोलामध्ये बसून पॅब्लो पळाले आणि पोलिसांनी प्रेमिक वापरत असलेल्या गोंडोलामधून त्यांचा पाठलाग केला. व्हेनिसमधील हा काव्यातील प्रवास पॅब्लोंच्या स्मरणात राहिला तो पोलिसांच्या त्या पाठलागामुळे, प्रेमिकांचा गोंडोला आणि त्यांचा गणवेश यातील विरोधाभासामुळे.

एक दिवस हा पाठलाग संपला. नेपल्समध्ये पोलिसांनी त्यांच्या पासपोर्टमध्ये काही तरी चूक काढली आणि त्यांना सांगितले की, त्यांनी ताबडतोब इटलीच्या बाहेर गेले पाहिजे. पॅब्लो पोलिसांना म्हणाले, 'काही तरी गैरसमज झालेला असावा.' पण ते पोलीस म्हणाले, 'नाही. आम्हाला तुमच्याबद्दल अत्यंत आदर आहे; पण तुम्हाला इटलीतून बाहेर जावे लागणार!'

रेल्वेमधून त्या पोलिसांनी त्यांना रोमला नेले. वाटेत पोलिसांनी त्यांची बॅग उचलण्यापासून सगळी बडदास्त ठेवली. पॅब्लोंच्या त्यांनी स्वाक्षऱ्या घेतल्या. जगाच्या पाठीवर कोठेही पॅब्लोंना इतके चांगले पोलीस भेटले नाहीत!

ते पोलीस म्हणाले,—आम्हाला हे करावं लागतंय याचं वाईट वाटतं; पण आम्ही गरीब आहोत. आमच्या मुलाबाळांसाठी का होईना आम्हाला या आज्ञा पाळल्या पाहिजेत, रावसाहेब!'

रोममध्ये गाडी बदलायची होती. पॅब्लो उतरले तर हजारो इटालियन लेखक तेथे पुष्पगुच्छ, हार वगैरे घेऊन हजर होते. या लेखकांची आणि पोलिसांची चकमक उडाली. सुप्रसिद्ध इटालियन लेखक आल्बर्टो मोराव्हिया आणि त्याची बायको एल्सा मोरान्टे यामध्ये होते. एल्साने एका पोलिसाच्या डोक्यात काही तरी घातले. जमाव क्रुद्ध होऊ लागला. तेव्हा पोलिसांनी पॅब्लोंना सांगितले, 'कृपया तुमच्या मित्रांना शांत करा!'

जमाव ओरडत होता. 'नेरूदा रोममध्येच राहतील, नेरूदा इटलीतून बाहेर जाणार नाहीत. चिलियन येथेच राहू द्या. त्या ऑस्ट्रियन माणसालाच हाकलून द्या!'

ऑस्ट्रियन माणूस म्हणजे इटलीचा पंतप्रधान डी. गास्पेरी!

अर्ध्या तासात वरून दुसरी ऑर्डर आली. पॅब्लो नेरूदा इटलीमध्ये हवा तेवढा काळ राहतील. मग त्या जमावाने अक्षरशः आनंदोत्सव केला

एका प्रसिद्ध इतिहासकाराने आपला कॅप्रीतील पॅब्लोंना रहायला दिला. 'मॅटिल्डि' बरोबर पॅब्लो जेथे राहायला गेले. ही मॅटिल्डि म्हणजे पॅब्लोंना बराच काळ साथ करणारी त्यांच्या कवितांची एक नायिका. इटलीच्या या वास्तव्यात पॅब्लो मॅटिल्डिबरोबर प्रेमरंगात रंगून गेले आणि त्यातून 'लोस व्हर्सोज डेल कपिटान' हे प्रेमकाव्य जन्मास आले.

प्रथम त्या प्रेमकाव्यावर पॅब्लोंनी आपलं नाव घातलं नव्हतं ते अनामिकाचे काव्य होते. त्या पुस्तकाची लोकप्रियता एवढी वाढली की शेवटी पॅब्लोंना त्याचा स्वीकार करावा लागला.

या कॅप्टनच्या कवितांवर पॅब्लोनी आपलं नाव का घातलं नव्हतं?

याचं कारण होतं मॅटिल्डिपूर्वीची पॅब्लोंची नायिका 'डेलिया डेल कॅरील' जिने १८ वर्षे पॅब्लोंची निष्ठेने साथ केली होती. तिच्या सहवासात पॅब्लोंची कविता बहरली होती. पॅब्लोंच्या या कवितांनी कदाचित

तिच्या भावना दुखावल्या असत्या.

म्हणून पॅब्लोनी कॅप्टनच्या कवितांवर आपले नाव घातले नव्हते.

□

१९५२ च्या दरम्यान पॅब्लोचा विजनवास संपला आणि ते चिलीला परत आले. त्यानंतरचा बराचसा काळ काही न घडता गेला. त्यांची काही पुस्तके प्रसिद्ध झाली. लेनिन पारितोषिक त्यांना मिळाले एवढेच.

एकदा पॅब्लोच्या घरातील एका नोकराणीने एका मुलाला जन्म दिला. पॅब्लोंनी त्याचा धर्मपिता व्हावे अशी तिची इच्छा होती; पण जवळच्या चर्चमधला पुजारी भलता खवळला ! 'कम्युनिस्ट धर्मपिता ? कदापि शक्य नाही· नेरूदाला मी चर्चमध्ये येऊ देणार नाही. तुझ्या मुलाला तो आपल्या हातात घेऊन आला तरी !' त्या मुलीला निराश होऊन परतावे लागले.

आणखी एकदा एका मासिकाने पॅब्लोची कविता ते कम्युनिस्ट आहेत म्हणून छापायचे नाकारले. पॅब्लो म्हणतात, 'मी कोणत्या पुजाऱ्याला कधी सांगणार नाही. तू अमक्याचा बाप्तिस्मा करू शकत नाहीस. कारण तू प्रति–कम्युनिस्ट आहेस किंवा एखाद्याची कविता तो प्रतिकम्युनिस्ट आहे तो नाकारणार नाही ' पॅब्लोंना सर्वांमध्ये सामंजस्य हवं होतं. मग तो कम्युनिस्ट असो की कोणी धर्मनिष्ठ असो. पॅब्लोना सगळं कलहविना जग हवं आहे.

कम्युनिस्ट पॅब्लोच्या मनावर गौतम बुद्धाच्या त्यागाचा प्रभाव पडला. सिलोनमध्ये ध्यानमग्न बसलेल्या बौद्ध भिक्षूंच्या मिशनरी वृत्तीने ते भारावून गेले. अशाच वृत्तीने ते भारावून गेले. अशाच वृत्तीने अणुयुद्धाच्या धोक्याविरुद्ध आपल्याला सर्वांना लढता येणार नाही काय ?

पॅब्लोंच्या कविमनाने आदर्श जगाचे केवळ स्वप्नच आपल्या कवितांतून पाहिले हे होणे नाही, हे त्यांना माहीत होते.

□

चीनला त्यांनी आणखी एक भेट दिली. चीनमध्ये आता बराच बदल घडला होता. आता निळा गणवेश जाऊन रंगीबेरंगी कपडे आले होते. आता चीनमध्ये माओ–त्से–तुंगीझम आला होता.

शेकडो खेडूत माओच्या चित्रापुढे लोटांगण घालताना दिसले. आता माओ म्हणजे देव झाला होता. एक छोटे लाल पुस्तक ज्यामध्ये माओची वचने असायची, ते पुस्तक रोग बरे करते, राजकीय प्रश्न सोडवते असा दबदबा झाला होता. हा व्यक्तिवाद समर्थनीय नव्हता. पॅब्लो स्टालिनसाठी असेच भारावले होते. हिटलरच्या सैन्याचा पाडाव करणारा मानवजातीचा उद्धारक अशी स्टालिनची प्रतिमा त्यांनी चितारली नव्हती काय ? स्टालिनचे अधःपतन कसे होत गेले हे पॅब्लोना कळलेच नाही.

आणि चीनमध्ये हेच चालले होते. एक अतिशय साधा, लढाऊ वृत्तीचा क्रांतिकारक देव बनत चालला होता.

लेखकांच्या सहवासातसुद्धा पॅब्लोना हे जाणवले. सहज एखाद्या चिनी वृत्तपत्राचा अग्रलेख चाळावा तर त्यात माओचेच कौतुक असायचे. पॅब्लोना गुदमरल्यासारखे होऊ लागले.

एके दिवशी पॅब्लोनी एक वेगळा कॉलम वाचायला घेतला आणि त्यांना मोठाच धक्का बसला. त्यात एका राजकीय खटल्याचा वृत्तांत होता आणि त्यात गोवले गेलेले सगळे पॅब्लोचे मित्र होते. चीनमधील अग्रगण्य लेखक. विशेष म्हणजे हे सगळे अजून पॅब्लोच्या स्वागतसमितीचे सभासद होते. त्यातील एकानेही त्याबद्दल चकार शब्द काढला नव्हता. आपले भवितव्य अंधारमय झाले आहे, याबद्दल ते चिनी साहित्यिक पॅब्लोंकडे कधीही कुरकुरले नव्हते.

सगळ्या चीनमध्ये संशयग्रस्त वातावरण बनले होते. प्रत्येकजण दुसऱ्याला पोलिसाच्या हवाली करायला टपला होता.

पॅब्लोची एक मैत्रिण तिंग–लिंग हिच्यावर चँग कै शेकच्या एका शिपायाबरोबर प्रेमसंबंध असल्याचा आरोप होता. खरं म्हणजे क्रांतीसाठी तिने प्रेमाला तिलांजली दिली होती आणि लहान मूल काखेत घेऊन ती लाँग मार्चमध्ये सहभागी झाली होती; पण लांडग्याच्या गोष्टीप्रमाणे तिला खतम करण्यासाठी निमित्त हवं होतं. चीनमधल्या प्रतिभाशाली लेखकांचा आवाज बंद करण्याच कारस्थान चाललं होत.

ज्या लेखकाच्या युनियनची ती अध्यक्ष होती त्याच युनियनच्या हॉटेलमध्ये वेटर बनण्याची शिक्षा तिला झाली; पण तिने आपला स्वाभिमान सोडला नाही! जेथे अनेक सभा तिने गाजवल्या तेथे तिने वेटर म्हणून सुद्धा मानानेच काम केले तिचा ताठा कमी होत नाही म्हटल्यावर तिला कोठल्याशा खेड्यात स्वयंपाकीण म्हणून पाठवण्यात आले.

लेखकांच्या गळचेपीची ही उदाहरणे इतर लेखक आवाजात बदल न करता पॅब्लोना ऐकवत होते.

'सियाओ एमी' नावाच्या एका लेखकाला काय भोगावे लागले ते पॅब्लोना कळले नाही. अचानक तो दिसेनासा झाला. 'आई चियाग' ज्याने पॅब्लोना चीनमध्ये सर्वत्र फिरवले होते त्याला गोबीच्या वाळवंटात पाठवण्यात आले आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या त्या लेखकाला लिहिण्याची मनाई करण्यात आली. एक प्रकारे त्याला साहित्यिक आत्महत्या करण्यास भाग पाडण्यात आले.

नव्या भेटीत पॅब्लोना चीनच्या दर्शनाने अंतर्बाह्य हादरवून सोडले !

□

एकदा रशियामध्ये त्यांना एक वेगळा समारंभ पाहायला मिळाला. नोव्हेंबर महिना होता मॉस्कोच्या लाल चौकात दोघा अंतरिक्षवीरांचा सत्कार चालला होता. सोबत त्यांचे आईवडीलही होते. ख्रुश्चेव्हने त्यांचे स्वागत केले. पॅब्लोशी त्यांची ओळख करून देण्यात आली. त्यातला एक उत्साही तरुण टिटोव्ह याला पॅब्लोनी विचारलं,

'कमांडर, तुम्ही अवकाशातून फिरत असताना पृथ्वीकडे पाहिलत. तुम्हाला चिली दिसला असेलच ?'

तो तरुण हसला नाही. त्याने काही सेकंद विचार केला आणि तो म्हणाला, 'दक्षिण अमेरिकेतील पिवळी पर्वतराजी मला दिसली असं मला आठवतंय ती उंच होती. कदाचित चिली असेल !'

**सगळ्या चीनमध्ये संशयग्रस्त वातावरण बनले होते !**

मायभूमी सदैव मनात असणारे पॅब्लो सद्‌गदित होऊन म्हणाले, 'होय दोस्ता, होय, तो माझा चिलीच!'

□

एकदा पॅब्लोना चिलीमधल्या हमाला-समोर कविता-वाचन करण्याचा योग आला. हे हमाल बाकड्यावर बसून पॅब्लोना न्याहाळत होते. त्याचे चेहरे निर्विकार होते. पॅब्लोना कळेना आता याना कशात इंटरेस्ट आहे हे कसे ओळखायचे? पॅब्लोच्या खिशात 'एस्पॅना एन एल कोराझन' ची एक प्रत होती. ती त्यानी काढली आणि ते म्हणाले, 'मी स्पेनमध्ये होतो. तिथं मी युद्ध आणि रक्तपात पाहिला. मी त्यावर काय लिहिलय ते ऐका!'

एक तास त्यानी कविता वाचल्या. ते निघाले तेव्हा खांद्यावर पोते घेतलेला एक-जण उठला. 'मी आम्हा सर्वांच्या वतीने आपले आभार मानतो. आमच्या काळजाला एवढा कोणी हात घातला नव्हता!' आणि तो हमाल रडला. इतरही भावनावेगाने रडत होते.

## कवितांचा प्रभाव

'टिना मॉडोटी' या इटालियन क्रांतिकारक स्त्रीबद्दल ते म्हणतात, 'ती रशियात फोटो घ्यायला गेली आणि सगळं सोडून कम्युनिस्ट बनली. ती पक्षाचे कोणतेही काम करायला तयार असे. ऑफिस झाडणे, रात्रभर पत्रं लिहिणं. स्पॅनिश युद्धावेळी तिनं जखमींची सेवाशुश्रूषा केली होती. ती मेक्सिकोमध्ये मेल्ला या क्युबन नेत्याबरोबर असताना पोलिसाच्या देखत काही बंदूकधाऱ्यांनी मेल्लाला मारून त्याचा खून मॉडोटीवर लादण्याचा प्रयत्न केला होता; पण त्यातून ती बचावली. तिचं हृदय दुबळं असल्याचं तिनं कोणाला सांगितलं नव्हतं. मेक्सिकोमध्ये तिच्याबद्दल घाणेरडा प्रचार चालला होता. त्यातूनच एक दिवस तिला जोरदार ॲटॅक आला आणि ती निधन पावली.'

तिच्या निधनानंतर मेक्सिकन वृत्तपत्रांनी वाटेल ते लिहिलं. मेक्सिकोची सेवा करत मेलेल्या मॉडोटीबद्दल असं लिहिणं चुकीचं होतं. पॅब्लोंचा मित्र कार्लोस हा तिचा नवरा. त्याच्या शोकाला अंत नव्हता!

'टिना मॉडोटी हा म्युएर्तो' (टिना मॉडोटी मरण पावली आहे.) नावाची एक कविता पॅब्लोनी लिहिली. टिनाच्या चारित्र्यावर चिखलफेक करणाऱ्यांचा समाचार त्यांनी त्यात घेतला होता. हीच कविता त्यानी त्या अंत्ययात्रेतही वाचली. तिच्या थडग्यावरही ती कोरण्यात आली.

सर्व मेक्सिकन वृत्तपत्रानी पहिल्या पानावर पॅब्लोची कविता छापली आणि त्यानंतर एकाही वृत्तपत्राने टिनाबद्दल खोडसाळपणे लिहिले नाही.

पॅब्लोच्या कविता नुकत्याच लोकप्रिय होऊ लागल्या होत्या तेव्हाची एक हकिकत.

एकदा ते, त्यांचा एक मित्र दोघे एका नृत्यगृहात गेले होते. तेथे नाचगाण्याचा जल्लोष चालला होता. अगदी भरात ते आलेले असताना अचानक सगळे स्तब्ध झाले.

त्या भागातले दोन प्रसिद्ध गुंड एकमेकाना आव्हान देत नृत्यगृहात मध्येच उभे राहिले होते.

त्यातला कोणी एक पुढे आला की, दुसरा मागे सरे. सगळे संगीतप्रेमी टेबलाचा आडोसा करून राहिले होते. एखाद्या हिंदी चित्रपटाचा सीनच तेथे साकारला होता. कोणत्या क्षणी मारामारीला सुरुवात होईल ते कळत नव्हते.

पॅब्लो पुढे सरसावले, 'अरे ठगांनो,' ते म्हणाले, 'निर्बुद्धांनो, कशाला लोकांना त्रास देताय? इथे लोक नाचगाण्यासाठी आलेत. तुमचा तमाशा बघायला नव्हे!'

त्या दोघाचाही प्रथम आपल्या कानांवर विश्वास बसेना. मग त्यातला एक बॉक्सर पुढे आला. पॅब्लोना त्याने लोळवले असते. तेवढ्यात दुसऱ्या गुंडाने त्याला लोळवले, त्याला एखाद्या पोत्याप्रमाणे बाहेर फेकण्यात आले.

पुन्हा वातावरण संगीतमय झाले. या वातावरणात तो दुसरा सामील होणार एवढ्यात पॅब्लो खेकसले, 'तूही नीच. तू काही कमी नाहीस!'

पण पॅब्लो आणि त्यांचे मित्र कार्यक्रम संपवून निघाले तेव्हा त्या दुसऱ्याने त्यांना अडवले. त्याचे डोळे खुनशी दिसत होते. तो बदला घेणार असे दिसत होते. पॅब्लोंच्या दोस्तानी पळ काढला. त्याने पॅब्लोना ढकलत बाजूला नेले. पॅब्लो घाबरले होते.

तेवढ्यात तो म्हणाला, 'तुम्ही पॅब्लो नेरूदा तर नव्हे?' पॅब्लोंनी होकार दिल्यावर तो गुंड अक्षरशः पूर्णपणे बदलला. तो म्हणाला, 'मी किती मूर्ख आहे! ज्या कवीची पारायणे आम्ही करतो तो समोर उभा आहे. डॉन, आम्ही अतिशय वाईट आहोत; पण प्रेम नावाची सुंदर गोष्ट माझ्या आयुष्यात आलीय ती तुमच्यामुळे!' त्याने खिशातून एक फोटो काढला. 'हा फोटो हातात घ्या. तिला मी जेव्हा हे सांगेन तेव्हा ती अतिशय खूष होईल!'

पॅब्लो ऐकत राहिले. त्या गुंडाने पॅब्लोची कविता म्हणायला सुरुवात केली. 'आम्ही दोघानी पाठ केलीय.'

'...तिच्या धमन्यातून वाहणारे जीवन त्यासाठी त्याना माझ्या हाताचा खून करावा लागेल.'

आपल्या कवितेचा प्रभाव इतका मोठा आहे हे पॅब्लोना माहिती नव्हते त्या वेळी.

## त्यांना दिसलेला स्टॅलिन

पॉल एल्युअर्डविषयी लिहिताना पॅब्लो हळवे होतात. पॉल त्यांचा जवळचा मित्र होता. त्याच्या काव्यात राजकारण नाही असे वाटले तरी पॅब्लोच्या मते फ्रान्स आणि फ्रेंच लोकांचा झगडा सदैव त्याच्या मनात होता. पॉलची बायको मेल्यावर आपल्या जीवनात जगण्यासारखे काही राहिले नाही असं त्याला वाटत होते पॅब्लोनी त्या दिवसात त्याला आपल्या मैत्रीचा आधार दिला.

पॅब्लो आपल्या घनिष्ठ मित्राला श्रद्धांजली वाहताना म्हणतात, 'फ्रान्सच्या मनोऱ्यादोस्ता. तुझ्या मिटलेल्या डोळ्यावर मी वाकतो आहे हे डोळे तू या पृथ्वीवर पेरलेला प्रकाश, महानता, साधेपणा, प्रामाणिकपणा, चांगुलपणा आणि नैसर्गिकता मला देत राहतील.'

व्हॅलेजो हा पॅब्लोंचा कविमित्र पेरूमध्ये परतायची इच्छा बाळगत पॅरिसमध्ये मेला. तो भुकेकंगाल आणि तृषार्त होऊन मेला. पॅब्लोनी त्याच्यावर दोन कविता लिहिल्या आहेत.

गॅब्रिएला मिस्ट्रेलवर लोकानी चिखलफेक केली. पॅब्लो लहान असतानाच ती कविता लिहायची. तिच्यावर उडवलेला तो चिखल तिला शेवटपर्यंत वेदना देत राहिला.

पॅब्लोसाठी तिच्या ओठांवर एक मैत्रीचे मंद हास्य नेहमी फुललेले असायचे. त्या स्मिताने तिचा चेहरा सदैव उजळून निघालेला असायचा. गॅब्रिएला आई–मुलावर कविता लिहायची.

१९७१ साली पॅब्लोंना नोबेल पारितोषिक देण्यात आले आणि पॅब्लोवर अभिनंदनाचा वर्षाव झाला. एक पत्र पॅब्लो देतात. हे मोठे मजेदार पत्र आहे.

'ब्रिटिश गियानामधील जॉर्ज टाउन येथे मी प्रति–साम्राज्यवादी चळवळ चालवतो. नोबेल प्राईझ सोहळयाचा पास मी मागितला होता. स्वीडिश वकिलातीने मला सांगितले की, या सोहळयासाठी इव्हिनिंग ड्रेसमध्येच येणे हे जवळजवळ सक्तीचे आहे. तसला ड्रेस शिवायला माझ्याकडे पैसे नाहीत आणि मी मागून चुकूनही घालणार नाही. अमेरिकेतल्या एका स्वतंत्र माणसाच्या दृष्टीने वापरलेले कपडे घालणे अपमानास्पद आहे. म्हणून मी तुम्हाला सांगू इच्छितो की माझ्याकडे असलेले पैसे गोळा करून मी स्टॉकहोमला येईन आणि त्या सोहळयाच्या साम्राज्यवादी पद्धतीवर पत्रकारपरिषद घेईन. जगातील सर्वांत लोकप्रिय आणि सर्वांत जास्त प्रतिसाम्राज्यवादी कवीच्या सन्मानासाठी असूनही हा सोहळा या पद्धतीने घेण्यात यावा!'

□

पॅब्लो चिलीमधील आद्य क्रांतिकारकांचे स्मरण करतात. जोसे कॅरेरा, उच्च खानदानात जन्मला होता. चिली मुक्त व्हावा म्हणून अखेरपर्यंत त्याने पराकाष्ठा केली. त्याने गनिमी युद्धे चालू केली आणि क्रांतीची सुरुवात केली; पण ध्येयपूर्तीपूर्वीच त्याला गोळया घालण्यात आल्या!

ओ हिगिन्सला लंडनमध्ये मिराडा नावाचा म्हातारा क्रांतिकारक भेटला. मिराडाने त्याच्या बॅकग्राउंडची छाननी केली तेव्हा तो एका स्पॅनिश व्हाइसरॉयचा मुलगा असल्याचे त्याला आढळले. मिराडाने त्याला त्याचे जन्मरहस्य सांगून क्रांतिकार्याला प्रवृत्त केले. ओ हिगिन्स त्याप्रमाणे बाहेर पडला. त्याने सैन्य बांधले आणि चिलीमधून बंडखोरांचे नेतृत्व करून चिली स्वतंत्र करण्यात हातभार लावला.

मिराडाला स्पॅनिश लोकानी कैद केले आणि तो त्यांच्या तुरुंगातच मरण पावला. तो मेल्यावर त्या फ्रेंच राज्यक्रांतीच्या एका जनरलला आणि क्रांतीच्या आद्य शिक्षकाला एखाद्या पोतयाप्रमाणे समुद्रात फेकून देण्यात आले!

ओ हिगिन्स, केवळ आपले पूर्वज आयरिश होते एवढे ऐकून यशस्वी क्रांती करणारा; पण त्याला ती टिकवता आली नाही. त्याला त्याच्याच देशबांधवानी हद्दपार केला. तो शेक्सपियरच्या कॉरीओलॅनसप्रमाणे चिली चिली करत मेला!

पॅब्लोनी पेरूमध्ये ओ हिगिन्सने आपल्या शेवटच्या वर्षात काढलेली चित्रं बघितली. त्या चित्रात चिलीशिवाय काही नाही. सप्टेंबरमधील चिली, मेमधील चिली वगैरे.

त्यानंतर लुईस प्रेस्टेस याच्यासारखे जीवन दुसरा कोणी क्रांतिकारक जगला असेल असे वाटत नाही. याच्या सगळया कुटुंबाने क्रांतिकार्यात बलिदान केले. त्याच्या बायकोला नाझीनी ठार मारले. त्याच्या मुलीला त्याच्या आईने सोडवून आणले, तो स्वतः ब्राझीलमध्ये कैदेत होता. त्याच्या आईने त्याच्या सुटकेसाठी सगळया जगाला साद घातली. ती मेक्सिकोमध्ये जेव्हा मरण पावली तेव्हा मेक्सिकोच्या अध्यक्षाने ब्राझीलला गळ घातली. त्याच्या आईच्या अंत्यसंस्कारासाठी थोडे दिवस प्रेस्टेसला सोडावे; पण त्याला सोडले नाही. पॅब्लोनी त्या वीरमातेसाठी लिहिलं–

'आई, तू आमच्या अमेरिकेला महान बनवलस.

मुक्तपणे जिचं पाणी वाहतं अशी नदी तू दिलीस

ज्याला अनंत मुळं आहेत असा वृक्षराज तू दिलास.

या देशाचं वैभव वाढावं असा गुंडा पुत्र तू दिलास.'

ही कविता अतिशय प्रसिद्ध झाली. ठिकठिकाणी पॅब्लोना ती गाण्याचा आग्रह होऊ लागला. एकदा पनामामध्ये ती वाचत असताना ब्राझीलचा राजदूत मध्ये आला आणि म्हणाला, 'मी या कवितेचा निषेध करतो. प्रेस्टेस हा साधा गुन्हेगार...' एवढयात लोकानी त्याचे तोंड बंद केले. पॅब्लो मध्ये पडले नसते तर तो त्या वेळी मेलाच असता.

स्टॅलिनवर पॅब्लो खूप विस्ताराने लिहितात. 'लेनिन प्राईझ'च्या कमिटीवर पॅब्लो होते; पण स्टॅलिन त्याच्या सभांना कधी हजर राहात नसे. बहुतेक वेळा हे पारितोषिक एकमताने दिलं जायचं; पण काही वेळा मात्र मतभेद व्हायचे. अशा वेळी कोणी तरी स्टॅलिनकडे जाऊन यायचं. स्टॅलिन कोणाला कधी भेटत नसायचा. एक गूढ वलय त्याच्या भोवती होते फक्त बेरिया कधीही न दार वाजवता त्याच्या खोलीत जाऊ शकत असे.

पॅब्लोना स्टॅलिनचे नेहमीच आकर्षण वाटत राहिले. जॉर्जियाचा तो लोहपुरुष नंतर एवढा अधोगत का झाला याचे रहस्य त्यांना कधी उमगले नाही.

एकदा पॅब्लो आणि अॅरॅगॉन पती–पत्नी लेनिन पारितोषिकाच्या सभेला जाऊ शकले नाहीत. वॉर्सामध्येच ते अडकून पडले. तेव्हा त्यानी त्या वर्षीच्या उमेदवारांची यादी पुढे पाठवली. स्टॅलिनने जेव्हा ती यादी वाचली तेव्हा त्याने विचारले, यात नेरूदाचं नाव का नाही?' त्याच्या पुढच्या वर्षी नेरूदाना लेनिन पारितोषिक मिळाले.

एकदा पॅब्लोचे मित्र एहरेनबर्ग यांना स्टॅलिनचा फोन आला, 'काल मी काल रात्रभर तुमचं 'फॉल ऑफ पॅरिस' वाचत होतो अशीच चांगली पुस्तकं लिहीत चला.'

कदाचित त्या फोनमुळेच एहरेनबर्गला दीर्घायुष्य मिळाले असावे असं पॅब्लोंना वाटतं.

स्टॅलिनच्या स्वभावातील चागले गुण पॅब्लोंना माहीत होते. म्हणून ते त्याला मानतात. एकदा मायकॉव्हस्कीच्या निधनानंतर रशियामध्ये त्या महान कवीला बदनाम करण्याची मोहीम चालू झाली. त्याच्या जीवनातील सगळया गोष्टी उकरून त्याला रशियन साहित्यातून नामशेष करण्याचा घाट काही मंडळीनी रचला.

मायकॉव्हस्कीची प्रिया त्याने अस्वस्थ

**स्टॅलिनच्या स्वभावातील चांगले गुण पॅब्लोंना माहीत होते. म्हणून ते त्याला मानतात.**

झाली. तिने मायकॉव्हस्की, त्याची कविता, त्याचा मोठेपणा आणि मडळीचे कारस्थान यावर एक विस्तृत पत्र खुद्द स्टॅलिनलाच लिहिले. या पत्राच्या मार्जिनवर स्टॅलिनने लिहून ठेवले, 'मायकॉव्हस्की सोव्हिएट युगातील सर्वांत महान कवी आहे!' आणि मग या वेदवाक्याला कोण विरोध करणार? मायकॉव्हस्कीच्या विरोधकाचा डाव मोडून पडला. त्यानंतर रशियामध्ये मायकॉव्हस्कीची अनेक स्मारके झाली. त्याच्या कवितांच्या सुदर सुंदर आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या.

पॅव्लोंना समजलं की, स्टॅलिनने एक यादी करून ठेवली होती. खालील व्यक्तींना स्पर्श करू नका! त्यामध्ये जगद्विख्यात दिग्दर्शक आयसन्स्टीन, थोर लेखक पास्तरनाक, सगीतकार शोस्ताकोव्हिच आणि पॅव्लोंचा मित्र एह्रेनबर्ग याची नावे होती.

पॅव्लोना समजलेला स्टॅलिन असा होता. नतरचे ते अमान्य करीत नाहीत; पण त्याच्या वाट्याला आलेल्या स्टॅलिनला न्याय देतात. कम्युनिस्टांना सत्य लवकर उमगत नाही आणि उमजले तर त्याला तोंड देणे कठीण जाते असं ते म्हणतात.

'माझ्या डोळ्यासमोर स्टॅलिन नावाचा एक तत्त्वनिष्ठ, चागला मनुष्य, एखाद्या साधूसारखा रशियन क्रांतीचा कट्टर पुरस्कर्ता उभा राहिला. भरघोस मिशा असणारा हा मनुष्य युद्धाच्या वेळी आभाळाएवढा मोठा झाला, त्याचं नाव ओठावर घेत लाल सैन्य लढले आणि हिटलरच्या राक्षसांची ताकद त्यानी खच्ची केली!'

आणि तरीसुद्धा स्टॅलिनच्या वाईट बाजूचे ते समर्थन करीत नाहीत. पुन्हा स्टॅलिनच्या कारकीर्दीची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी कम्युनिस्टानी सदैव जागरूक राहिले पाहिजे असं ते म्हणतात.

स्टॅलिनच्या मृत्यूनंतर एक कविता त्यांनी त्याच्या नावे लिहिली.

### अखेरचे बक्षीस!

फिडेल कॅस्ट्रोच्या उदयाने लॅटिन अमेरिकेसाठी नवे भवितव्य मिळाले आहे असे

---

### मी काही गोष्टी समजावून सांगतोय

तुम्ही विचाराल, लिली कोठे आहेत?
आणि अफूच्या पाकळ्याचे अध्यात्म?
आणि पावसाचा त्या शब्दांवर पुन्हापुन्हा मारा
आणि त्याचे पक्षी आणि झाकण करून टाकणे?
मी सगळी बातमी सागतो.
मी माद्रिदच्या एका उपनगरात राहिलो होतो
घंटा, घड्याळे आणि झाडे असणाऱ्या.
तेथून सगळं कॅस्टीली दिसायच,
चामडी समुद्र दिसायचा.
माझ्या घराला म्हणायचे
'फुलाचे घर' म्हणायचे. कारण प्रत्येक भेगेतून
फुलझाडे उगवायची. ते एक
चांगले घर होते.
कुत्र्यांनी, पोरानी भरलेले
राऊल आठवतय?
अरे राफाएल,
फेडरिको, तुला आठवतंय?
तुझ्या कबरीमध्ये.
माझ्या ओट्यामध्ये जूनच्या प्रकाशात
माझ्या भावा, माझ्या भावा,
तुझ्या मुखात फुल बुडाली होती.
प्रत्येक गोष्ट
वाचाळ, मोठ्या आवाजाची. व्यापाराचे मीठ
धाकधूक करणाऱ्या पावाचे ढीग.
'अर्ग्युएलेस' या माझ्या उपनगरातील स्टॉल्स, पुतळा,
हेक माशाच्या पळापळीत मोकळा शाईचा शिसा जसा.
चमच्यातून वाहणारे तेल
रस्त्यातून फुगलेल्या हातापायाचा
मोठा भूत्कार
मीटर, लिटर, आयुष्याची नेमकी मापं.
माशांच्या थप्प्या,
छपराच्या रचना, थंड सूर्य ज्याच्याखाली
पवनचक्क्या चुकायच्या,
बटाट्यांच्या सुदर, हस्तीदंती
समुद्राकडे जाणाऱ्या टोमॅटोच्या लाटांवर लाटा
आणि एके सकाळी हे सगळं जळत होतं
एका सकाळी आगीच्या लाटा
भूमीतून उसळल्या
मानवी जीवाचे त्यांनी घास घेतले—
आणि नतर आगच आग
नंतर बंदुकीची दारू
नंतर रक्त
विमानं आणि राक्षस असणारे लुटारू
अंगठ्या घातलेले, राजकुमाऱ्या बाळगणारे लुटारू
काळे धर्मगुरू आशीर्वाद देत असलेले लुटारू
आकाशातून पोरांचा नाश करायला आले
आणि पोरांचे रक्त रस्त्यावरून वाहिले
विनातक्रार, पोराच्या रक्तासारखेच
कोल्ह्यानासुद्धा तिटकारा वाटेल असे कोल्हे
काटेरीसुद्धा चावेल, थुंकेल असे दगड
विषारी सापही तिटकारेल असे साप
अगदी समोरासमोर मी रक्त पाहिलंय
स्पेनचं रक्त उंच लाटाप्रमाणे वाहताना
ज्यामध्ये गर्व आणि सुरे बुडून जावेत असं.
विश्वासघातक्यानो,
सेनापतीनो,
माझं मेलेल घर पाहा
उध्वस्त स्पेन पहा
प्रत्येक घरातून फुलाऐवजी
जळता धातू वाहतोय
स्पेनच्या प्रत्येक साध्यातून
स्पेन परत उठतोय
प्रत्येक मेलेल्या मुलातून
डोळे असणाऱ्या बंदुका
आणि प्रत्येक गुन्ह्यातून गोळ्या
एक दिवस
या तुमच्या हृदयाचा वेध घेतील
तुम्ही विचाराल ही कविता
नाटक आणि पाने याबद्दल का बोलत नाही?
तिच्या देशातील ज्वालामुखीबद्दल का बोलत नाही?
या आणि बघा
रस्त्यातील रक्त!
या आणि बघा
रस्त्यातील रक्त!
या आणि बघा
रस्त्यातील रक्त!

□

(I am explaning a few things.)

पॅब्लोना वाटते. फिडेल त्या काळात अत्यंत लोकप्रिय होता. अमेरिकेचा तो हिरो बनला होता. पॅब्लोना तो एकदा भेटला होता. पॅब्लोंना त्याचा स्वभाव खूप आवडला. पॅब्लोंना तो मोठा मनुष्य वाटला नाही तर अचानक जबाबदारी पडल्याने प्रौढ बनलेला मुलगा वाटला. त्याची दाढी, तो लष्करी पोषाख यामागे एक बालिश भाव पॅब्लोना दिसला.

डॉ. अर्नेस्टो चे गव्हेरा पॅब्लोना हॅवाना-मध्येच भेटला. तो त्या वेळी क्युबाचा मंत्री होता. ही भेट पहाटे एक वाजता झाली.

'चे लष्करी पोषाखात होता. त्याच्या कमरेला पिस्तोल्स होती. तो ज्या ऑफिस-मध्ये बसला होता त्याच्याशी ते विसंगत दिसत होते. हळू बोलणाऱ्या चेच्या आवाजात अर्जेन्टिनाचा हेल होता. छोटी वाक्ये बोलून तो स्मितहास्य करे.'

'कँटो जनरल' चा तो भोक्ता होता. पॅब्लोना त्याने भारावून टाकले. त्याने सांगितले की, क्रांतीच्या वेळी इतर क्रांतिकारकांना तो कँटो जनरल रात्री म्हणून दाखवी.

बोलता बोलता त्याने खिडकीतून बाहेर पाहिले आणि स्वप्निल डोळ्यांनी तो पॅब्लोना म्हणाला, 'युद्ध... युद्ध .. आम्ही नेहमीच युद्धाच्या विरोधी आहोत; पण एकदा आम्ही युद्ध लढलो की आम्हाला युद्धाशिवाय राहाता येत नाही. सारखे आम्हाला युद्धावर जावेसे वाटते!'

पॅब्लोंना धक्का बसला. त्याना जाणवल की हा कायमचा योद्धा आहे; सतत काही तरी युद्ध चालवणारा.

चेच्या बॅगेत तो मरेपर्यंत फक्त दोन पुस्तके असायची. एक गणिताचे पुस्तक आणि दुसरे म्हणजे पॅब्लोचे 'कँटो जनरल.'

बदूक आणि कविता बरोबर बाळगणारा योद्धा होता तो.

न्यूयॉर्कमध्ये पॅब्लोच्या कवितावाचनाचा मोठा बहारदार कार्यक्रम झाला. हजारोंनी लोक उपस्थित होते. विशेष म्हणजे अमेरिकन साम्राज्यवादाचा कट्टर निषेध करणाऱ्या या कविता अमेरिकन तरुणानी मन लावून ऐकल्या आणि खास जागाना दाद दिली. सरकार म्हणजे लोक नव्हेत हे पॅब्लोना जाणवले. सर्वसामान्यांना हे नको आहे हे त्यांना पटले.

पण नंतर 'लाइफ' मासिकाने त्यांची जी मुलाखत घेतली त्यात वेगळे काही घातले. पॅब्लोंनी व्हिएटनामवरील आक्रमणाचा निषेध केला होता, एका निग्रो नेत्याच्या खुनाचा निषेध केला होता ते त्यांनी गाळले. क्यूबन क्रांतीचा त्यानी उदो-उदो केला होता तेही वेगवेगळ्या स्वरूपात आले.

क्यूबन लेखकानी पॅब्लो प्रतिक्रांतिकारक आहेत, असा प्रचार सुरू केला. नतर बऱ्याच लेखकानी पॅब्लोना आपण त्यात नव्हतो असे सांगितले. चिलीच्या कम्युनिस्ट पक्षाने मात्र हा हल्ला आपल्यावरच आहे, असे मानले.

हळूहळू हे वादळ शमून गेले.

पॅब्लोची लोकप्रियता पाहून कम्युनिस्ट पक्षाने १९७० च्या दरम्यान चिलीसाठी अध्यक्षीय उमेदवार म्हणून निवडले. कम्युनिस्ट पक्षाला दुसरा उमेदवारही नव्हता. इतर डाव्या पक्षाना एकत्र आणणे आवश्यक होते. पॅब्लोच्या उमेदवारीने सामान्यजन खुश झाले; पण पॅब्लोच्या मनात ते नव्हते. चिलीचा राष्ट्राध्यक्ष झालोच तर काय करायचे असा पेच पॅब्लोना पडला होता. कारण अनेक समस्या होत्या. देश कर्जबाजारी होता.

तेवढ्यात त्यांचा प्रश्न सुटला. पॉप्युलर युनिटीतर्फे त्याचा मित्र साल्वादोर आयंदेंची उमेदवारी जाहीर झाली. आपल्या मित्रासाठी पॅब्लोनी माघार घेतली.

आयंदेंची काम करण्याची क्षमता राक्षसी होती. तो हवा तेवढा काळ काम करू शके आणि केव्हाही झोपू शके.

पॅब्लोंनी आयेंदेची प्रचारमोहीम हाती घेतली आयेंदे म्हणजे इंदिरा गांधीसारख्या प्रचारसभा घेणारा माणूस होता. हेलिकॉप्टरने, जहाजाने, रेल्वेने एका दिवसात कितीही ठिकाणी सभा घ्यायच्या; पण दमायचे नाही. इतर प्रतिस्पर्धी त्याबाबीत मागे पडले त्यात पॅब्लोची लोकप्रियता!

प्रचंड मताने आयेंदे निवडून आले!

पुन्हा एकदा पॅब्लोना पॅरिसमध्ये राजदूत म्हणून जावे लागले. ती जबाबदारी पॅब्लोंनी एक मित्र जॉर्ज एडवर्डस यांच्या सहकार्याने पार पाडली. आयेंदेंनी चिलीला प्रगतिपथावर आणण्याच्या दिशेने मोहीम सुरू केली होती. चिलीला आता थोडेफार महत्त्वही येऊ लागले होते.

पण पॅब्लो आपल्या देशात परत आले, तेव्हा त्यांना विरोधी प्रवृत्तीही वाढू लागल्याचे दिसून आले होते. विशेषत: फ्रेई या माणसाची महत्त्वाकांक्षा कोणत्याही थराला जाणार असे दिसत होते.

आयेंदेंच्या विरोधी वातावरण बनत चालले होते. चिलियन जनतेच्या दृष्टीने महत्त्वाचे जे, ते आयेंदे करीत होते. ताब्याच्या खाणी म्हणजे चिलीची सपत्ती. ती राष्ट्रीकृत केल्यामुळे भाडवलदार हलले होते.

त्यामुळे ११ सप्टेंबरला चिलीमध्ये उठाव झाला. यापाठीमागे होते असंतुष्ट फ्रेई वगैरे. लोकशाही न आवडणारे काही असंतुष्ट लष्करी आणि भांडवलदारवर्ग. त्यामध्ये साल्वादोर आयेंदेचा खून झाला!

पॅब्लो आपल्या या मित्राबद्दल खूप लिहितात. 'आयेंदे मोठा वक्ता नव्हता, पण एक राजकारणी म्हणून सल्ला घेतल्याशिवाय तो पुढे सरकत नव्हता. तो प्रति–हुकूमशहा होता...तो सर्वांचा नेता होता. तो बहुजन समाजातील नव्हता; पण या समाजाने त्यांना पिळणाऱ्या समाजाला दिलेल्या लढ्याचे अपत्य होता... तांब्याचे राष्ट्रीयीकरण ही त्याची मोठीच कामगिरी होती. त्याने मक्तेदारी संपवली. दूरदर्शीपणे शेती सुधारली आणि इतर अनेक...

त्याच्या मृत्यूबद्दल ते लिहितात.–

'हवाईहल्ल्यानतर रणगाडे आले. अनेक रणगाडे विरुद्ध एक माणूस! चिलियन प्रजासत्ताकाचा अध्यक्ष साल्वादोर आयेंदे. तो त्यांची वाट पहात थाबला होता. त्याच्या मोठ्या हृदयाशिवाय दुसरे कोणी त्याच्याजवळ नव्हते.'

साल्वादोर आयेंदेच्या मृत्यूने पॅब्लो हादरले. सैनिकांनी पुन्हा एकदा चिलीचा विश्वासघात केलाय हे त्याना जाणवले. केवळ चिलीचा विचार मनात असणारा तो महाकवी हा धक्का पचवू शकला नाही.

वर दिलेला पॅरा लिहिल्यानतर केवळ ९ दिवसांनी २३ सप्टेंबर १९७३ रोजी वयाच्या ६९ व्या वर्षी पॅब्लो नेरूदा कालवश झाले!

चिलीचा विश्वासघात करणाऱ्यांनी पॅब्लो राहात असलेले घर तोडफोड करून उध्वस्त केले होते. आयुष्यभर 'चिली' जपल्यावर त्यांना हे बक्षीस मिळाले! □

(Pablo Neruda-Memoirs या ग्रंथावरून)

पुस्तके

# सावरकरांच्या विज्ञानवादी व समाजसुधारक विचारांचे सार

सावरकरांचे जन्मशताब्दिवर्ष संपले !

शताब्दी वगैरे संपली म्हणजे एक तर आपण त्या व्यक्तीला विसरायला मोकळे किंवा गौरवाचा शेंदूर काढून जरा मूळ प्रतिमा पाहण्याचा प्रयत्न करू शकतो. सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वावर असे बरेच लिखाण झाले आहे. या लिखाणातून एक गोष्ट जाणवते. सावरकर या व्यक्तीचाच विचार जास्त झालेला आहे; परंतु सावरकर ही एक स्थिती (Phenomena) काळाच्या गरजेला पूरक अशी प्रतिक्रिया होती, हे फारसे लक्षात घेतले जात नाही.

'कालस्य कारणं राजा' वा 'राजा कालस्य कारणम्' हा वाद व्यक्ती व परिस्थितीबाबत लागू होतो. शास्त्रकार 'कालस्य कारणं राजा' म्हणून मोकळे झाले; परंतु आधुनिक बहुल व गुंतागुंतीच्या समाजात व्यक्ती आपणहून काही करते असे म्हणण्यापेक्षा सभोवतालच्या परिस्थितीला आपला प्रतिसाद देते असे म्हणणे योग्य ठरेल. त्यात परिस्थिती व व्यक्ती या दोन्हींचे महत्त्व आहे. सावरकांबाबत हे अधिकच स्पष्ट होते.

१९ व्या शतकात महाराष्ट्रात इंग्रजी राज्याची (एकंदर गुलामगिरीची) प्रतिक्रिया म्हणून तीन प्रवाह निर्माण झाले. पहिला आत्मगौरवाचा व समर्थनाचा प्रवाह, दुसरा रानडेप्रणीत एका मर्यादित प्रमाणातील व वर्तुळातील धीम्या सुधारणेचा. ज्योतिबा फुल्यांच्या नेतृत्वाखालचा तिसरा प्रवाह या दोघांवर कोरडे ओढणारा होता. हा रॅडिकल प्रवाह म्हणता येईल. मुळापासून सामाजिक ढाचा बदलला पाहिजे असे याचे म्हणणे. राष्ट्रवाद हा एक नवा प्रवाह शेवटच्या काळात आला. त्यात प्रचलित सामाजिक स्थितीला धक्का लावायचा उद्देश नव्हता.

एखाद्या विकसनशील व स्वातंत्र्योन्मुख समाजाला हे सर्व प्रवाह उपयुक्त ठरतात. पाश्चात्य देशात राष्ट्रबांधणी (Nation-building) व समाजबांधणी ही वेगवेगळ्या क्षणी झाली. ल्यूथरच्या काळानंतर राष्ट्र-राज्ये आली. भारतात या दोन्ही प्रक्रिया एकदम सुरू झाल्या. (त्याच्या तपशिलात शिरण्याचे कारण नाही.) यामुळे राष्ट्रबांधणी व सुविहित समाजनिर्मिती या दोन्ही कार्यांवर मर्यादा पडल्या.

सावरकरांसमोर हे सर्व प्रवाह होते. त्यांच्या एकत्रीकरणामुळे प्रत्येक घटकावर असलेल्या मर्यादाही त्यांच्या विचारात होत्या.

मात्र या प्रवाहांमध्ये कुठेही नसलेले दोन विचार सावरकरांनी आणले. विज्ञानवाद किंवा विवेकवाद (Rationalism) आणि वास्तववाद (Realism) हे सावरकरांचे खास वैशिष्ट्य आहे. अर्थात हे विचार राष्ट्रनिर्मिती व समाजरचना यांच्यासोबतच आल्याने त्यांनाही मर्यादा पडल्या. तसेच रॅशनॅलिटी व रिॲलिटी यातल्या सूक्ष्म संघर्षाने त्यांच्या विचारांना वेगळे वळण दिले.

## पुरोगामी आत्मगौरव

भा. कृ. केळकरांनी 'समाजसुधारक सावरकर' या पुस्तकात सावरकरांच्या विज्ञाननिष्ठेचे व पुरोगामी सामाजिक विचारांचे दर्शन घडविले आहे. सावरकरांना राष्ट्रनिर्मिती अभिप्रेत होती. त्यात आत्मगौरवाची भावना जगवणे ही एक युक्ती होतीच. सावरकरांनी चितोड, पेशवे वगैरेंच्या गौरवाबरोबरच त्यांच्या वेळी वास्तवतेचे भान कसे नव्हते हे दाखवून दिले. तसेच भारतीय परंपरेचा अभिमान व्यक्त करताना यज्ञसंस्थेपासून ग्रहण–गाय इत्यादिविषयक समजुतीतली अवैज्ञानिक दृष्टी स्पष्ट केली. आत्मगौरव जागा करण्याची दयानंद-विवेकानंद–विष्णुबुवा ब्रह्मचारी यांची पद्धती वेगळी होती. मागील पद्धती व ज्ञान आताही कसे लागू आहे याचाच प्रचार या प्रकारच्या आत्मगौरवात होता. सावरकरांनी भारतीय तत्त्वज्ञानाची थोरवी फारशी गाइली नाही. कालचे ज्ञान आजही उपयोगी आहे असे त्यांचे म्हणणे नव्हते.

सावरकर रिॲलिस्ट होते. त्यांना राष्ट्रबांधणी पाहिजे होती. त्यासाठी एकत्व आवश्यक. म्हणून पूर्वीच्या सामाजिक परंपरेचा (धार्मिक किंवा आध्यात्मिक नव्हे.) आधार घेऊन त्यांनी आपण एक आहोत, आपलीही काही किंमत आहे अशी भावना जागविण्याचा प्रयत्न केला.

एक होण्यासाठी समाजातील दोष दूर व्हायला हवेत, हे वास्तव कळल्याने समाजसुधारणा करण्याची गरज त्यांना वाटली आणि आगरकरांप्रमाणेच पूर्ण बुद्धिवादी पायावर ही सुधारणा करण्याचे त्यांचे प्रयत्न झाले, असे केळकरांनी आपल्या पुस्तकात प्रतिपादन केले आहे.

केळकरांनी आपल्या पुस्तकात सावरकरांच्या पूर्ण जीवननिष्ठेला सामाजिक तत्त्वज्ञान व विज्ञानदृष्टी यांची बैठक होती असे दाखविले. सावरकरांच्या लिखाणातील वैज्ञानिकता प्रकट करणारे अनेक उतारे त्यात दिले आहेत. सावरकरांचा धर्मांतर व शुद्धीकरणासंबंधीचा विचार वास्तववादातून उदयाला आला असे ते म्हणतात. सर्वांत शेवटचे प्रकरण हे विचारांना चालना देणारे आहे. डॉ. केतकर, एम. एन. रॉय, गोळवलकर, भौतिकवादी व कम्युनिस्ट यांचे विचार यांचा सावरकर-विचाराशी संदर्भ जोडला आहे.

## बुद्धिवाद व हिंदुत्ववाद

सावरकरांचा विज्ञानवाद व बुद्धिवाद पाहिला म्हणजे हा माणूस हिंदुत्ववाद व एकराष्ट्रवादाचा कसा पुरस्कार करतो याचे क्षणभर(च) आश्चर्य वाटते. शब्दनिष्ठा, पोथीनिष्ठा टाकून द्या म्हणताना विज्ञान आपले अज्ञान तरी निःसंकोचपणे सांगतो असे ते म्हणून जातात. धर्म म्हणजे शब्द-

निष्ठा आणि त्याचे विज्ञानाशी साहचर्य असणे केवळ अशक्य असे ते म्हणतात. 'धर्मभोळेपणाची अफू' अशी तद्दन मार्क्सच्या जवळ जाणारी भाषा ते करतात.

रत्नागिरीच्या पतितपावन मंदिरात युसुफ मेहरअलीना घेऊन जाण्यात दुसरा हेतू असेल. मात्र यासंबंधी धनंजय कोर लिहितात :

...' It was no wonder that rationalist Sawarkar should do so. He himself was not a beliver in God...'
(Veer Savarkar, P. 201)

कीरानी हे पुस्तक सावरकरांना दाखवूनच प्रसिद्ध केले होते.

'सावरकरांनी हिंदूसाठी वैज्ञानिक मूलतत्त्ववाद सांगितला.' असे केळकर यांनी आपल्या पुस्तकात म्हटले आहे धर्म, राष्ट्र यासारख्या कल्पनांचे कोतेपण सावरकरांना माहीत होते

## हिंदूंच्या संदर्भात विज्ञान

तरी सावरकर राष्ट्रवादी, तेही हिंदू-राष्ट्रवादी होते. सावरकरांचा 'वैज्ञानिक मूलतत्त्ववाद' हिंदूसाठी (च) होता! ही वैज्ञानिक–रॅशनालिस्ट दृष्टी वास्तवतेचे भान ठेवून आली. किंबहुना, वास्तवतेच्या गरजेतून एक साधन म्हणून ही वैज्ञानिक दृष्टी व समाजसुधारणा प्रसृत झाली. विज्ञानवादातून वास्तवाची रचना करावी असे नव्हते.

परकीय सत्ता व गुलामगिरी यांच्या विरोधास राष्ट्रबांधणी पाहिजे. राष्ट्रबांधणी म्हणजे अपरिहार्यपणे हिंदूचे संघटन असा त्यांचा विचारहोता. किंबहुना, गांधीपर्यंत समाजसुधारणा व राष्ट्रनिर्मिती यांचा विचार हिंदूंच्या संदर्भातच केला गेला. सावरकरांनी तोच कित्ता उचलला. मात्र या वेळची परिस्थिती वेगळी होती. मुस्लिम राष्ट्राची कल्पना पुढे आली. मोपल्याचे बंड होऊन हिंदूंची कत्तल झाली. गांधी–नेहरूंसारख्यांनी याबद्दल साधा निषेधही व्यक्त केला नाही. उलट खिलाफत चळवळीसारख्या धार्मिक मूलतत्त्ववादी चळवळीला उचलून धरले!

## वास्तव भानातून हिंदुत्ववाद

या सर्वांचा परिणाम सावरकरांवर झाला. ते वास्तववादी होते. या घटनेचा अन्वयार्थ लावताना त्यांनी हिंदू व मुसलमान हे आजतागायत दोन गट आहेत व त्यांची मूल्ये, हितसंबंध वेगळे आहेत, हे स्पष्ट ओळखले व सांगितले.

भारताचे सध्या असलेले सर्वसमावेशक उदार स्वरूप टिकवायचे असल्यास एक तर सर्वांनी आपापल्या धर्मपंथाचा त्याग करावा किंवा हिंदूचे प्राबल्य राहील असे संघटन व्हावे अशी त्यांची भूमिका होती. 'हिंदुत्व' ग्रंथात त्यांनी मुस्लिम व हिंदू समाजाचा तौलनिक इतिहास समोर ठेवून 'हिंदू' स्वरूप टिकले तरच भारताचे अस्तित्व राहील असे स्पष्ट केले. या कारणासाठी पुढे त्यांनी आपली बुद्धिनिष्ठा राबविली.

वास्तववादाबरोबरच आपल्या वर्णीय संस्कृतीचा एक धागा त्यांच्याबरोबर होता. सप्तशृंखला तोडण्याच्या प्रचाराबरोबरच आंतरजातीय विवाहाला ते तेवढे अनुकूल नव्हते. अस्पृश्य समाजातील नेत्याची आंतरजातीय विवाहाची मागणी अयोग्य असल्याचे ते म्हणाले. ( Savarkar considered this view mistaken, extravagant & unjustifiable–Keer p. 189 ) त्याचप्रमाणे अहिंदूशी विवाहसंबंध तर त्यांना नकोच होता. हिंदू राष्ट्रासाठी ते हानिकारक आहे, असे त्यांचे म्हणणे होते.

## संकल्पनेतील अस्वस्थता

इथून सावरकरांच्या राष्ट्रवादातील अस्वस्थता लक्षात येते. केळकरांनी आपल्या पुस्तकातल्या शेवटच्या प्रकरणात या राष्ट्रवादासंबंधी तौलनिक विचार व्यक्त केले आहेत. हिंदुत्वाशिवाय या देशाचे राष्ट्रीयत्व सिद्ध होणार नाही. त्यासाठी हिंदूंची संघटना व पुनर्घटना आवश्यक ठरते आणि हे हिंदुत्व सामाजिक स्वरूपाचे आहे, आध्यात्मिक नव्हे, असे सावरकरांचे मत होते.

मात्र हिंदुत्व हीच राष्ट्रीयत्वाची मर्यादा असावी काय ? सावरकर म्हणतात की, हिंदुत्व ही फार व्यापक संकल्पना आहे. पितृभू–पुण्यभू आदी तत्त्वांवर आधारलेली ही संकल्पना आहे. सावरकरांना हाच प्रादेशिक राष्ट्रवाद अभिप्रेत होता काय ? त्यात ख्रिश्चन–मुस्लिम यासारखे गटही त्यांना खरोखरच अभिप्रेत होते ? ख्रिश्चन, ज्यू, पारशी यांच्याबद्दल सावरकरांना संशय नव्हता. मात्र मुस्लिमांच्या देशनिष्ठेबद्दल त्यांना जबरदस्त शंका होती.

हिंदू-मुस्लिम तंटा हा दुसऱ्या कुणी (इंग्रजांनी इत्यादी) लावला नसून तो झगडा स्वयंभूच आहे व मुस्लिमांना या राष्ट्राचे तुकडे करायचे आहेत असे त्यांचे म्हणणे. मुस्लिमांना या देशात समान वागणूक मिळाली पाहिजे. मात्र काही वर्षे तरी त्यांच्याबद्दल संशय बाळगला पाहिजे हे त्यांचे म्हणणे. मुस्लिमांची उद्दिष्टे या देशाबाहेरची आहेत, ही त्यांची भूमिका.

सावरकर अनेकदा संस्कृती, वंश, राष्ट्र, प्रदेश या संकल्पनांची अदलाबदल करतात.

त्यांचे विश्लेषण करायचे झाल्यास राष्ट्रवादाची भूमिका कायम राखण्यासाठी त्यांनी याचा उपयोग करून घेतला. प्रादेशिक राष्ट्रवाद किंवा सांस्कृतिक राष्ट्रवाद जमेस धरला तरी त्यात ख्रिश्चन–मुस्लिम आदी जमातींच्या संस्कृतीचा भाग यावयास हवा. सावरकरांमधला बुद्धिवादी इथे मागे पडतो. ते हिंदुत्व ( प्रादेशिक ) एकदम वैदिक संस्कृतीशी (च) जोडतात. त्यानुसार ढोबळपणे जी मूल्ये, तत्त्वे, आचरणप्रणाली तयार होत आहे ती हिंदू संस्कृती– आणि हेच हिंदू राष्ट्र म्हणजे आसिंधुसिंधुपर्यंत. (थोडक्यात भारत ! ) त्यात मग प्रादेशिक राष्ट्रवादाऐवजी वेगळाच वास येतो. द. न. गोखले याचा संदर्भ देऊन केळकर म्हणतात, 'डॉ. केतकरांचा हिंदुत्वविचार प्रादेशिक वाटतो, सावरकरांचा हिंदुत्वविचार वांशिक वाटतो.' हे शब्द बरेच खरे आहेत.

मुसलमानांची आक्रमक वृत्ती, सवता सुभा मागण्याची प्रवृत्ती जेव्हा सावरकरांच्या प्रत्ययास आली त्या वेळी हिंदू हेच स्वयंभू राष्ट्र आहे, मुसलमानादिक समाज म्हणजे हिंदूंच्या देशातील अल्पसंख्य जमाती आहेत असा पुकारा मुसलमानांना धुतकारून ते करू लागले. ( द. न. गोखले )

इथे सावरकरांच्या प्रादेशिक ते वांशिक राष्ट्रवादातला 'प्रवास' लक्षात येतो. मोपल्यांचे बंड, पाकनिर्मितीचळवळ, खिलाफत आदि अनुभवांनी सावरकरांनी आपला मूळ (प्रादेशिक) विचार वांशिकदृष्टीत परिवर्तित केला असेल !

सावरकरांच्या हेतूविषयी शंका न घेताही असे म्हणता येते की, बुद्धिवादी व वैज्ञानिक

दृष्टीचे इतिहासाचे अभ्यासक सावरकर इथे कमी पडले. विचारवंत म्हणून वर्तमान परिस्थितीत जे दिसले त्यावर आपली अनुमाने ते बांधू लागले एके ठिकाणी त्यांनी असेच नेहमीप्रमाणे अनैतिहासिक राणा भीमदेवी विधान केले ते म्हणतात, 'शक, कुशाण, हूण यासारख्याना भरतभूमीने गिळंकृत करून रिचवले आहे.'

इथे सावरकराचा राष्ट्राभिमान स्पृहणीय असला तरी ऐतिहासिक दृष्टी व बुद्धिवादावर मर्यादा पडतात. भारतीय किंवा हिंदू देखील यांची संस्कृती ही एका ठराविक वेळी निर्माण झालेली नाही. कोणतीही संस्कृती तशी निर्माण झालेली नसते. शक–कुशाण यानीच तर इसवी सनानंतर 'हिंदू' संस्कृती समृद्ध केली! ते हिंदू संस्कृतीने रिचवले का त्यानी आधीच्या 'हिंदू' संस्कृतीला बदलले?

## आत्मगौरव गैरलागू !

आधुनिक ज्ञानाच्या दृष्टीने तर हा आत्मसंतुष्टतेचा गौरवशाली भूतकाळाच्या कल्पनेवर आधारलेला राष्ट्रवाद नकली व फोल वाटू लागतो. इथली म्हणून जी काही संस्कृती आहे–(कला–शिल्प–संगीत–धर्म इ. इ.) ही एकट्या 'आसिंधुसिंधूपर्यंत' भूमीतील नाही. अशोकस्तंभाचा उगम भारतीय मूर्तिकलेचे मूळ इराण–ग्रीक कलेत आहे, हे सिद्ध झाले आहेच. त्याशिवायही अनेक नव्या गोष्टी शोधता येतात.

इथेही काही निर्माण झाले ते केवळ 'वैदिक' (?) वांशिक परपरेतूनच नसून अनेक समूहाचा त्यात वाटा आहे. त्यात लाज वाटून घ्यायचे काहीच कारण नाही. निखळ ज्ञान–तर्कशुद्ध विचार व शोध यांचा तो परिपाक आहे. (हे मान्य नसले की पु. ना. ओकांसारखी प्रवृत्ती निर्माण होते. सर्व आमचे–इथले! म्हणजे (कुणाचे? कशावरून?)

सावरकर आपला बुद्धिवाद या हद्दीपर्यंत नेतच नाहीत. सध्याच्या गरजेवर तोडगा म्हणून आवश्यक असेल तेवढीच बुद्धिनिष्ठा व तर्कशुद्धता ते अवलबतात. हे चूक आहे की बरोबर याचा निर्णय देताही येईल. मात्र सावरकरांवर इतर गैरलागू आरोप करायचे नाहीत. एक गोष्ट स्पष्ट की, जेवढा गवगवा केला जातो तेवढे सावरकर बुद्धिनिष्ठ, प्रादेशिक राष्ट्रवादी तर्कसुसगत नव्हते. भाववशता, वांशिकता, सूक्ष्म पूर्वग्रह हे त्याच्यातही होते. त्याची वैज्ञानिक दृष्टी, यंत्रगौरव हा साधनरूपच होता. हिंदुत्वासाठी त्याचा वापर होता.

## बुद्धिनिष्ठेच्या मर्यादा

सावरकरानी आर्थिक–सामाजिक घडामोडीकडे व त्यामुळे समाजजीवनात होणाऱ्या बदलाकडे पाहिलेच नाही. यंत्रासाठी आपण तयार राहिले पाहिजे, असे सागताना त्याना मनुष्याचे विचार हे स्वयभू असतात. त्याना हवे तसे बदलण्याची त्याची कुवत आहे हे अभिप्रेत होते. मात्र या यत्राचा–भौतिक प्रगतीचा मनुष्यावर काही परिणाम होतो, त्यामुळे त्याची आचारप्रणाली (त्याच्या स्वयंभू इच्छेविरुद्धदेखील) बदलावी लागते, हा मार्क्सवादातून निघालेला एक पूरक विचार त्यानी कुठेच केलेला दिसत नाही. तसा विचार केला असता तर, निरनिराळ्या समाजगटांतील आजचे सबंध किंवा एका समाजगटातील अतर्गत गतिमानता (Dynamics) अपरिहार्यपणे बदलत जाते हे त्यांनी मान्य केले असते. या आर्थिक (यांत्रिक) बदलांच्या संदर्भात राष्ट्रवाद, वांशिक–प्रादेशिक अस्मिता, स्वयभूपणा या सर्व संकल्पनांची धारच कमी झाली असती. सावरकर आधुनिकतेचे उद्गाते आहेत म्हणताना, त्यांनी आधुनिकतेचा भूतकाळातील व वर्तमानकाळातील परिस्थितीमध्ये अनुकूल असे बदल करण्यासाठी उपयोग करून घेण्याची वाट दाखविली असे फार तर म्हणता येईल. आधुनिकतेची, विज्ञानाची स्वतःची काही गती असते हे त्यानी ओळखले नाही.

अर्थात हा दोष (असलाच तर) तो सावरकरांचा नाही. (माणूस हा परिपूर्ण नसतो वगैरे!) १९२० नंतर भारतात जी काही परिस्थिती निर्माण झाली, त्यानुसार राष्ट्रवाद, आत्मगौरव, हिंदुत्व, आधुनिकता, सुधारणा आदी सर्वच घटकाची आवश्यकता होती. त्या प्रत्येकाकडे लक्ष दिल्याने प्रत्येक घटकावर मर्यादा पडून त्याचे कार्य व उद्दिष्टच बदलले. सावरकर त्या काळातील समाजातील या सर्वसमावेशक (!) (म्हणजे तडजोड व गोंधळाच्याही!) मनोवृत्तीचे एक प्रतिनिधी होते.

कोणत्याही एका विशिष्ट टप्प्यावर एक सुस्पष्ट विचार समाजात असतो किंवा तो समाजाचे मार्गदर्शन करतो असे कधीच नसते. प्रत्येक क्षण-काल अनेक रूप–रगांच्या मिश्रणाने आपल्या अनुमान–अपेक्षापेक्षा वेगळाच असतो. त्याला अमुकच एक रंग देणे आपल्या हातात नसते. आपण फार तर आपला रंग मिसळू शकतो. त्यापलीकडे त्या क्षणाची स्वतत्र गती असते. सावरकराच्या मर्यादा या दृष्टीतून बघायला पाहिजेत.

व्यक्तिशः पाहिले तर त्याना गांधीसारख्या चातुर्वर्ण्यवादी, ईश्वरनिष्ठ, 'जैसे थे' परिस्थितीवर लोकप्रिय होणारा पुढारी दुसरा मिळायचा नाही. सावरकर गांधीहून बुद्धिमान होते...त्याचे वाचन, दृष्टी, भावना व्यापक होत्या. गांधी–नेहरूपेक्षाही ते तर्कशुद्ध, विद्वान व अनहंकारी, निःस्वार्थी होते. कुठलाच लाभ नसताना, पाठबळ नसताना, वाहत्या वाऱ्याविरुद्ध झगडणारा दुबळ्या यष्टीचा तो एक माणूस होता. त्याच्या वेगळेपणाबरोबरच, त्यांच्या मर्यादाही जाणून घेतल्या तर त्यांना न्याय दिल्यासारखे होईल. संपूर्ण जाणून घेणे ही एक प्रकारे आदरांजलीच होय!

केळकर हे सावरकर या 'व्यक्ती' चे पूजकच आहेत. आपली इष्टदेवता जास्तीत जास्त उजळ दिसेल, त्यासाठी त्यावरचा शेंदूर काढून मूळ सतेज प्रतिमा दाखवणे, तसेच काही कमकुवत भाग फुलांनी झाकणे किंवा त्याकडे लक्षच न देणे हे तीनही प्रकार या पुस्तकात दिसतात. एक खरे, हे पुस्तक सावरकराच्या विज्ञानवादी व समाजसुधारक विचाराचे सारभूत 'रेफरन्सबुक' ठरू शकते.

—संजय संगवई

समाजसुधारक सावरकर
भा. कृ. केळकर
अस्मिता प्रकाशन, पुणे
पृष्ठे : १७७
किंमत : २५ रुपये.

## आयांचा पाऊस

शोभा भागवत

# एक साधी घटना

एक साधी घटना. सात–आठ वर्षाचं मूल शाळेत डबा विसरून आलं आहे. डबा हरवला आहे, हे लक्षात आल्यावर तुम्ही मुलाशी कसं वागाल, काय बोलाल असं आयांना विचारलं. प्रत्येकीनं जे सांगितलं त्यातून डबा हरवणे या घटनेचे इतके पैलू लक्षात आले.

अगदी मुलाला झोडपून काढण्यापासून ते ठीक आहे, दुसरा आण् म्हणेपर्यंतचे अनेक प्रकार.

आयांच्या ह्या सांगण्यातून मी नकळत त्यांची विधानं वेगळी करायला लागले आणि वाटलं की यातलं प्रत्येक विधान काही काही सांगतं आहे. त्याच्याकडे काळजीपूर्वक पहायला हवं आहे. आता बघा हं एकेकजण काय म्हणते आहे ते–

आई क्र.१ म्हणाली–मी त्याला विचारीन–

- डबा नेहमीच्या जागी ठेवला होतास का ?
- चुकून कोणी नेला तर नसेल ?
- तुझ्यासारखा कुणाचा डबा आहे का ?
- पुन्हा पुन्हा डबा हरवतोस, तुला आता शिक्षाच करते चांगली !

ही आई ज्या अनेक शक्यता मुलाच्या लक्षात आणून देते आहे ते चांगलं आहे. एकसारखे डबे असू शकतात. वेगळ्या जागी ठेवल्यानं वस्तू हरवू शकतात; पण नंतर एकदम तिच्यातली पारंपारिक पालकाची भूमिका जागी होते. 'पुन्हा पुन्हा डबा हरवतोस, शिक्षाच करते तुला.' याची जरूर असते का ? कित्येकदा खोडसाळपणे इतर कुणी डबा नेण्याचीही शक्यता असते.

आई क्र. २ म्हणाली–

- डबा कुठे हरवला, कसा हरवला ?
- मी स्वतः डबा शोधण्याचा प्रयत्न करीन मगच त्याला रागवेन.
- उद्या डबा मिळणार नाही.
- शाळेत बाईजवळ चौकशी करीन.

ही आई जे म्हणते आहे की, मी आधी प्रयत्न करीन, मगच त्याला रागवेन. यात एक न्यायाची भूमिका आहे खरी; पण मुलाचे प्रश्न त्याला सोडवू न देता प्रत्येक ठिकाणी आपण पदर खोचून पुढे सरसावणं असेल तर काळजी घ्यायला हवी. डबा हरवल्याबद्दल उद्या डबा मिळणार नाही या शिक्षेची जरूर मला वाटत नाही. त्यानं काही साध्य होणार नाही.

आई क्र. ३ चं उत्तर विचार करण्याजोगं आहे. फारच विचार करण्याजोगं. ती म्हणाली– असं एकदा घडलं होतं तेव्हा मी किती विचारलं तरी

- मुलानं काही उत्तरच दिलं नाही.

हे फार गंभीर आहे. मूल तिला उत्तरच देत नाही. मुलाला तिच्याशी संवाद साधावासाच वाटत नाही. एवढं कसलं दडपण मुलावर आहे ? का ते बोलत नाही ? आई–वडलांची भीती त्याच्यामागे आहे का ? त्याला आईबद्दल पुरेसा विश्वास नाही. कदाचित आईची बोलण्याची पद्धत चुकीची असेल. याचा विचार ह्या आईनं करायला हवा. विश्वासात घेऊन मुलाला बोलकं करायला हवं.

आई क्र. ४–फार मजेशीर बोलते.

- इतका कसा रे तू धांदरट ?
- म्हटलं तर तुला राग येईल; पण मी नेहमी सांगत असते नीट लक्ष देत जा आपल्या वस्तूंकडे म्हणून.
- बरं असू दे. उद्या शाळेत चौकशी कर.
- मित्रांना विचार सापडलाय का.
- पुन्हा हरवलास तर प्लास्टिकच्या पिशवीतून ब्रेड न्यावा लागेल !

ही आई प्रथमच मुलाला दोष देऊन मोकळी होते आहे. त्यातच 'मी' तुला सांगत असते हा स्वतःच्या 'अहं'चा टेंभाही मिरवायला विसरत नाही. मध्येच बरं जाऊ दे म्हणते. मग आपणच पुढे होऊन मुलाला काही मार्ग सुचवते आहे आणि अखेर प्लास्टिकच्या पिशवीतून ब्रेड न्यावा लागेल ही धमकीही देते आहे. ही आई हुषार आहे; पण ती मुलाला किती गोंधळात पाडत असेल ! बरं जाऊ दे असं तिनं म्हटल्यावर मुलानं निर्धास्त व्हावं, एवढ्यात ती त्याला धमकी देते. प्रथमच मुलाला दोष देऊन त्याला अपराधी वाटायला लावते. आपण अत्यंत हुषार आई आहोत असा तिला जरूर अभिमान असावा; पण मुलाला ही हुषारी गोंधळात पाडते आहे.

आई क्र ५ सांगते–

- आता पुन्हा डबा विसरू नकोस असं बजावीन.
- मूल विसराळू असेल तर ताबडतोब त्याला शाळेत पाठवून डबा आणायला लावीन.

ही आई अत्यंत प्रॅक्टिकल आहे. ती प्रथम बजावून टाकणार आणि निर्धास्त होणार. या बजावण्यानं काय साध्य होतं बरं ? ती पुढे लगेच कृती करते आणि मुलाला शाळेत पाठवून डबा परत 'आणायला लावते.' हे दोन शब्द महत्त्वाचे. तिने निर्णय घेतलाय. मुलानं फक्त आज्ञा पाळायचीय. यात संवाद, विचारविनिमयाला जागा नाही. हडेलहप्पीचं प्रशिक्षण आहे. अर्थात या उरक पाडण्याच्या वृत्तीमुळे डबा लगेच मिळायची एक शक्यता निर्माण होते हा त्यातला फायदा विसरून चालणार नाही.

आई क्र. ६ ची चौकशी मला जरा वकिली वाटली. तुम्ही बघा हं–

- डबा केव्हापर्यंत होता ?
- खाण्यापूर्वी व खाल्ल्यानंतर योग्य जागी ठेवला होता का ?
- डब्याशी काही खेळ केले का ?
- लपवून ठेवणे वगैरे चालू होते का ?
- अदलाबदल झाली असण्याची शक्यता?

आईचे हे वकिली प्रश्न कदाचित मुलाला आवडणार नाहीत; पण प्रत्येकाची बोलण्याची पद्धत सारखी कशी असेल ? ते आपण मान्य करू या. मुलं डब्याशी खेळ करू शकतात ही शक्यता तिला सुचलेली आहे हे विशेष.

आई क्र. ७–

- डबा हरवला ना ? कमालच आहे !

◦ आता काय करणार? उद्या शाळेत डबा घेऊन जाण्याची पंचाईत.

◦ असा कसा हरवला? परत परत किती रे घ्यायचं?

ही आई एकूणच गोंधळी असावी असं तुम्हाला वाटतं ती मुलाला काहीच सांगत नाही, विचारत नाही. कमालच आहे! असा कसा रे हरवला? आता काय करणार? ह्या विधानांनी ती नुसत्या गिरक्या घेत रहाते. मुलाने यातून काय समजायचं? उद्या डबा कशात द्यायचा; ही तिची काळजी रास्त आहे. परत परत त्याच गोष्टींसाठी पैसे खर्च करावे लागणार हा आर्थिक ताणही समजण्याजोगा आहे. हीच अडचण मुलाला तिनं स्पष्टपणे गोंधळ न घालता समजावून द्यायला हवी. ती सध्या बोलते आहे त्यातून फार काही व्यक्त होत नाही.

आ क्र. ८ काय म्हणते पाहू या–

◦ मला काही माहीत नाही. तू बाबांनाच सांग.

◦ त्याना वाटेल मीच तुझे लाड करते. सारखे नवीन डबे आणते.

◦ आता हरवणार नाही ना?

◦ दप्तरात होता तो कसा काय हरवला?

ह्या आईला बाबाचा धाक जबरदस्त असावा किंवा तीच बाबांना मोठेपणा देण्यात तत्पर असावी. ती मुलाला तोंफेच्या तोंडी देऊन स्वतःची सुटका करून घेते आहे का? आपण नवऱ्याला समजावून देऊ शकणार नाही इतकी स्वत:च्या असमर्थतेबद्दल किंवा नवऱ्याच्या आडमुठेपणाबद्दल तिची खात्री आहे. आता हरवणार नाही ना? या तिच्या प्रश्नाच मुलानं काय उत्तर द्यावं? तो तात्पुरतं नाही म्हणेल; पण त्याला फारसा अर्थ नाहीच.

आई क्र. ९–

◦ तू मस्ती करत असशील.

◦ मारामारीत पडला असेल कुठे तरी.

ह्या आईला मुलाच्या मारामारीचा राग आहे. डबा हरवला या घटनेचं भांडवल करून ती आपल्या मनातला राग बोलून दाखवते आहे. असं आपणही खूप वेळा करतो.

आई क्र. १० ची खात्री आहे की,–

◦ मुलगा अतिशय चंचल मनाचा आहे.

◦ तरी रोज आम्ही सगळी मोठी माणसं त्याला बजावत असतो तुझ्या वस्तू नीट ठेव म्हणून.

◦ तरी दहा वेळा सांगूनही तेच! काय करणार?

किती हा त्रागा! आणि मुलावर 'चंचल' हा शिक्का! रोज सगळ्या 'मोठ्या' माणसांच्या 'बजावण्याचा' मुलावर परिणाम होत नाही ही तिची खंत आहे, हे लक्षात घ्यायला हवं. दहा वेळा सांगून उपयोग होत नाही तर अकराव्यांदा काही वेगळा प्रयत्न करून बघावा असं या आईला वाटत असेल का? वाटायला हवं.

आई क्र. ११ ला फार राग आला–

◦ संताप मनावर होतो.

◦ दोन धपाटे घालते मी.

◦ मूल रडून झोपून जातं.

◦ डबा मिळेपर्यन्त कशात लक्ष लागत नाही.

◦ आता स्टीलच्या डब्याऐवजी प्लास्टिकचाच घ्यायचा.

एवढा का संताप ह्या आईला? का तिचा स्वभावच संतापी आहे? का डबा मूल्यवान होता? जुन्या काळी घेतलेला, स्टेनलेसचा, जड? धपाटे घालून मूल रडून झोपलं तरी नंतर तरी वाईट वाटलं असेल ना? स्टीलच्या डब्याऐवजी प्लास्टिकचा घ्यायचा हा निर्णय तिनं घेऊन टाकला; पण मुलाला त्यातून काहीच शिकवलं नाही. उलट मारून त्याला दूरच लोटलं.

आई क्र. १२–

◦ असा बावळेपणा का करतोस?

◦ घरी यायच्या वेळी आपल्या आपण सर्व गोष्टी घेतल्या की नाही लक्षात नको ठेवायला?

◦ शाळेत विसरलास का रिक्षात?

◦ काहीच आठवत नाही?

◦ उद्या सकाळी रिक्षावाल्याला मीच विचारते.

◦ शाळेत हरवलेल्या वस्तूंच्या कपाटात बघ. वर्गात बघ.

◦ सांग पाहू उद्यापासून जेवण कशात देऊ?

ही आईसुद्धा मुलावर प्रथम बावळेपणाचा शिक्का मारते. मुलाला काहीच आठवत नाही तेव्हा आता उद्या रिक्षावाल्याला मीच विचारते हे तिचं वाक्य अनेक गोष्टी सांगते. एक तर लहान मुलाकडे मोठी माणसं लक्ष देत नाहीत. त्यामुळं मुलांनी विचारलं तर दाद लागणार नाही. रिक्षावाला नीट उत्तर देणार नाही ही जाणीव. याशिवाय आपणच प्रश्न सोडवायला सरसावण्याचा भागही आहेच. शाळेत बघ, वर्गात बघ असं ती सांगते; पण मूल ते ऐकेलच याची शाश्वती नाही. खूपदा मुलं असं विचारायला घाबरतात. टाळाटाळ करतात. खोटंच विचारलं म्हणून सांगतात. कारण ती कामगिरी त्यांच्यावर लादलेली असते.

आई क्र. १३ न तिला आलेला अनुभव सांगितला आणि यावर मूल काय म्हणाल ते सांगितलं–

◦ आई, मला डबाच देत जाऊ नको सगळी मुलं पटपट खाऊन खेळतात. मला वेळ लागतो खायला. मग माझं लक्ष लागत नाही डबा खाण्यात.

ह्या आईला हा लागलेला शोध महत्त्वाचा आहे. मुलगा तिच्याशी मोकळं बोलू शकतो म्हणून हे कळलं तरी. आपल्या एरवीच्या मोठ्या माणसाच्या विचारात मुलाची ही बाजू येत नाही.

आपण इतक्या प्रतिक्रिया पाहिल्या. आपण यात कुठे तरी बसतोय ना? कधी थोडे यात, थोडे त्यात तरी बसतोच.

डबा हरवला या घटनेत आपली भूमिका कोणती? कशामुळे वस्तू हरवतात, आपण कसे विसरतो याची मुलाला जाज देणं आपलं काम आहे. आपणही कशा वस्तू हरवतो ते सांगावं. कशा शोधतो, शोधताना काय विचार करतो तेही सांगाव. वस्तू हरवू नयेत. म्हणून काळजी घ्यायला शिकवावं. काही माणस वस्तू विसरू नयेत म्हणून कशी गमतीशीर प्रयोग करतात ते सांगावं– एका गृहस्थाना रोज ऑफिसमध्ये जाताना पास, पाकीट, किल्ल्या, पेन, रुमाल न्यावं लागायचं. गडबडीत काही तरी रोज विसरायचंच मग 'पापा की पेरू' असं त्यानी सूत्र बनवलं आणि ते जाता–येता तपासून पहायची लावून घेतली स्वतःला. मग सोपं गेलं. मोठेपणी आपल्यालासुद्धा वस्तू नेमक्या जागी व्यवस्थित ठेवायची शिस्त नसल्यानं किती वस्तू हरवतात, मग केव्हा तरी सापडतात किंवा सापडत नाहीत.

वस्तू विसरण्या–हरवण्यामागचं तर्कशास्त्र त्या हरवू नयेत म्हणून जरूर असणारी सवय

शिस्त हे खरे या घटनेतले महत्त्वाचे मुद्दे आहेत. ते न बोलता आपण किती निरर्थक बोलतो काय, रागावतो काय, मारतो काय, मुलाला दोष काय देतो, आपली भीतीच त्या निमित्ताने व्यक्त करतो. आपण जे बोलतो त्यामागे आपल्या मनात कोणते विचार उभे असतात याचा शोध घ्यायला हवा. म्हणजे लहान मुलानं डबा हरवला ही घटना स्वच्छ नजरेनं आपण बघू शकू आणि त्याबद्दल स्वच्छपणे बोलू शकू. एवढ्याशा गोष्टीने मुलाला अगदी अपराधी बनवून, खटला चालवून, दोषी ठरवून शिक्षा द्यायचीही गरज नाही आणि डबा हरवणं म्हणजे काय ४–५ रुपयांचा डबा नवीन आणणं, इतक क्षुल्लकपणेही त्याकडे पाहता कामा नये. ही एक साधी घटना. मुलानं त्यातून काही शिकावं–कायमचं शिकावं म्हणून घडलीय. त्याचा उपयोग आपण करून घ्यायचाय त्या निमित्तानं मुलाच्या अधिक जवळ जायचंय. त्याला नवीन विश्वास द्यायचाय. झालेल्या नुकसानीची जाणीवही त्याला आपोआप होईल असं बोलायचंय; पण ते ४–५ रु. महत्त्वाचे नाहीत, तुझं शिकणं, तुझं मोठं होणं महत्त्वाचं आहे. हा आपला त्याच्यातला रसही त्याच्यापर्यंत पोचवाचाय. रागावत सुटायचं नाहीय.

शोनील आमचा मुलगा एकदा कालच घेतलेलं १२ रु. चं पायलटपेन शाळेत हरवून आला. आला तोच अगदी रडवेला होऊन. पेन हरवल असं सांगताना डोळ्यात पाणी आलं. त्याला म्हटलं, 'हे बघ, फार काही गंभीर झालेलं नाही. तू एवढं वाईट वाटून घेऊ नको बाबा. होतं अरे असं. तू आधी शांत हो बरं.' जरा आवंढा गिळून डोळ्यातल पाणी मागे परतवून तो बोलायला लागला. त्यातून कळल ते असं की, कालच घेतलेलं पेन असं लगेच हरवाव याचं त्याला फारच वाईट वाटत होतं. त्याला मी म्हटलं एकदा पाच वर्षं वापरलेल माझं पेन हरवलं त्याचं तर मला इतकं वाईट वाटलं होतं. खूप सवय होते ना वस्तूची मग किती तरी दिवस त्याची आठवण येते. तेव्हा तसही वाईट वाटतच. काय झालं असावं. त्याला विचारलं तर, त्याने अनेक शक्यता सांगितल्या. शाळेत वर्गात पडलं असेल, कदाचित नकळत कुणी काढून घेतलं असेल, कदाचित येताना वाटेत पडलं असेल. मग काय करावं असं तुला वाटतंय, विचारलं तर म्हणाला तू येतेस का माझ्याबरोबर ? आपण रस्त्यानं बघून येऊ. मला तेव्हा वेळ होता. म्हटलं चल. लगेच बघून येऊ. बघून आलो. पेन मिळालं. नाही; पण तोवर ताण खूपच कमी झाला होता. आता काय करायचं ? मग म्हणाला, माझ्या शेजारी बसणाऱ्या मित्राला विचारून येतो. त्याला म्हटलं चुकून त्याच्या दप्तरात गेलं असेल असच वाटतंय ना तुला ? तो चोरणार नाही याची खात्री होती. मग तो विचारून आला. पेन मिळाल नाही. आता काय करू या ? मी उद्या शाळेत वर्ग झाडणाऱ्या शिपायाला विचारतो, नाही तर सराना विचारतो. हे निर्णय त्याचे त्यानं घेतले. अमलात आणले. पेन मिळालं नाही. मग त्याला म्हटलं, आता त्या पेनचा नाद सोडून देऊ या. तसंच दुसरं पेन आज आणू या म्हणजे तुला बरं वाटेल. हे दुसरं पेन त्यानं जपून जपून दोन वर्षं वापरलं. नंतर या घटनेविषयी गप्पा मारता मारता शोनीलचे वडील त्याला म्हणत होते, 'पेन हरवणं म्हणजे आपल्या कुटुंबाचं, आपल्या सर्वांचं आर्थिक नुकसान आहे नाही का ? ते आपण सगळ्यांनीच आपापल्या परीनी टाळायला हवं. तसं काय रे माझ्या धंद्यात मला कुणी गिऱ्हाईक एकदम ४–५ हजाराना गंडा घालू शकतच की; पण मी मोठा आहे. मला ओरडणारं कुणी नाही म्हणून हे चालतं. मग तसच नुकसान लहान मुलाच्या हातून झालं तर त्याला आम्ही कसे रागवू ? आपण काळजी घ्यायला हवी हे यातून शिकायचं.'

शोनीलची उरलीसुरली बोचही जावी म्हणून मी त्याला एक गमत सांगितली होती—

लहानपणी माझी एक मैत्रीण होती. तिची आई तिला सतत रागवायची. पुढे पुढे तिला या रागवण्याची गंमतच वाटायला लागली. तिने एकदा शाळेतून येताना डबा तळ्यात फेकून दिला आणि मला म्हणाली, चल आता आमच्या घरी. आमची आई कशी ओरडते बघ आणि आम्ही दोघींनी तिच्या घरी जाऊन चेहरे पाडून, माना खाली घालून मनात हसत आईचं ते नाटक पाहिलं होतं.

हे ऐकून शोनील म्हणाला—'शोभा, माझं पेन मात्र खरंच हरवल बर का ? मी काही फेकून वगैरे दिलेलं नाही!' □

---

## एक दिशाहीन वाचक चळवळ

पृष्ठ ११ वरून

फक्त दोनच पुस्तके बेस्टसेलर म्हणून गवसली. कूएचे 'सजेशन व ऑटो सजेशन' व दुसरे 'कोनटिकी'. हे ग्रंथ फक्त ते प्रचंड प्रमाणात विकू शकले. इंग्लंड–अमेरिकेतील 'पब्लिकेशन विकली' मध्ये प्रकाशनव्यवसायावर, पुस्तकविक्रीवर नेहमी अभ्यासपूर्ण लेख येतात, त्याची भाषांतरे निदान 'रुची'मध्ये का येऊ नयेत ? 'ललित' व 'साहित्यसूची' ही धंदेवाईक मासिके आहेत. 'रुची' तर अभिनव वाचक चळवळीला वाहिलेले मासिक आहे ना ?

वाचकांचे पुस्तकांसबंधी कुतूहल कसे वाढेल यावर आणखी अनेक अंगानी विचार करता येण्याजोगा आहे; पण या कार्यकर्त्यांना माझ्या मते बालिश व आचरट स्टंट करून नुसते मिरवून घ्यायचे आहे. त्यांना ना पुस्तकाबद्दल प्रेम आहे ना वाचकांच्या अभिरुचीबद्दल आस्था आहे. स्वतःला जास्तीत जास्त चांगल्या रीतीने मिरवून, चमकवून कसे घेता येईल एवढाच क्षुद्र हेतू बाळगून ते चळवळ राबवत आहेत !

कोणतीही चळवळ ही विस्तृत पायावर उभी करावी लागते. तिला शास्त्रीय विचाराची बैठक असावी लागते. जास्तीत जास्त तरुण तिच्याकडे आकृष्ट कसे होतील हे पाहावे लागते. सर्वात महत्त्वाचे, स्पष्ट असे ध्येय समोर ठेवावे लागते. ध्येयाशिवाय कोणी तरुण या चळवळीकडे ओढला जात नाही. माझ्या मते हा एक उद्रेक आहे. ही एक चूस आहे.

विशाल महिला मंडळाच्या महिलानी महिन्यातून एकदा झोपडपट्टीत जाऊन मुलाचे दात स्वच्छ राखण्यासाठी टूथपेस्ट नियमाने वापरावी असे सांगितले म्हणजे आपण फार मोठे समाजप्रबोधन केले असे त्यांना समाधान वाटते, त्याचप्रमाणे पुण्याच्या राजरस्त्यावरून, घोड्यावर स्वार सजवून, ढोललेझिमच्या नगाऱ्यात 'बोल वाचका हमला बोल' (कोणावर ? लेखकावर, प्रकाशकावर का पुस्तकावर... म्हणजे या तिघांपैकी एकाला वा सर्वांना चिरडून टाक की काय ?) अशी आचरट घोषणा दिली म्हणजे आपण पुस्तकाच्या जगात फार फार मोठी क्रांती केली असे त्यांना वाटते, त्यांच्याविषयी आपण जास्त काय बोलणार ?

आश्चर्य एवढेच वाटते की, अशा बालिश व आचरट चाळ्यांना महाराष्ट्रातील थोर थोर विद्वान, मोठ्या मोठ्या बुद्धिवंतानी पाठिंबा द्यावा, त्यांना डोक्यावर घेऊन नाचावे ! या बुद्धिमंतांनी आपली शास्त्रीय विचारसरणी खुटीवर टागून ठेवली आहे की काय ? का याना साधा विचार करण्याची कुवत राहिलेली नाही ? □

## 'डॉन जुआन इन हेल' श्राव्य नाट्याचा वस्तुपाठ

वि. भा. देशपांडे

काही दिवसांपूर्वी पुण्यात एका इंग्रजी नाटकाचा प्रयोग अदिती आणि थिएटर युनिट यांच्या सहयोगाने पेश झाला. नाटकाचं नाव होतं 'डॉन जुआन इन हेल'. तसं हे नाटक पूर्ण स्वरूपाचं किंवा स्वतंत्र असं नाही. तर हे नाटक म्हणजे बर्नार्ड शॉच्या 'मॅन अँड सुपरमॅन' नाटकाचा एक भाग आहे. नेमकं सांगायचं तर मूळ नाटकाचा तिसरा अंक नाट्यरूपात पेश झाला.

डॉन जुआन (या जुआनचा उच्चार वॉन असाही आहे. काहींना आठवत असेल तर तुझे आहे तुजपाशी नाटकातील विशाल महिला मंडळाच्या प्रवेशात एका विशाल महिलेच्या तोंडी डॉन वॉन असा उल्लेख काकाजींच्या संदर्भात आहे; पण सत्यदेव दुबे मात्र जुआन असा उच्चार आणि लेखन वापरतात.) हा स्पॅनिश वाङ्मयात दोन शतकांपूर्वी आलेला आहे. अनेक स्त्रियांचा छंदी असलेला किंवा स्त्रीलंपट अशी त्याची प्रतिमा त्या वाङ्मयात अभिप्रेत आहे. नाटककार बर्नार्ड शॉ मात्र या पद्धतीनं डॉनचा उपयोग आपल्या नाटकात करीत नाही. हा डॉन एका द्वंद्वयुद्धात पराभूत होऊन नरकात आलेला आहे. त्याच नरकवासात किंवा वास्तूत हे नाटक घडतं. डॉनची एके काळची प्रेयसी अॅना ही देखील तिथंच आली आहे. या अॅनाचा बाप कमांडर स्वर्गातून पुतळा होऊन आलेला आहे. यानंच डॉनला युद्धात मारलं आहे. या तिघांच्या जोडीला एक सैतान तिथं उपस्थित होतो. ह्या चौघांच्या चर्चेचं, संवादांचं जे रूप ते म्हणजेच हा नाट्यांक !

बर्नार्ड शॉची नाटकं म्हटल्यावर घटितांपेक्षा चर्चा, चिकित्सा, संवाद हेच अधिक. किंबहुना तोच त्या नाट्यरचनेचा पायाभूत भाग. ह्या चौघांच्या चर्चेत लग्नसंस्थेचा उपयोग किंवा प्रयोजन हे सूत्र जरी आरंभीला असलं तरी तेवढं आणि तितकंच नाही. खरं तर ही चर्चा स्वर्ग—मृत्युलोक आणि नरकवास ह्या तिन्ही 'लोकांना' जोडणारी आहे. त्यांच्या अस्तित्वाची, उपयोगाची चर्चा आहे; पण ती तेवढ्यावरही थांबणारी नाही. एकूणच मानवी जीवन ढवळून काढणारी आहे. त्याच वेळी मानवी जीवनाच्या शक्तीची (लाइफ फोर्स) चर्चा खोलवर नेणारी आणि आपल्याला अनेक प्रश्नांमध्ये गुंता करून टाकणारी आहे. स्वर्ग-पृथ्वी-नरक यांची चर्चा करता करता माणूसच आपल्या नाशाला कारणी कसा होतो आणि अखेरीस नरक हीच जागा कशी चांगली या निर्णयाप्रत हे सारं येते. तरीही त्यातला गुंता कमी होत नाही.

असं अनेक विषयांना, त्यातल्या प्रश्नांना सामोरं जाणारं नाटक प्रयोगरूपानं रंगभूमीवर आणणं हे एक आव्हानच होतं. ते आव्हान सर्व कलावंतांनी मोठ्या ताकदीनं पेललं यात शंका नाही. यामध्ये सत्यदेव दुबे, रत्ना शहा (पूर्वीची रत्ना पाठक) आकाश खुराणा आणि नसिरुद्दीन शहा हे कलाकार होते. डॉनच्या भूमिकेत नसीर होता, रत्ना शहा ही अॅना होती, अॅनाचे वडील आकाश खुराणा होता आणि सैतानच्या भूमिकेत सत्यदेव दुबे होता. शब्दसंवाद हे ज्या नाटकाचं प्राणभूत तत्त्व आहे किंबहुना तीच त्याची ताकद आहे, असं नाटक पेश करताना अनेक अवधानं सांभाळावी लागतात. मुख्यत: नाटककाराचा शब्द नेमक्या अर्थानं, योग्य त्या वजनानं पोहोचवणं ही फार मोठी जबाबदारी असते. ती काळजी दिग्दर्शक म्हणून दुबेनं चोखपणानं घेतलेली होती. विशेषत: नसीरचा आवाज आणि संवादफेकीची पद्धती प्रभावी वाटली. त्याच्या आवाजाला रुंदी आणि खोली किंवा वजन आहे. ते वजन व्यक्त करताना तो फार मोठे प्रयत्न करतो आहे असं जाणवत नव्हतं. अगदी सहजपणानं त्यानं ते केलं. त्याच्या तुलनेत रत्नाचा आवाज आणि शब्दफेक मर्यादित वाटली. दुबे आणि खुराणा यांनी आपल्या भूमिकेचा तोल शब्दांच्या साह्यानं सुंदर रीतीनं राखला. पावणेदोन तास सतत शब्दांच्या साह्यानं विचारखाद्य पुरवीत प्रेक्षकांना खिळवून ठेवायचं ही सामान्य गोष्ट नाही !

मुळात शॉच्या नाटकाचा काही भाग रंगमंचावर आणणं हेच दुर्मिळ आहे. तेही हिंदी—मराठी नाटकं करणाऱ्या सत्यदेव दुबेनं आणणं यालाही वेगळा अर्थ आहे. प्रेक्षकांच्या दृष्टीनं दुर्मिळ योग ही एक गोष्ट झाली; पण त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे आजकाल रंगभूमीवरून जो शब्द प्रेक्षकांपर्यंत येतो (त्यातल्या काहींचा अपवाद वगळला तर) त्या संदर्भात अतिशय चिंताजनक परिस्थिती आहे. विशेषत: तरुण-पिढीतील जे कलाकार आहेत त्यांना शब्दोच्चार, आवाजाचा वापर आणि एकूणच नाटककाराचा शब्द प्रेक्षकांपर्यंतची प्रक्रिया याबद्दल आवर्जून सांगण्याची गरज निर्माण झाली आहे. अशासाठी दुबेनं केलेले नाट्यप्रयोग हा एक वस्तुपाठ आहे. नाटकात दृश्य जसं महत्त्वाचं तसंच श्राव्यही महत्त्वाचं. एक प्रयोग म्हणून श्राव्यनाट्य रंगमंचावर उत्तम कसं होऊ शकतं त्याचा प्रत्यय या निमित्तानं आला. आलेल्या प्रेक्षकाला आपण बर्नार्ड शॉचं नाटक पाहायला आलो आहोत याची कल्पना होतीच. त्यामुळेच तो प्रेक्षक जर काही प्रमाणात कंटाळला असेल तर शॉच्या नाट्यलेखनाचं चांगभलं झालं असं म्हणता येईल. आलेला कंटाळा अभिनेत्यांच्या उणीवांतून आलेला नव्हता. त्यातला काही प्रेक्षक नसीरला खुद्द रंगभूमीवर पाहण्यासाठी आलेला असणार; पण जे त्याच्या चित्रपटांच्या भूमिकेच्या संदर्भात पाहण्यास आले असतील त्यांची निराशा झाली असणार !

असा दुर्मिळ प्रयोग केल्याबद्दल दुबेला धन्यवाद द्यायला पाहिजेत. कारण दुबेशिवाय हे दुसरं कोण करणार ? □

### अरुण सरनाईकला भावांजली

अरूण सरनाईक ज्या दिवशी अपघातात निधन पावला त्याच दिवशी रात्री दूरदर्शनवर त्याला भावांजली वाहण्यात आली. अलीकडच्या काळात दूरदर्शन या माध्यमामुळं ही एक उत्तम सोय उपलब्ध झालेली आहे; पण ती सोय वापरता येणं हाही महत्त्वाचा भाग आहे. अरुण गेल्यावर तातडीनं ही भावांजली दाखवली हे चांगलंच झालं. त्यासाठी कलाक्षेत्रातली मातबर माणसं बोलावली होती. मोहन तोंडवळकर एक आठवण सांगताना थोडासा हसला. त्याला ते सांगताना काही गोष्टी डोळ्यांसमोर आल्या असाव्यात. असा एकदोघांचा बोलण्याचा भाग सोडला तर अरविंद देशपांडे, मधुकर तोरडमल, अमोल पालेकर, जयश्रीबाई यांनी आवश्यक ते गांभीर्य राखून पुष्कळ गोष्टी सांगितल्या. कमलाकर सारंगनं संयोजनही व्यवस्थित केलं. त्यानंतर वाटलं होतं की, चार–दोन दिवसांत चेहरे-मुखवटेमधली अरुणची मुलाखत दाखवतील; पण तसं घडल नाही. अजूनही वेळ गेली नाही !

अरुण गेल्यावर दहा दिवसांनी म्हणजे ३० जूनला पुण्यात चित्रपटमहामंडळ आणि नाट्यपरिषद पुणे शाखा, तसेच रसिक यांच्या वतीनं भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली गेली. यामध्ये विश्वास सरपोतदार, चित्तरंजन कोल्हटकर, राम कदम, शंकर पाटील, राम देवताळे, अण्णासाहेब देऊळगावकर, बेबी शकुंतला, शरद तळवलकर, वसंत शिंदे, आमदार लेले आदी मंडळी बोलली. सर्वांनी वेळेचं आणि विषयाचं भान व्यवस्थित राखलं. टिळक स्मारक मंदिरात झालेल्या या शोकसभेला इतकी प्रचंड गर्दी होती की, त्यावरून लक्षात आलं की, अरुण सरनाईकची लोकप्रियता किती होती. तसंच त्याला आलेल्या अपघाती मृत्यूनं हळहळणारा जनसमूह किती बहुसंख्य आहे !

चित्रपट

# सारांश - सर्वांगीण, सर्वोत्तम



जीवनाचा अर्थ काय ? उद्देशहीन जीवन जगणं चांगलं की, जगायला काही उद्देश हवाच ? उद्देश सहज सापडला नाही तर मुद्दाम शोधावा लागतो का ? काही ध्येय असलं की, जगणं ' जीवन ' राहतं ?

का एखाद्या शक्तीवर, विश्वासावर विश्वास असणं, यामुळे आयुष्यातला रुक्षपणा, कडवटपणा टाळता येतो ? हातापायांतलं त्राण संपतं आणि म्हातारपणाची काठीही गेली की, मग जीवन नीरस का वाटू लागतं ?

तरुणपणी असले प्रश्न माणसाला सतावत नाहीत. जगण्याचा उद्देश शोधणं हाच कदाचित एक मोठा उद्देश होऊन जातो; पण म्हातारपणी ज्या वेळेस इतकी मजल गाठली बुवा. आता मिळवायचं काही राहिलं नाही; असं म्हणेस्तोवर परत दमछाक करत पै–पै मिळवायची वेळ येते.

त्या वेळेस पैशाची किंमत नसते तर जीवनाचा अर्थ काय हेच इतके पावसाळे पाहिल्यानंतर, टक्केटोणपे खाऊन केस पांढरे झाल्यावर शोधायची वेळ येते.

नेमकं हेच दुःख ' सारांश ' मधल्या प्रधान जोडप्याचं आहे. ध्येयवादी हेडमास्तरचं आयुष्य सुखाचं गेलेलं. बायको समान विचाराची अजिबात नसली तरी एकंदर आयुष्य समाधानी. त्यात मुलगा उच्चशिक्षणाला अमेरिकेत गेलेला. सर्व सुरळीत चाललेलं; पण अचानक काही वैर नसतानाही, न्यूयॉर्कमध्ये त्यांच्या मुलाचा खून होतो आणि प्रधान दांपत्यांचं आयुष्यच बदलतं !

आमच्याच बाबतीत हे असं का व्हावं आणि आम्ही कुणाचं वाईट केलेलं नसताना आमचं वाईट का व्हावं, या विचारानं माणसाला जो एक कडवटपणा येतो, तो प्रधानांना आलेला. मी माझ्या मुलाला वाचवू शकलो नाही ही एक दोषीपणाची, अपराधीपणाची भावना. हा माणूस विलक्षण भावनाप्रधान; पण तितकाच तार्किक. जे नाहीच त्यावर विश्वास ठेवणं त्याला जमत नाही.

तर पार्वती प्रधान ही साधी मध्यमवर्गीय गृहिणी. मुलाच्या अकाली मृत्यूनंतर ती स्वामी, देव–देव यांच्यात मन रमवू पाहते. आज ना उद्या माझा अजय मला या ना त्या रूपात परत भेटेल, असा तिला दृढ विश्वास. त्या जोरावर तिनं आपलं दुःख सहज गिळलेलं असतं.

पण प्रधानांच्या जीवनाचा पायाच नष्ट झालाय. नुसता वरचा डोलारा पायाबिगर कधी राहू शकेल का ? ज्या आयुष्याला हेतू नाही असं आयुष्य ते संपवायला निघतात; पण मुलगा असतानाही त्यांच्या आयुष्याचा हेतू काय होता ? मुलाची प्रगती पाहणं? पण मुलगा साता समुद्रांपलीकडे ! तो

आहे ही जाणीवच सुखास्पद! तो गेल्यावर 'आपलं' असं काही उरत नाही. कारण प्रधानांचा असा स्पष्ट विचार दाखवलेला नसला तरी बघताना असं जाणवतं की, हा मुलगा त्यांचा 'इगो' आहे. नाही म्हटलं तरी ते त्यानीच घडवलेलं शिल्प आणि ते तर हाडाचे मास्तर आपण घडवलेलं आपल्या शरिराबाहेरचं एक जीवन कसं फुलतंय हे बघणं हाच त्यांच्या जीवनाचा एकमेव हेतू असणं अगदी साहजिक आहे; पण अजयचा मृत्यू त्यांचं जीवन निरर्थक करून टाकतो हे तितकच खरं.

सुजाताच्या रूपानं पार्वती आणि प्रधान दोघानाही हा 'हेतू' सापडतो. कुमारी-माता होत असलेल्या सुजाताचा मुलगा म्हणजे अजयच पुनर्जन्म घेत असणार' अशी पार्वतीची श्रद्धा आणि जो समाजकंटक सुजातावर अशी वेळ आणतोय त्याच्यावर मात करून सुजाताला संरक्षण द्यायचं हा प्रधानचा निश्चय.

वाटेल तो त्रास सहन करूनही प्रधान एक साधो पेइंगगेस्ट म्हणून आपल्याकडे आलेल्या सुजाताला संरक्षण देतो ती खरं तर हताश झालेली. एवढा मानसिक आणि शारीरिक त्रास सहन करून शेवटी बापाचं नाव न लावता येणाऱ्या मुलाला वाढवण्याची तिच्यात उमेद नाही. अधूनमधून ती डगमगते; पण तिचं डगमडणं यांना सहन होणारं नसतं. तिच्या रूपानं त्यांचं जीवनध्येय उभं असतं.

हरएक अडचण दूर होते. सुजाताचा प्रियकरही तिचा स्वीकार करतो; पण आयुष्य इतकं सोपं कधीच नसतं. प्रधानाना हे जाणवत नसत. सुजातावरचं सकट दूर झाल्यावर प्रधानांचं उद्दिष्ट सफल होतं; पण त्यामुळं त्यांना जगण्याची उमेद मिळालेली असते.

पार्वतीची समस्या गंभीर असते. तिला प्रधानांसारखा सुजातात, 'सुजाता म्हणून एक' स्वतत्र व्यक्ति म्हणून काडीइतकाही रस नाही. सुजाताऐवजी कुणी सलमा, रोझी असती तरी फरक पडला असता की नाही सांगता येत नाही. शिवाय प्रधानांचं काम काही काळाचंच आहे; पण पार्वतीचा, सुजाताच्या पोटी वाढणारा अजय म्हणजे एक उभं आयुष्य आहे. सुजाताचं मूल (मुलगा होईलच याची खात्री नाहीच; पण झालाच तर) पार्वतीच्या हातात एकदा लागलं तर सुजाता आणि पार्वती दोघीच्याही आयुष्यात फक्त दुःखच निर्माण होईल हे फक्त प्रधानच जाणतात.

ते तस स्पष्ट बोलून दाखवू शकत नाहीत; पण आपल्याला ते समजत तसच सुजाताच्या प्रियकरालाही समजतं. ते याच्या आयुष्यातून दूर व्हायचं कबूल करतात आणि इथंच खरं प्रधानाच व्यक्तिमत्त्व, त्याची तर्कसुसंगत विचारपद्धती या सर्वांचं आपल्याला दर्शन घडतं. जो मेला, तो मेला, जो जन्माला येणार तो सुजाताचाच आहे हे पार्वतीला पटवून द्यायचा हा एकमेव उपाय असतो. अंधश्रद्धावर हमले वाढणं शेवटी पार्वतीलाच त्रासदायक होईल हे जाणवून प्रधान तिला वेळीच सावध करतात.

## सहजसुंदर कलाकृती

आयुष्य अखंड आहे, चैतन्य अशाश्वत आहे. कुणा एकाच्या मरणान हा ओघ थांबणार नाहीये हे कळणं हाच खरा जीवनाचा 'सारांश.'

महेश भट्टलिखित, दिग्दर्शित हा चित्रपट उत्कृष्ट आहे असं याच वर्णन करायला हवं. विषय वेगळा अशा अर्थानं की चित्रपटाच्या चाकोरी बाहेरचा; पण विषय जवळचा अशा अर्थानं की प्रत्येकाला आपल्या वार्धक्यात अशा तऱ्हेचा अनुभव कुठं ना कुठं येतच असतो.

'चित्रपट' या दृष्टीनं उत्कृष्ट. कारण सर्वोत्तम अभिनय. अनुपम खेर, रोहिणी हट्टंगडी, सोनी रझदान प्रमुख आणि मदन जैन, सुहास भालेकर, निळू फुले इतर भूमिकात दिसतात. अनुपम खेर, रोहिणी हट्टंगडी यानी प्रधान दांपत्य उभं केलंय. रोहिणी तर राजमान्यता मिळालेली कलाकार, तिचं कौतुक आहेच; पण विशेष कौतुक करायचं ते अनुपम खेर या नव्या कलावंताचं!

साठीपलीकडचा हा निवृत्त मुख्याध्यापक त्यान फार छान उभा केला आहे. ताठपणा दर्शवणारी पण वयामुळे किंचित वाकलेली त्याची चाल, बुद्धिमत्ता दर्शवणारे डोळे आणि बोलण्यातला आत्मविश्वास त्यानं सुदर रीतीनं प्रकट केला आहे.

मुलाच्या अस्थी देण्यात कस्टम खात्यानं दिरगाई केली म्हणून पोटतिडकीनं कस्टम अधिकाऱ्याला बोलणारा एक बाप आणि त्याच पोटतिडकीनं सुजाताला समाजकटक त्रास देतात तर तुम्ही काय करता असं स्वतःच्या सत्ताधारी विद्यार्थ्याला सुनावणारा एक माणूस त्यानं प्रभावीपणे उभा केला आहे.

मुख्य जाणवत ते की हे यांच्या अभिनयामागचे कष्ट कुठे जाणवत नाहीत अवघड कलाकृती तेव्हाच यशस्वी ठरते जेव्हा ती बघितल्यावर त्यातल सौंदर्यच जाणवत; पण त्यामागचे कलाकाराचे कष्ट तिळमात्रही जाणवत नाहीत सहजप्रवृत्तीतूनच निर्माण झाली अस भासवणारी कलाकृतीच खरी सुंदर कलाकृती.

सोनी रझदान (सुजाताच्या भूमिकेत) आणि मदन जैन (सुजाताचा प्रियकर) यांनीही आपली कामं चागली केली आहेत. सोनी रझदान दिसायला चागली नाही; पण तिला अभिनयाची समज आहे.

रोहिणी हट्टंगडी साधीभोळी मध्यमवर्गीय गृहिणी आपल्या मनाला भावते. जवळून गाय गेल्यावर लगेच तिला हात लावून तो हात कपाळाकडे नेणारी, माझा अजयच तिच्या पोटी जन्माला येणार आहे असं लहान मुलाच्या निर्व्याज आनंदान सागणारी ही पार्वती तिनं छान साकार केली आहे.

राहिलं दिग्दर्शन— अर्थं नतर या दिग्दर्शकात आणखी प्रगती झाली आहे असं वाटण्यासारखं या चित्रपटाचं दिग्दर्शन आहे. महेश भट्टन अगदी बारीक-सारीक बारकावे लक्षात घेऊन कुठलीही तडजोड न करता चित्र निर्माण केलंय. सुजाताच्या भविष्यात काय वाढून ठेवलंय या चिंतेत प्रधानदांपत्य आणि सुजाता असताना एक पांढरंशुभ्र गुबगुबीत कबुतर निर्धास्तपणे घरात शिरून बसलेलं असत— इथं महेश भट्टमधला दिग्दर्शक जाणवतो.

चित्रपटातली मला अनावश्यक वाटलेली गोष्ट म्हणजे पार्श्वभूमीचं गाणं. गाण्याच्या वेळेस इतर दृश्य असल्यानं गाण्याकडे आपलं विशेष लक्ष जात नाही आणि गाणंही विशेष चागलं किंवा सुरेल नाही आहे. गाण्याचा अर्थ 'जिंदगी 'शी निगडित असला तरी गाण्यातून तो अर्थ समजावून घेण्यापेक्षा प्रत्यक्ष प्रसंगातून तो समजावून घेणं आपल्याला जास्त आवडतं.

नव्या कलाकारांना घेऊन चित्रपट काढण्याची परंपरा 'राजश्री'नं इथंही कायम ठेवली आहे; पण 'गीत गाता चल' 'मनोकामना' इ. चित्रपटापेक्षा अगदी वेगळा आणि उत्कृष्ट चित्रपट काढल्याबद्दल 'राजश्री'चंही अभिनंदन!

—उज्ज्वला लेले

तरी, तो आपल्या हातातील मद्याचा पेला दूर ठेवील.

सारांश, विक्रमने वापरलेली पद्धत तुम्हाला तुमच्या अनेक तऱ्हेच्या अनिष्ट सवयींचा बीमोड करण्यासाठी उपयोगात आणता येईल. अर्थात हे काम काही अगदी सोपे नाही. धूम्रपान केल्यामुळे, सतत गोड पदार्थांचे सेवन केल्यामुळे, मद्यपानाच्या अतिरेकामुळे किंवा इतर कोणत्याही अनिष्ट सवयींमुळे नेमके कोणते दुष्परिणाम होतात, याची प्रथम अत्यंत सखोल माहिती मिळवून, नंतर त्या माहितीबरहुकूम कल्पनेच्या कुंचल्याने आपल्या मन:पटलावर सुस्पष्ट प्रतिमा रेखाटून, एखाद्या गोष्टीबद्दल आपल्या मनात तीव्र तिटकारा निर्माण करण्यासाठी तुम्हाला बरीच मेहनत घ्यावी लागेल.

विक्रमच्या प्रगतीचा मी सादर केलेला आढावा अतिशय त्रोटक व अपुरा आहे. तो आढावा देण्याचा मूळ उद्देश असा आहे की, विक्रमने वापरलेल्या पद्धतीचे स्वरूप स्पष्ट व्हावे. प्रत्यक्षात त्याने जी पूर्वतयारी केली होती ती प्रशंसनीय होती. त्याच्या पूर्वतयारीचे स्वरूप समजण्यासाठी एकच उदाहरण दिले तरी पुरे होईल. धूम्रपानामुळे फुप्फुसांना नेमका कोणता अपाय होतो, याचे हुबेहुब चित्र आपल्या मन:पटलावर रेखाटण्यासाठी त्याने आपल्या डॉक्टरांच्या मदतीने अखंड धूम्रपान करणाऱ्या एका माणसाच्या जराजर्जर झालेल्या फुप्फुसांच्या एक्सरेचे सूक्ष्म निरीक्षण केले होते आणि नंतर आपण धूम्रपान करीत राहिलो तर आपलीही फुप्फुसे कशी रोगट होत जातील, याचे चित्र त्याने आपल्या मन:पटलावर रेखाटले होते.

अशा अनेक बारीक–सारीक तपशिलांची जमवाजमव केल्यानंतरच, विक्रमने धूम्रपान केल्यामुळे आपल्या प्रकृतीवर होऊ शकणारे अनिष्ट परिणाम आपल्या मन:पटलावर चित्ररूपाने उभे करण्याच्या कामास सुरुवात केली होती. त्यामुळेच काही दिवसांनी त्याला सिगारेटविषयी तिटकारा वाटू लागला व अखेर त्याने सिगरेट ओढणे बंद केले !

विक्रमच्या उदाहरणावरून धूम्रपानाची, खादाडीची किंवा मद्यपानाची सवय सोडून देण्यासाठी मन:चक्षूचे सामर्थ्य कसे वापरावे हे सहज समजण्यासारखे आहे; परंतु माणूस ज्या अनेक अनिष्ट सवयींचा गुलाम बनू शकतो, त्या सर्वच सवयी म्हणजे काही कोणती व्यसने नसतात.

## गिरीश आणि श्रीधर

उदाहरणार्थ गिरीशची सवय पाहा. तो एका कचेरीत कारकून आहे आणि त्याला कोणत्याही बेरजा व वजाबाक्या विनाकारण परत परत करून पाहण्याची सवय होती. त्याच्या या सवयीमुळे अर्थातच त्याच्या कामाला वाजवीपेक्षा किती तरी अधिक वेळ लागत असे. उलट त्याचा मित्र श्रीधर. तो कचेरीतील कामात तरबेज होता; परंतु त्याला रोज सकाळी उशिरा उठण्याची सवय होती. त्यामुळे तो अनेकदा कामावर उशिरा जात असे आणि आपली कित्येक वैयक्तिक कामेही अकारण लांबणीवर टाकीत असे. गिरीश



आणि श्रीधर यांच्या सवयी अनिष्ट होत्या; पण त्या सवयी म्हणजे काही व्यसने नव्हेत. तरीसुद्धा मन:चक्षूच्या सामर्थ्याचा उपयोग करून, त्यांनी आपल्या अनिष्ट सवयींचा बीमोड कसा केला ते पहा.

गिरीश मला भेटावयास आला तेव्हा तो काहीसा अस्वस्थ होता. कोणत्याही बेरजा आणि वजाबाक्या करून झाल्यावर, त्या बरोबर आहेत की नाही, याची खात्री करून घेण्यासाठी त्या बेरजा आणि वजाबाक्या परत-परत करून पाहण्याची त्याची सवय त्याला फारच त्रासदायक वाटत होती. त्याचे म्हणणे असे होते की, एखादी बेरीज किंवा वजाबाकी एकदा करून झाल्यावर ती बरोबर आहे की नाही, हे तपासून पाहण्यासाठी तीच बेरीज किंवा वजाबाकी दुसऱ्यांदा करून पाहणे आवश्यक असते; परंतु दुसऱ्यांदा करून पाहिल्यावर जर ती बेरीज किंवा वजाबाकी बरोबर आहे असे दिसून आले, तर मात्र तीच बेरीज किंवा वजाबाकी परत परत करून पाहणे म्हणजे काळाचा अपव्यय करणे होय !

गिरीशने मला असेही सांगितले की, सर्व बेरजा व वजाबाक्या अकारण परत परत करून पाहण्याच्या त्याच्या सवयीमुळे त्याचे काम कचेरीतील इतर कारकुनांच्या मानाने फारच मंद गतीने चालत असे आणि त्याच्या कामाची ही मंद गती त्याच्या बढतीच्या आड येईल, असेही त्याला वाटत असे. या कारणांमुळे स्वत:च्या या अनिष्ट सवयीचा बीमोड करण्यासाठी तो प्रामाणिकपणे प्रयत्न करून पाहण्यास तयार होता. म्हणून मी त्याला मन:चक्षूचा उपयोग करण्याची खालील पद्धत शिकवली.

प्रथम मी गिरीशला डोळे मिटून शांतपणे खुर्चीत बसावयास सांगितले. तो खुर्चीत खरोखरच आरामशीरपणे बसला आहे असे

दिसून आल्यावर मी त्याला पुढील सूचना दिल्या—

'गिरीश, तू तुझ्या मन:पटलावर असे चित्र रगव की, तू तुझ्या कचेरीत बसला आहेस. तुझ्यापुढे कामाच्या वीस कागदाचा एक गठ्ठा आहे. त्यापैकी प्रत्येक कागदावर निदान तीस रकमा लिहिल्या आहेत आणि तुला त्या तीस रकमाची बेरीज करावयाची आहे.

तू पहिला कागद घेऊन स्वस्थ चित्ताने त्यावरील रकमांची बेरीज करावयास सुरुवात केली आहेस. बेरीज पूर्ण झाल्यावर ती बेरीज बरोबर आहे की नाही, याची खात्री करून घेण्यासाठी शांतपणे तू परत एकदा ती बेरीज करुन पाहिली आहेस.

आता तू त्या सर्व रक्कमांची बेरीज परत एकदा, म्हणजे तिसऱ्यांदा करून पाहण्यास सुरुवात केली आहेस; परतु बेरीज करावयास सुरुवात केल्याबरोबर तू अस्वस्थ व चितातुर झाला आहेस. थोडक्यात म्हणजे तुझी मानसिक शांती ढळली आहे व तू बिथरला आहेस. त्यामुळे तू तुझ्या हातातील कागद बाजूला ठेवला आहेस. त्या कागदावरील रकमांची बेरीज तिसऱ्यादा करून पाहण्याची गरज नाही, असे ठरवून तू तुझ्यासमोरील गठ्ठ्यातून दुसरा कागद उचलून, त्या कागदावरील रकमांची बेरीज करावयास सुरुवात केली आहेस. आता एकदम तुझी अस्वस्थता संपली आहे, तुझे मन शांत झाले आहे व तुझी चितातुरताही नाहीशी झाली आहे.

मी वरील सूचना देऊन, गिरीशला त्याच्या मन:पटलावर प्रतिमा रेखाटण्याची जी पद्धत शिकविली, त्यात तीन टप्पे आहेत. पहिल्या टप्प्यावर मी त्याला असे शिकविले की, तो त्याच्या हातातील कागदावरची बेरीज प्रथम करून पाहतो तेव्हा व ती बेरीज दुसऱ्यांदा तपासून पाहतो तेव्हा त्याचे मन शांत असते असे चित्र त्याने आपल्या मन:पटलावर रेखाटावे. याचा अर्थ असा की, मी त्याला त्याच्या बेरजा करण्याच्या सवयीपैकी जो भाग आवश्यक होता त्या भागाची सागड मानसिक शांततेशी घालावयास शिकविले.

आता मी त्याला शिकविलेल्या पद्धतीतील दुसऱ्या टप्प्याकडे वळू या. या टप्प्यावर मी त्याला तिसऱ्यांदा बेरीज करून पाहणे हा त्याच्या सवयीतील जो अनावश्यक भाग होता, त्याची सांगड त्याच्या मनातील अस्वस्थता व चितातुरता यांच्याशी घालण्यास शिकविले.

अखेर तिसऱ्या टप्प्यावर, मी गिरीशला असे शिकविले की, त्याने दुसऱ्यादा तपासून पाहिलेली बेरीज बरोबर आहे हे लक्षात आल्यावर, हातातील कागद बाजूला ठेवावा व त्याच्या समोरील गठ्ठ्यातून पुढचा कागद उचलून त्यावरील रकमांची बेरीज करण्यास सुरुवात करावी. या गोष्टीची सांगड मी त्याला मानसिक शांततेशी घालण्यास शिकविले.

स्वत:च्या मन:पटलावर प्रतिमा रेखाटण्याच्या वरील पद्धतीतील बारकावे गिरीशच्या चटकन लक्षात आले आणि त्या पद्धतीनुसार त्याने आपल्या मन.पटलावर प्रतिमा रेखाटण्याचा सराव करून दोन महिन्यात आपल्या अनिष्ट सवयीचा बीमोड केला !

काही दिवसानी गिरीश श्रीधरला घेऊन माझ्याकडे आला. त्याने श्रीधरची माझ्याशी ओळख करून दिली. मला भेटावयास येण्यामागचा श्रीधरच्या मनातील उद्देश उघडच होता. त्याला आपल्या रोज सकाळी उशिरा उठण्याच्या जुन्या सवयीवर, मन.चक्षूच्या सामर्थ्याने इलाज करून घ्यावयाचा होता. गिरीशही श्रीधरला मदत करावयास तयार होता. ही गोष्ट विचारात घेऊन मी श्रीधरला त्याच्या मन:पटलावर प्रतिमा रेखाटण्यास शिकविताना खालील स्वरूपाच्या सूचना दिल्या.

## श्रीधर काय शिकला ?

'श्रीधर, तू तुझ्या मन:पटलावर असे चित्र उभे कर की, घड्याळाच्या गजराने सकाळी ६ वाजता तू जागा झाला आहेस. घड्याळाचा गजर बंद करून नेहमीप्रमाणे आणखी थोडा वेळ झोपावे असे तुला वाटते आहे; परतु तुला लगेच आठवते की, देशात आणीबाणी जारी केलेली आहे व त्यामुळे तू कचेरीत वारंवार उशिरा जाऊ लागलास तर, तुझे वरिष्ठ अधिकारी तुझ्या बेशिस्त वर्तनाबद्दल तुझ्याविरुद्ध योग्य ती कारवायी करावयास बिलकुल कचरणार नाहीत आणि तू ज्या कर्मचारी संघटनेचा सदस्य आहेस, ती संघटनाही तुझ्या मदतीला धावून येणार नाही. कारण आणीबाणी जारी केलेली असल्यामुळे ती सघटनाही निष्प्रभ झालेली आहे. म्हणजे कचेरीत नेहमी उशिरा येणे हे तुझे वर्तन बेशिस्तीचे आहे, हे दिसत असूनही तुला पाठीशी घालणारे आता कोणी उरलेले नाही. तेव्हा तुला तुझ्या बेशिस्तीचे परिणाम भोगावे लागतील.

याउलट, तू ताबडतोब उठून प्रातर्विधी वगैरे उरकून वेळेवर कचेरीत गेलास तर गिरीशकडून तुला एक 'बक्षीस' मिळणार आहे. ते 'बक्षीस' म्हणजे तू कधीही उशीर न करता, ओळीने पंधरा दिवस कचेरीत वेळेवर गेलास, तर गिरीश त्याच्या खर्चाने तुला तू म्हणशील त्या सिनेमाला घेऊन जाणार आहे. शिवाय कधीही उशीर न करता वेळेवर कचेरीत जाण्याचा तुझा उपक्रम तू तसाच चालू ठेवलास तर गिरीश त्याच्या खर्चाने तुला दर पंधरा दिवसांनी एक याप्रमाणे पुढील तीन महिन्यात सहा सिनेमांना घेऊन जाणार आहे.'

अर्थात श्रीधरला वरील प्रतिमा आपल्या मन.पटलावर रेखाटण्यास सागण्यापूर्वी, मी त्याच्याशी व गिरीशशी चर्चा करून, गिरीश स्वत:च्या खर्चाने श्रीधरला सिनेमाला घेऊन जाण्याचे 'बक्षीस' द्यावयास तयार होता, याची खात्री करून घेतली होती.

आता मुख्य प्रश्न असा की, श्रीधर माझ्याकडून काय शिकला ? या प्रश्नाचे उत्तर असे की, माझ्या मदतीने तो स्वत:च्या मन:पटलावर दोन प्रकारच्या प्रतिमा रेखाटण्यास शिकला. पहिल्या प्रकारच्या प्रतिमासृष्टीत स्वत च्या बेशिस्त वर्तनामुळे त्याच्या वाटचाला येणाऱ्या दुष्परिणामाचा अंतर्भाव होता आणि दुसऱ्या प्रकारच्या प्रतिमासृष्टीत स्वत ला लवकर उठवण्याची सवय लावून घेतल्यामुळे त्याच्या वाटचाला येणाऱ्या फायद्याचा समावेश केलेला होता.

केवळ एका आठवड्याच्या प्रयत्नामुळे, श्रीधर सकाळी ६ वाजता घड्याळाचा गजर झाल्याबरोबर अगावरची चादर बाजूला टाकून, अंथरुणावरून उठून प्रातर्विधी करण्यास जाऊ लागला; परतु नेमकी त्याच वेळी त्याने एक चूक केली. त्याला वाटू लागले की, वेळेवर कचेरीत गेल्यामुळे दर पंधरा दिवसानी गिरीश त्याला सिनेमाला घेऊन जाणार होता, ही कल्पनाच सकाळी ६ वाजता घड्याळाचा गजर झाल्याबरोबर उठून अथरुणाबाहेर येण्यास पुरेशी होती. त्यामुळे त्याचा असा समज झाला की, माझ्याकडून शिकलेल्या पद्धतीनुसार पहिल्या प्रकारची प्रतिमासृष्टी मन:पटलावर साकार करण्याची गरज नव्हती. त्याचा परिणाम असा झाला की, दुसऱ्या आठवड्यात तो परत उशिरा उठू लागला व अर्थातच खूप घाई

करूनही एक दिवस तो कचेरीत उशिरा पोहोचला! त्यामुळे तो गिरीशकडून मिळणारे 'बक्षीस' तर गमावून बसलाच; पण आपली उशिरा उठण्याची सवय परत डोके वर काढीत आहे की काय, या कल्पनेने तो चिंताग्रस्तही झाला.

श्रीधर मला परत भेटावयास आला तेव्हा मी त्याला असे समजावून सांगितले की, त्याच्या उशिरा उठण्याच्या सवयीचा बीमोड करण्यासाठी मनःचक्षूचे सामर्थ्य उपयोगात आणावयाचे, याचा अर्थ त्याने स्वतःच्या मनःपटलावर दोन प्रकारच्या प्रतिमा रेखाटण्याचा सराव करणे. देशात आणीबाणी जारी केलेली असल्यामुळे त्याचे बेशिस्त वर्तन पाठीशी घालण्यास त्याची कर्मचारी संघटना असमर्थ होती, या कल्पनेच्या अनुरोधाने मी शिकविलेली पहिल्या प्रकारची प्रतिमासृष्टी मनःपटलावर रेखाटण्यात कसूर करून चालण्यासारखे नव्हते. हा मुद्दा त्याच्या मनावर ठसल्यावर, त्याने पुन्हा मनःचक्षूच्या सामर्थ्याचा उपयोग करून पाहण्यास सुरुवात केली व अखेर सकाळी उशिरा उठण्याच्या आपल्या सवयीचा बीमोड केला!


माझ्याकडून शिकलेल्या पद्धतीप्रमाणे आपल्या मनःपटलावर दोन्ही तऱ्हेच्या प्रतिमासृष्टी रेखाटण्यात श्रीधरने पहिल्या आठवड्यानंतर कसूर केली नसती तर, त्याला परत माझी भेट घ्यावीच लागली नसती. मात्र माझ्याकडून शिकलेल्या पद्धतीत समाविष्ट असलेल्या दोन्ही प्रकारच्या प्रतिमासृष्टींचे महत्त्व त्याला स्वानुभवाने पटल्यावर त्याने आपल्या इतरही काही अनिष्ट सवयींवर हल्ला चढविण्यास प्रारंभ केला, ही गोष्ट नमूद करावयास हवी.

या प्रकरणात, विक्रम, गिरीश व श्रीधर यांची उदाहरणे देऊन, मनःपटलावर प्रतिमा रंगविण्याच्या निरनिराळ्या पद्धतींचा अवलंब करून माणूस आपल्या आत्मघातकी अथवा अनिष्ट सवयींचा बीमोड कसा करू शकतो, हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्या तिघांनी माझी प्रत्यक्ष भेट घेतली होती, यावरून किंवा या पुस्तकात दिलेल्या इतरही काही उदाहरणांवरून कोणाचा असा समज होईल की, मनःचक्षूच्या सामर्थ्याचा उपयोग करून घेण्यासाठी माणसाने कोणत्या तरी तज्ज्ञाची मदत घेणे आवश्यक असते. म्हणून या पुस्तकाच्या पहिल्याच प्रकरणात स्पष्ट केलेल्या एका मुद्द्याची परत आठवण करून देणे उपयुक्त होईल.

तो मुद्दा असा की, मनःचक्षूच्या सामर्थ्याने स्वतःचे जीवन अधिक सुखी व संपन्न करण्याच्या ज्या पद्धती या पुस्तकात दिल्या आहेत, त्यांचा उपयोग करताना तुम्ही वाटल्यास श्रीधरने घेतली त्याप्रमाणे, तुमच्या एखाद्या मित्राची अथवा मैत्रिणीची मदत घेऊ शकता; परंतु तुम्ही एखाद्या तज्ज्ञाची मदत घेणे आवश्यक आहे असे नाही. इतकेच नव्हे तर याही पुढे जाऊन असे म्हणता येईल की, विक्रम, गिरीश, श्रीधर किंवा इतर ज्या व्यक्ती तुम्हाला या पुस्तकात भेटतील त्यांनीही या पुस्तकासारख्याच एखाद्या पुस्तकाचा सखोल अभ्यास केला असता तर त्यांनाही मनःचक्षूचे सामर्थ्य किती प्रभावी असते हे स्वावलंबनाने पडताळून पाहता आले असते.

□

(क्रमशः)

आपली मुलं

मुलं व्हायची आणि ती आपोआप वाढायचीच अशा समजुतीचा काळ आता मागे गेला.

पालकांचे काम दिवसेंदिवस अधिकाधिक कौशल्याची मागणी करणार असं दिसतं आहे.

माझं मूल म्हणजे एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. ते सगळं मी सांगेन तसं कसं वागेल ?

मुलांना चांगल्या–वाइटाचा विवेक शिकवणं, आत्मविश्वास देणं, निर्णयक्षमता देणं हे आपलं काम आहे. आणि 'देणं' असं तरी कसं म्हणावं ? ते त्यांना घेता यावं असं वातावरण निर्माण करणं हे आपलं खरं काम आहे.

मुलांचं निरीक्षण करणं, त्यांच्याशी संवाद साधणं, आपल्या मनातलं मोकळेपणानं सांगणं, त्यांच्या मनातलं समजून घेणं, काही विसरणं, काही आठवणीनं उल्लेख करणं, बरंचसं देणं आणि ग्रेसफुली घेणं अशी किती तरी कौशल्यं आपल्याला यायला हवीत.

मुलं वाढवण्याच्या निमित्तानं आपल्याला ही जाग यायला हवी. हे पुस्तक हसत–खेळत वाचताना सहजपणे अशी जाग यावी.

**राजहंसचे नवे प्रकाशन**

**आपली मुलं**

**शोभा भागवत । किंमत २० रुपये**

## अनवट

पृष्ठ ५ वरून

### ☐ पुणे विभागच सरस !

मेरिटमध्ये सर्वात जास्त येणारे विद्यार्थी पुणे विभागातच आहेत. त्यातही गुणमर्यादेच्या दृष्टीने औरंगाबाद विभागात पाचवा येणारा विद्यार्थी पुणे विभागात सतरावा येतो. पुण्याची अंतिम गुणमर्यादा ६३५ तर औरंगाबाद ६०१ व नागपूर ६१६ अशी आहे.

या वर्षी इंग्रजी व सामाजिक शास्त्रे यात देखील ९९ पर्यंत गुण घेणारे विद्यार्थी आहेत. मात्र सहज उत्तीर्ण होऊ या विश्वासाने मराठी–हिंदी हे विषय दुर्लक्षित होतात व कमी गुण मिळतात असेही त्यांचे निरीक्षण आहे.

### ☐ निकालाचा गोंधळ

निकालांचे दिवस आहेत. त्यासंबंधी धमाल चालूच असते. मात्र मराठवाडा विद्यापीठाच्या जर्नालिझम डिपार्टमेंटइतका विनोदी (व गंभीर) प्रकार इतर विद्यापीठांच्या वाट्याला आला नसेल.

या वर्षी जर्नालिझमच्या परीक्षेत विभागप्रमुखानी सर्वप्रथम क्रमांक दिला तो तेथील एका श्रीमंत दैनिकाच्या व्यवस्थापकांना. (वय वर्षे ४० च्या वर). हे साहेब वर्षातून साताठ दिवसच वर्गांना हजर होते असे सर्व विद्यार्थी सांगतात.

त्यानंतर दुसरा, तिसरा असे मानाचे स्थानसुद्धा त्याच दैनिकातील कर्मचाऱ्यांना. ज्यांना असे मान मिळाले त्याची लायकी काय ते सर्वच जण सांगतात. वर्षभर ज्या विद्यार्थी–विद्यार्थिनींनी प्रामाणिक कष्ट केले (असे म्हणतात) त्यांना मात्र दुसरा वर्ग इ. इ.

आता या खास लोकांना वकूब नसताना पहिला क्रमांक का ? म्हणून एका चळवळया विद्यार्थिनीने विभागाविरुद्ध मोहीम उघडली. तिने एक पत्रकारपरिषद बोलावून विभागाची अब्रू काढली दुसरे दिवशी व्यवस्थापकसाहेबानी प्रतिपत्रकारपरिषद बोलाविली ! मारामारी, वर्तमानपत्रात गेली (जर्नालिझम डिपार्टमेंटच ते.) 'फिर्यादी' गटाने आता राज्यपालांपर्यंत अपील केले आहे.

मराठवाडा विद्यापीठाच्या जर्नालिझम डिपार्टमेंटच्या निकालाची दरवर्षी अशीच गत होते. म्हणजे विद्यार्थ्यांनी पत्रकारपरिषदेची बातमी देण्याऐवजी स्वतःच पत्रकारपरिषद घेण्यापर्यंत वकूब अंगी बाणवावा इतपत तयारी या विभागात करवून घेतली जाते !

### ☐ एस्कॉर्टस्चा घोळ

कोर्टकचेऱ्या, तहकुबी यांच्या घोळात एस्कॉर्टस् कंपनीचा निकाल काही वेळेवर लागण्याची चिन्हे या वेळेपर्यंत तरी दिसत नाहीत. कंपनीच्या नऊ संचालकांना हटविण्यासाठी कंपनीची तातडीची सर्वसाधारण सभा एल. आय. सी. तर्फे बोलाविली गेली. आतापर्यंत पाच ते सहा वेळा ही सभा पुढे ढकलली गेली. प्रत्येक वेळी काही तरी तांत्रिक मुद्दा काढून तहकुबी ! कंपनीचे सध्याचे डायरेक्टर नंदा आपला पण खरा करत आहेत. एका सभेत तर फील्डमार्शल माणेकशा (एक संचालक) यांनी भागधारकांच्या वतीने मोठे भावनात्मक भाषण ठोकले. दुसऱ्या एका वक्त्याने मग माणेकशासारख्यांना हटवून सरकार (मार्गे एल. आय. सी.) काय मिळवणार आहे असा काळजालाच हात घालणारा प्रश्न केला !

प्रत्यक्ष मतदानाच्या आधी संचालकांना हटविण्याच्या ठरावावर परवा सभेत उपस्थित असलेल्या बहुतेकांनी नापसंती दर्शविली. अर्थात वित्तीय संस्थांकडे ५० टक्क्यांपेक्षा जास्त मते असल्याने प्रत्यक्ष मतदानात सरकारचीच सरशी होणार हे उघड. मात्र नंदांना अभिप्रेत असलेला नैतिक का कसला विजय मिळाला आहे ! (दर सभेला एक लाख अशी किंमत देऊन नैतिकतेला जबर किंमत द्यावी लागते महाराजा !)

या सभेच्या निमित्ताने सर्वोच्च न्यायालयाने सभेवरची स्थगिती उठविताना दिल्ली उच्च न्यायालयाला चांगल्याच कानपिचक्या दिल्या आहेत. एस्कॉर्टसची सभा होऊ द्यावी पण त्यातील निर्णयाची अंमलबजावणी स्थगित राहू द्यावी असा सर्वोच्च न्यायालयाने आधीच निर्णय दिला होता. त्यानंतर काही भागधारकांनी सभेच्या स्थगितीसाठी केलेला अर्ज दिल्ली उच्च न्यायालयाने मान्य केला. सर्वोच्च न्यायालयाचे न्या. वेंकटरामय्या यांना हा अधिक्षेप सहन झाला नाही ! त्यांनी स्थगिती उठवलीच !

### ☐ दोन बकरे

पंजाबमध्ये बाकी धमाल चालू आहे. शुक्रवारीच राज्यपाल भैरवदत्त पांडे व पोलीसमहानिरीक्षक भिंडर यांना बळीचा बकरा बनविले गेले. दोघानी आपापले राजीनामे दिले. बिचारे भैरवदत्त नेमल्याप्रमाणे काम करत होते. त्याची ती अमेरिकन स्टाइल दाढी, एकदम 'बिझिनेस लाइक' बर्ताव पाहून गेल्या ऑक्टोबरात त्यांना कडक प्रशासनासाठी ए. पी. शर्मांच्या जागी पंजाबात पाठवले होते ! बरं त्याच्या जोडीला इमर्जन्सी-संजय गांधी–डाणू सुंदरसिंग फेम भिंडरही पोलीसखात्यात पाठवले होते.

आता हे दोघे भिंद्रांवालासमोर हतबल ठरले म्हणे ! आम्ही असं ऐकलं की,पंजाबात ६ ऑक्टोबर १९८३ पासून राष्ट्रपतिराजवट होती. आदरणीय राज्यघटनेच्या ७४ व्या कलमानुसार 'प्रेसिडेंट, इन अकॉर्डन्स विथ अॅडव्हाइस ऑफ...' पंतप्रधान गांधीचेच प्रत्यक्ष राज्य होते !

### ☐ एकाच्या शोधात तीन !

परदेशात तर अजूनच धमाल आहे.

ब्रिटनमधले डॉ. जगजितसिंग चौहान यांनी 'रिपब्लिक ऑफ खलिस्तान' स्थापन करण्याची पंधरा दिवसांपूर्वीच घोषणा केली. ही प्रतिक्रिया अपेक्षित होती; पण गंमत वेगळीच आहे. गेल्या शनिवारी–रविवारी (२३–२४ जून) ब्रिटनमधल्या केंट परगण्यातील गुरुद्वारात शिखांच्या सभेत व नंतर लंडनमधील साउथ हॉल गुरुद्वारात खलिस्तान हे अंतिम उद्दिष्ट ठरविले गेले. ते साध्य करण्यासाठी पाचजणांची एक समितीही स्थापन केली गेली. मग डॉक्टर चौहानांच्या रिपब्लिकचे (व त्यांच्या प्रेसिडेन्सीचे) काय ? ते रिपब्लिक विसर्जित झाल्यात जमा आहे ! मात्र चौहान म्हणतात की, ही पाचजणांची समिती म्हणजे माझे नवे कॅबिनेट आहे ! आली का पंचाईत.

त्यातही भानगड अशी की, ब्रिटनमध्येच झोरा सिंग यांच्या नेतृत्वाखालचे व जसवंत सिंग यांचे अशी खलिस्तानची आणखी दोन सरकारे आहेत ! त्यांना चौहान मान्य नाहीत !

☐

# नाट्यपंढरी



## □ नशा अभिनेत्याची !

कलावंत हा समाजाचा कौतुकाचा विषय असतो. त्याच्याविषयी रसिकांना प्रेम असते. एक प्रकारची आपुलकी वाटते, म्हणूनच त्याच्याविषयी बरेवाईट कानावर आले की खटकते. कधीकधी रागही येतो. तो आपल्या मर्जीतूनही उतरतो. हे सगळे घडते, तेव्हा परिचय तर राहोच; पण त्या कलाकाराशी आपली तोंडओळखसुद्धा नसते. पण तशी गरजही नसते. कारण आपली ओळख असते ती त्याच्या मुखवटयाशी. त्याने रंगविलेल्या भूमिकांशी. त्याच्या बत्तीस फुटातल्या रंगमंचावरच्या करामतीशी. खरं म्हणजे, त्याच्याशी–चेहऱ्याशी, त्या व्यक्तीशी आपल्याला काहीही कर्तव्य नसते. आपण म्हणतोही, आपल्याला त्याच्याशी काय करायचंय ? त्याच्या फक्त भूमिका पहाव्या, बस ! पण तसे घडत नाही.

त्याचे कोणत्या नटीशी सूत आहे ? तो आपल्या पत्नीला कसे वागवितो ? सिगरेटस फार ओढतो का ? मद्य घेतो का ? घरी गेलो तर भेटतो, बोलतो का ? का शिष्ठ आहे ? असे अनेक विषय आपण मोठ्या चवीने चघळीत असतो. कलाक्षेत्रात दारूची कीर्ती इतकी पसरली आहे की एखादा गुणी प्रामणिक कलाकार खरोखरच काही अन्य कारणाने नाटकाच्या प्रयोगाला उपस्थित होऊ शकला नाही, तर लोक लगेच म्हणतात 'पडला असेल पिऊन कुठे तरी !' याचा अर्थ इतकाच की कलावंत हा सतत लोकांसमोर असतो नि नकळत त्याचे नि प्रेक्षकांचे एक अतूट नाते जडते. जवळीक होते. म्हणूनच त्याचे कौतुकही होते नि त्याच्यावर टीकाही होते. नाही तर समाजात दारू पिणारे शालशिष्ठ काय थोडे आहेत ?

तसं म्हटलं, तर आपले अनेक कलाकार व्यसनी होते; पण ज्यांचे व्यसन कलेच्या आड आले नाही, त्यांचे समाजाने अपार कौतुक केले; पण व्यसन जेव्हा कलेला अडसर घालते, कलेवर कुरघोडी करते, तेव्हा तो कलावंत मर्जीतून उतरतो. व्यवसायातून बाजूला फेकला जातो. मा. नरेश, अगदी अलीकडचा स्त्रीपार्टी कलावंत. मी मी म्हणणाऱ्यांनी तोंडात बोटं घालावी असा तोलामोलाचा कलाकार ! पनवेलला एकदा 'संशयकल्लोळ'चा प्रयोग होता. अर्थातच मा. नरेश होते–रेवती नि मा. दामले–(नूतन पेंढारकर) अश्विनशेट ! पण दोन अंक होईपर्यंत मा. नरेश इतकी प्यायला (किंवा पाजली म्हणा, कारण आपल्या आवडत्या नटावर असले प्रेम करणारे गुलहौशी लोक असतात) की त्याला धड उभे राहवेना की तोंडातून शब्द फुटेना ! अखेर दामले रेवती झाले ( अश्विनशेटची रेवती झाली ) नि नाटक ओढून काढले. हा नटाच्या नशेचा प्रताप !

## □ नशा अभिनयाची !

हो हो, नशा अभिनयाचीही ! अभिनयाची नशा चढते. कैफ येतो. इथे फक्त जागा वेगळ्या, अर्थ वेगळा, आशय वेगळा. गुंगी येते, कैफ चढतो, तो प्रेक्षकांना ! नारायणराव बालगंधर्वांनी नाही रसिकांना वर्षोन वर्षे आपल्या शंभर नंबरी रूप–गान–अभिनयाने गुंगवून ठेवले ? इतकेच काय, इथे कलावंत गेला, तरी त्याच्या अभिनयाची भूल, गोड गुंगी उतरत नाही. गणपतराव जोशी, भागवत, दाते, कोल्हटकर, फाटक किती किती म्हणून नावं सांगावी ? मा. नरेशसुद्धा, हीच जातकुळी सांगणारा ! मा. नरेशची रंगमंचावरची हालचाल म्हणजे नागिणीची सळसळ ! त्याच्या वाटणीला फारशा नव्या भूमिका आल्या नाहीत; पण जुन्यांचे त्याने सोने केले. कुठल्याही भूमिकेत कुठेच कमी पडला नाही. लीला (प्रेमसंन्यास), लतिका (भावबंधन), कालिंदी (पुण्यप्रभाव), मल्लिका (हॅम्लेट), शिवांगी (राजसंन्यास) शिवाय सुभद्रा, भामिनी, रेवती, सिंधू, वसंतसेना या सगळ्याच वेगवेगळ्या ढंगांच्या भूमिकांना त्यांनी पुरेपूर न्याय दिला. जुन्या मंडळींना बालगंधर्व, दीनानाथांच्या आठवणीचा आनंद दिला. मा. नरेशचा गुणविशेष म्हणजे स्त्रिया रंगभूमीवर आल्यावरसुद्धा त्यांच्यावरोबर स्त्री भूमिका केल्या (सुभद्रा–मा. नरेश. रुक्मिणी –विमल पटवर्धन इत्यादि अनेक)

मा. नरेशच्या 'कालिंदी'चं कौतुक नाही असा एकही प्रेक्षक नाही ! १९४५ सालची गोष्ट. बेळगावला शतसांवत्सरिक नाट्यमहोत्सव होता. त्यात 'पुण्यप्रभाव'चा, प्रयोग होता. नरेश 'कालिंदी' करणार होता; पण त्या दिवशी दुपारी मद्यपान करून, त्याने जेवणाच्या वेळी गोंधळ केला. भालचंद्र पेंढारकर प्रोग्रॅम-सेक्रेटरी होते. अशा स्थितीत त्याला कामाला उभे राहू द्यायचे नाही असेच त्यांच्या मनाने घेतले होते; पण योग असा, संध्याकाळी शुचिर्भूत होऊन नरेश थिएटरवर आला. पेंढारकरांनाही तेच हवे होते. त्या रात्री नरेशने अशी कालिंदी उभी केली की, त्याला तोड नाही! त्याची कालिंदी पाहून, भारावलेले पेंढारकर लिहितात, 'ह्या कलाकाराच्या जवळपासही आपण पोचू शकत नाही. धावत धावत जावं आणि नरेशच्या पायांवर डोकं ठेवावं ! हा नरेश नाही–गडकरीमास्तरांना कालिंदीची व्यक्तिरेखा उभी करताना ज्या प्रतिभेचा स्पर्श झाला असेल तीच ती प्रतिभा आता रंगभूमीवर जड स्वरूप घेऊन कालिंदी होऊन वावरते आहे. सकाळी मद्यपान करून ज्या बेहोश अवस्थेत नरेश भांडत होता, ती 'नशा' ती बेहोशी त्याच्यापासून हजारो कोसांवर होती. आता जी नशा होती, ती शुद्ध स्वरूपाची, ब्रह्मानंदाची नशा होती... ही बेहोशी तुझ्याइतकीच आम्हाला चढवलीस. मग नरेश, अरे तुला त्या तसल्या नशेची काय गरज आहे रे !' रसिकहो, ही नशा अभिनयाची !

# फिडेल, चे आणि क्रांती

**अरुण साधू**

आवृत्ती : दुसरी

बावीस रुपये

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव, पुणे ३०

अन्याय, जुलुम–जबरदस्ती व भ्रष्टाचाराची सीमा झाली की क्रांती अटळ ठरते.
क्यूबन क्रांती हे त्याचे ढोबळ उदाहरण.
संपूर्ण लॅटिन अमेरिका ढवळून काढणाऱ्या या क्यूबन क्रांतीचा इतिहास.



राजहंसची दोन नवी विज्ञान प्रकाशने

# तुम्हाला विज्ञानयुगात जगायचंय

विज्ञानातील अनेक आश्चर्यकारक नव्या गोष्टी

—तुम्हाला बिरबल बनवू शकणाऱ्या !

तुम्हाला माहीत हवेत, करता येतील असे अनेक गमतीदार वैज्ञानिक प्रयोग—

—तुम्हाला जादूगार बनविणारे !

आज अंतराळयुगात, साऱ्या विश्वात मानवाने केलेला मुक्त संचार.
जो तुम्ही समजावून घ्यायला हवा.

—नाहीतर तुमचा रिप व्हॅन विंकल बनेल !

□

# । विज्ञानेश्वरी ।

परग्रहावरून येणाऱ्या संदेशासारख्या अनेक नव्या गोष्टी
तुमचा मित्र बनून तुमच्या कानात सांगणारी !

विज्ञानेश्वरेतील काही अध्याय आहेत—

- झोपा आणि विद्वान् व्हा.
- युरी गिलरला जमाल गोटा मिळतो त्याची गोष्ट
- पिरॅमिडचे गुपीत
- तुमच्या नशिबाचे गणित
- भेदिले सूर्यमंडळा...

लेखक : **दत्तप्रसाद दाभोळकर**

**किंमत : प्रत्येकी वीस रुपये**

रुपये चाळीस पाठवल्यास दोन्ही पुस्तके घरपोच मिळतील.

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पेठ

पुणे ४११ ०३०